
माहेरी गेली
लेखक
धर्मा गोविन्द
J. Malwankar 84

# माहेरी गेली

म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
ग्र 231/2
मंत्रालय

लेखक

## धर्मा गोविन्द

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ
मंत्रालय-मुंबई-४०००३२

**प्रथमावृत्ती** :- १ नोव्हेंबर १९८४.

**प्रकाशक** :- सूर्यकांत देशमुख
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ
मंत्रालय-मुंबई-४०००३२

© **प्रथमावृत्ती** :- प्रकाशकाधीन

**मुद्रक** :- चिंतामणि प्रिंटींग प्रेस
**ऑफिस** :- २०४ महावीर अपार्टमेंट नं. २
जे. पी. रोड, अंधेरी (पश्चिम)
मुंबई-४०००५७
टे. नं. ५७ ८१ १३

**किंमत २० रुपये**

**U. S. 8 4**

# निवेदन

हिंदी महासागरात भारतापासून हजारो मैल दूर मॉरिशस बेट इतर द्वीपसमूहांसह गेली असंख्य वर्षे अस्तित्वात आहे. चारशे वर्षांपूर्वी या मॉरिशस बेटावर फक्त डोडो नावाचा पक्षी इतर पशुपक्ष्यांसह रहात असे. सोळाव्या-सतराव्या शतकापासून पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच या साम्राज्य-वादयांच्या वासाहतिक स्पर्धा सुरू झाल्या आणि मॉरिशस बेटावर या वसाहतवादयांकडून त्यांनी अगोदरच ज्या देशात सत्तास्पर्धा सुरू केल्या होत्या. त्या देशांतील माणसे वेठबिगार मजूर म्हणून नेली. फ्रेंच व इंग्रज यांच्यामध्ये सत्तास्पर्धा भारतात सुरू झाली व हिंदी महासागरातील मॉरिशस बेट ऊसाचे बेट म्हणून त्यांनी निवडले, त्याच काळात पहाडांच्या व नदयांच्या या निसर्गसुंदर बेटावर जमीन कसण्यासाठी भारतातील बिहार, तामीळनाडू, आंध्र व महाराष्ट्रातून बोटी भरभरून वेठबिगार मजूर स्त्री-पुरुष, मुले मॉरिशस बेटावर नेण्यात आली. आज १९८४ साली भारतीय लोकांना या बेटावर स्थलांतरित म्हणून जाऊन दीडशे वर्षे पुरी होत आहेत. या बेटावर आजचे मॉरिशस देशाचे तरुण व धडाडीचे पंतप्रधान अनिरूद्ध जगन्नाथ यांच्या नेतृत्वाखाली **–मॉरिशस– १५० वर्षे भारतीय स्थलांतरितांची** हे वर्ष १ ऑक्टोबर १९८४ पासून ३१ मे १९८५ पर्यंत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरे होत आहे.

मॉरिशस बेटावर इतर भारतीय भाषिकांबरोबर मराठी भाषिक समाज गेली दिडशे वर्षे वास्तव्य करून आहे. आज मॉरिशस बेटावरील मराठी समाजाची लोकसंख्या पन्नास हजाराच्या जवळपास आहे. या मराठी लोकांनी आजवर मॉरिशस बेटावर आपली मराठी भाषा, महाराष्ट्राची लोकसंस्कृती, उत्सव परंपरा व दशावतारासारखे लोकनाटय टिकवून ठेवले आहे. इ. स. १९६४ सालापासून मॉरिशस देशाच्या शिक्षणक्रमामध्ये मराठी भाषेच्या अभ्यासाचा समावेश झाला आहे. आज मॉरिशसमध्ये सुमारे सत्तर मराठी भाषेच्या शाळा असून शंभराच्यावर मराठी शिक्षक-शिक्षिका मराठी भाषेच्या अध्यापनाचे काम करतात. मॉरिशसचे भूतपूर्व पंतप्रधान व विदयमान गव्हर्नर जनरल माननीय डॉ. सर शिवसागर राम गुलाम यांच्या कारकिर्दीत मॉरिशसमधील पौर्वात्य विदयांचा अभ्यास व संशोधन करणारी 'महात्मा गांधी संस्था' १९७५ साली स्थापन झाली. भारताच्या पंतप्रधान माननीय इंदिरा गांधी यांनी या संस्थेचे उद्‌घाटन केले होते. 'महात्मा गांधी संस्थे'त गेली काही वर्षे मराठी भाषा व पाठयपुस्तक मंडळाचे कार्यालय मॉरिशस बेटावरील मराठी भाषेच्या व साहित्याच्या विकासाचे काम करीत आहे. धर्मा गोविंद, देवजी पडीया, संजय

आनंद, श्रीमती दयाबाय बाबाजी अशी मराठी अध्यापक व लेखक मंडळी या मराठी विभागात अधिकारपदावर आहेत. 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन' ही मॉरिशस बेटावरील मराठी समाजाची प्रातिनिधिक संस्था आहे. महाराष्ट्रामध्येही 'महाराष्ट्र मॉरिशस मित्र मंडळ' ही संस्था गेले दीड शतक मॉरिशस देशातील भारतीय समाजासाठी महाराष्ट्रात कार्यरत आहे. या मंडळातर्फे मॉरिशसमधील कवी व लेखक धर्मा गोविंद, देवजी पडीया, सदानंद भिवाजी, सदाशिव गोविंद जगताप यांचे 'मोरस मराठी' भाषेतील साहित्य महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाला उपलब्ध झाले आहे. सदाशिव गोविंद या आज ऐंशी वर्षे वयाच्या गृहस्थांनी आपले आत्मकथन लिहिले आहे. धर्मा गोविंद यांनी 'माहेरी गेली' ही कहाणी लिहिली आहे. देवजी पडीया व सदानंद भिवाजी यांनी एकांकिका व नाटके लिहीली आहेत. शिवाय मॉरिशस बेटावरील दशावताराची मराठी संहिताही मंडळाला प्राप्त झाली आहे. मॉरिशस–१५० वर्षे भारतीय स्थलांतरितांची– हे वर्ष साजरे होत असताना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाला मॉरिशसमधील या मराठी लेखकमंडळींची पुस्तके प्रकाशित करताना विशेष आनंद होत आहे. 'मोरस मराठी' भाषा ही सुद्धा मूळ मराठी मातृभाषेच्या अस्तित्वाचे एक अभ्यासनीय अंग बनले आहे. अभ्यासकांना ही पुस्तके विशेष उपयुक्त ठरतील असे मला मनःपूर्वक वाटते.

*सुरेन्द्र बारलिंगे*
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

४२, यशोधन,
मुंबई-४०० २०
दिनांक १ नोव्हेंबर, १९८४.

# 'मोरस मराठी' आणि मॉरिशसमधील मराठी भाषिक लेखन

'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'चे अध्यक्ष व माझे स्नेही डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांनी मॉरिशस बेटावरील मराठी माणसांची कहाणी माझ्याकडून नीट ऐकून घेतली. मी माझ्या मॉरिशस बेटावरील मुक्कामात लिहिलेली माझी 'मॉरिशस डायरी' देखील त्यांनी समजावून घेतली. मॉरिशस बेटावरील मराठमोळ्या माणसांनी गेली दीडशे वर्षे टिकवून ठेवलेली आपल्या पूर्वजांची मराठी भाषा—तिचा इतिहास डॉ. बारलिंगे यांनी माझ्याकडून ऐकला. मी मॉरिशस बेटावरील वयोवृद्ध, मध्यमवयीन व तरुण पिढीच्या स्त्री-पुरुषांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या संभाषणाच्या व त्यांनी गाऊन दाखविलेल्या मराठी गीतांच्या व लोकगीतांच्या माझ्याकडील ध्वनिफिती डॉ. बारलिंगे यांनी अभ्यासपूर्वक ऐकल्या. आणि मॉरिशस बेटावरील आजवर टिकून राहिलेली मराठी भाषा व तेथील मराठी मंडळींनी बेटावरच्या आपल्या स्वतंत्र राष्ट्रातील आंतरराष्ट्रीय बहुभाषांच्या वातावरणात जोपासलेली आपली मराठी भाषा, —तिला नंतर जे 'मोरस मराठी' भाषेचे स्वरूप प्राप्त झाले— ती सुद्धा डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांनी आपलीच मराठी भाषा म्हणून 'साहित्य संस्कृती मंडळा'साठी स्वीकारली, हे मी 'मोरस मराठी भाषे'चे महद्भाग्य समजतो. त्याबद्दल डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांना मॉरिशस बेटावरील 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन'च्या वतीने व आमच्या मुंबईतील 'महाराष्ट्र मॉरिशस मित्र मंडळा'च्या वतीने धन्यवाद देतो.

१९६७ सालच्या सप्टेंबर महिन्यात मी मॉरिशस बेटावर पहिल्यांदा पाऊल टाकले. महाराष्ट्रातील थोर व कर्तबगार सर्कस महर्षी कै. नारायणराव वालावलकर यांच्या 'धी ग्रेट रॉयल सर्कस' बरोबर पूर्व आफ्रिका खंडात एक पत्रकार व लेखक म्हणून प्रवास करण्याची संधी नारायणरावांनी मला दिली होती. मोंबासाहून एका खास डच महासागरी जहाजातून आठ नऊ दिवस हिंदी महासागरावर तरंगत मी एका संध्याकाळी मॉरिशस बेटाच्या पोर्ट लुईस या बंदरात येऊन थडकलो होतो. मग आमचा सर्कसचा तळ मॉरिशस बेटावरील कॉरोमॉंडेल या स्थळावर पडला होता. गंमत म्हणजे पहिल्या आठदहा दिवसात सगळे मॉरिशस 'धी ग्रेट रॉयल सर्कस'च्या चार खांबी भव्य तंबूत येऊन लोटत होते आणि मी ते जवळून निरखून पहात होतो. मग हळहळू मॉरिशसच्या लोकजीवनात मी रस घेऊ लागलो. मॉरिशसच्या पंतप्रधानांपासून तो मंत्रीमंडळ आणि संसद सदस्यांपर्यंत मला माणसे भेटत गेली. मी त्यांना भेटत राहिलो. त्यावेळचे दोन संसद सदस्य माननीय शिवा बापू व गणू गंगाराम मला भेटले

आणि मॉरिशस बेटावरील मराठी मंडळींशी माझा जवळचा व जिव्हाळचाचा ऋणानुबंध जडत गेला. तेव्हाच मला मॉरिशस बेटावरील चारी पहाडी दिशांना विखुरलेल्या व ऊस-शेतमळचात मजूर म्हणून काम करणाऱ्या व अन्य व्यवसायी मराठी माणसांना प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन भेटण्याची, त्यांच्याशी बोलण्याची, त्यांचे जीवन समजून घेण्याची संधी गणू गंगाराम व शिवा बापू या बेटावरील ज्येष्ठ नेत्यांनी व समाजकार्यकर्त्यांनी प्राप्त करून दिली. मॉरिशस बेटावरील मराठी समाजात जन्माला आलेला व ज्याचा वंशज बाबल्या सावंत हा सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी परिसरातील माणगाव भागातून एक वेठबिगार मजूर म्हणून दीडशे वर्षांपूर्वी या बेटावर गेलेला– तो मॉरिशसमधील नामवंत लेखक, विचारवंत, कथा व कादंबरीकार व इतिहासाचा शिक्षक– आनंद सावंत मल्लु या बेटावर मला भेटला. 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन'चा धडाडीचा तरूण कार्यकर्ता, त्याचा भाऊ विरजानंद मल्लु, व सगळे मल्लु कुटुंब, त्यांची सयाबाई, त्यांचे वडील, त्यांचा परिवार मला भेटला. मॉरिशस बेटावरील माझ्या पहिल्या अडीच महिन्यांच्या मुक्कामात मॉरिशसमधील भारतीय समाजाची मी बरीच माहिती प्रत्यक्ष भेटीगाठी, संवादातून व निरीक्षण व अभ्यासातून गोळा केली. माझी 'मॉरिशस डायरी' अदययावत लिहिली. मग मुंबईला परत आल्यावर 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये एक दीर्घ लेखमाला लिहून या स्वप्ननिळचा बेटावरची मराठी माणसांची कहाणी मी महाराष्ट्राला सांगितली. महाराष्ट्रीय माणसांना ती कहाणी वाचून प्रथमच मॉरिशस बेटावरील मराठी माणसांचे जीवन समग्र व सुस्पष्ट असे आकलन झाले. नंतर 'महाराष्ट्र मॉरिशस मित्र मंडळा'ची स्थापना मुंबईत झाली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे त्यावेळचे संचालक, संघटक व कार्यकर्ते कै. वासुदेवराव भट यांचे मला मोठे सहाय्य झाले.

याच माझ्या पहिल्या भेटीत एके दिवशी सर्कशीत माझा पत्ता काढीत धर्मा गोविंद हा मराठी भाषेचा शिक्षक मला भेटायला आला. उंच, देहाने भरलेला, कष्टकरी समाजाच्या सर्व खुणा अंगावर प्रकट करणारा, लालसर वर्ण पण देखणा सतेज चेहरा, डोळे पाणीदार व भावुक, मॉरिशस बेटावरील पाश्चात्य पद्धतीप्रमाणे त्याने सूट-बूट घातलेला, भव्य कपाळ आणि डोक्यावर काळेभोर केस व्यवस्थित विंचरलेले. शिवाय तो चांगले मोरस मराठी बोलत होता. त्याने बेटावरील मराठी शिक्षणाची व शिक्षकांची परिस्थिती मला विशद करून सांगितली. आपल्या मराठी भाषेत लिहिलेल्या कविता व कथा त्याने मला वाचायला दिल्या. मी जणू कुणी त्याचा वर्षानुवर्षे हरवलेला नातेवाईकच त्याला भेटलो होतो. धर्मा गोविंद बोबेसिन सारख्या शहरापासून (जिथे आमच्या सर्कसचा तळ पडला होता) दूर खेडचात रहात होता. त्याच्या बोलण्या-चालण्या

वागण्यातून त्याने मला एक विलक्षण चटका लावला. मलाही वाटू लागले की, माझाही कुणी युगानुयुगे फारकत झालेला महाराष्ट्र, मराठी भाषा, मराठी साहित्य यांचा वंशज पुन्हा मला अद्‌भुतपणे या बेटावर भेटला. 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये मी लिहिलेल्या लेखमालेत धर्मा गोविंदच्या मॉरिशस देशाला उद्देशून लिहिलेल्या मोरस मराठी कविता मी आवर्जून समाविष्ट केल्या होत्या. मुंबई आकाशवाणीवर मी मॉरिशस भेटीवर तीन व्याखानांची माला गुंफली. त्यावेळीही धर्मा गोविंदच्या कविता मी पेश केल्या व श्रोत्यांवर त्यांचा एक भावनिक प्रभाव पडलेला मला आढळून आला.

इ. स. १९७९ साली महाराष्ट्र राज्य सरकारच्या आमंत्रणावरून मॉरिशस बेटावरील मराठी मंडळींचे एक प्रतिनिधी मंडळ मुंबईला आले. त्या मंडळांच्या प्रतिनिधींचे मुंबई, पुणे व अन्य ठिकाणी भरघोस स्वागत झाले. महाराष्ट्र राज्याने मॉरिशसमधील मध्यम परिस्थितीतील मराठी मुलामुलींना महाराष्ट्रात येऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी सोयी-सवलती उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. या प्रतिनिधी मंडळाबरोबर देवजी पडीया हा मॉरिशसमधील नाटककार, कवी व मराठी भाषेचा शिक्षक आलेला होता. दरवर्षी 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन'तर्फे मॉरिशस बेटावर १ मे रोजी 'महाराष्ट्र दिन व छत्रपती शिवाजी महाराज उत्सव' राष्ट्रीय पातळीवर साजरा केला जातो. इ. स. १९८० साली १ मे रोजी साजरा होणाऱ्या या समारंभाचा प्रमुख पाहुणा म्हणून 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन'ने मला मॉरिशस बेटावर आमंत्रित केले. त्याप्रमाणे मी या दुसऱ्या मॉरिशस भेटीत बेटावर दहा आठवडे मुक्काम केला आणि विशेषच सखोल व व्यापक अशी मराठी समाजाची माहिती मी मराठी माणसाच्या वस्तीत घरोघरी जाऊन मिळविली. माझी ही संशोधनात्मक कामगिरी सफल व्हावी म्हणून 'मॉरिशस मराठी फेडरेशन'ने मला अव्याहत सर्व प्रकारचे सहाय्य दिले. शिवाय मॉरिशसनमधील 'महात्मा गांधी संस्थे'त तेथील अधिकारी वर्गाने व 'मॉरिशस लेखक संघा'चे कार्यवाह प्रा. आनंद सावंत मल्लु यांच्या मार्गदर्शनाने मी महाराष्ट्रातून मॉरिशस बेटावर स्थालांतरित झालेल्या मराठी माणसांची राखून ठेवले ठेवलेली इंग्रजी अमदानीतील दप्तरे धुंडाळली. त्यांचा अभ्यास केला. विस्तृत टीकाटिप्पणी केल्या. 'मॉरिशस देशा'वरील माझ्या आगामी ग्रंथात त्याबद्दल सविस्तर मी लिहिणारच आहे. या माझ्या दुसऱ्या मुक्कामात मॉरिशस बेटावरील मराठी भाषिक लेखक, कवी, लोकनाट्यकार, लोक-कलाकार व मराठी माणसांनी या बेटावर जोपासून ठेवलेल्या 'दशावतारी' लोककलेची मूळ संहिता व तिचे उपासक असे जुने नवे कलाकार मला भेटले. धर्मा गोविंद, देवजी पडीया, सदानंद भिवाजी, पुष्पाजी नारू, बाळशेट गोपाळ,

सौ. रत्नाबाय बापू, सदाशिव गोविंद जगताप, शिवाजी सोनीया, राम माल्लु, रूपसेन देवजी, चंद्रसेन बाप्पूनि इतर लेखक व कलावंत मंडळी मला भेटली.

'माहेरी गेली' ही आपली एका जाडजूड वहीत रेखीव देखण्या अक्षरात मराठीत लिहिलेली मोरस मराठी कहाणी धर्मा गोविंद यांनी मला वाचायला दिली. धर्मा गोविंद आता पंडित धर्मा गोविंद झाले आहेत. 'महात्मा गांधी संस्थे'तील 'मराठी भाषा पाठ्यपुस्तक मंडळ' विभागात ते काम करतात. मॉरिशस बेटावर ते भारतीय समाजातील धार्मिक विधी व लग्न सोहळे अधिकृत प्रशिक्षित धर्मपंडित म्हणून पार पाडतात. पन्नाशीत आलेले धर्मा गोविंद यांचे पूर्वज महाराष्ट्रातून शंभर दीडशे वर्षांपूर्वी या बेटावर गेले. काही आठदहा वर्षांपूर्वी महाराष्ट्र सरकारने मॉरिशस बेटावरील मराठी भाषेच्या शिक्षकांना पनवेल येथील 'प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण महाविदयालया'त मराठी शिक्षक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली होती. त्यावेळी धर्मा गोविंद, देवजी पडीया, सदानंद भिवाजी व अन्य शिक्षक-शिक्षिका महाराष्ट्रात आल्या होत्या. आपल्या पूर्वजांची भूमी त्यांनी भक्तिभावाने पाहिली. आज मॉरिशस बेटावर सरकारमान्य व खासगीरीत्या चालविलेल्या सत्तर मराठी शाळा असून सुमारे शंभर शिक्षकशिक्षिका त्या शाळांतून अध्यापक म्हणून काम करतात. इ.स. १९६४ सालापासून मॉरिशस बेटावरील प्राथमिक शिक्षणक्रमात मराठी भाषेचा, हिंदी, तेलगू, तामीळ, भोजपुरी या भारतीय भाषांबरोबर समावेश करण्यात आला. आता गेली पंधरा वर्षे मॉरिशस बेटावर 'महाराष्ट्र साहित्य परिषद' स्थापन झाली असून तिच्यातर्फे शनिवारी व रविवारी मराठी भाषेच्या विविध उच्च परीक्षांसाठी खास वर्ग घेतले जातात. मॉरिशस आकाशवाणी व दूरदर्शनवर मराठी भाषेचे कार्यक्रम सादर होतात. मॉरिशस बेटावरील मोरस मराठी भाषा त्या भाषेतील बोलणे व लिहिणे, हे एक भाषावास्तव आहे.

'माहेरी गेली' ही धर्मा गोविंद यांची कहाणी मॉरिशस बेटावरील पूर्वेकडील अशा एका दाट व अरण्यग्रस्त काळ्या नदीच्या परिसरात घडते, की ती स्थलकाळपात्रे या संदर्भात समजून घेण्यासाठी मॉरिशस बेटाची भौगोलिक रचना सुबुद्ध वाचकाने समजून घेणे आवश्यक आहे. 'तामारिन बे' किंवा तामारीन किंवा तामार खेडेगावात व ल मोर्ने, शामारेल, बे ज्यूकँप, या घनदाट व हिंदी महासागराला रूद्रभीषणपणे भिडलेल्या पहाडी भागात धर्मा गोविंद यांच्या कथेतील मराठी पात्रे वावरतात. मराठी माणसे प्रथम बोटी भरभरून जेव्हा ब्रिटिश दलालांनी मॉरिशस बेटावर नेली व त्यांना राहण्यासाठी बेटावरील स्थळांची निवड करण्याची संधी दिली तेव्हा मराठी मजुरांनी 'काळी नदी' व

तिचा पहाडी प्रदेश पसंत केला. त्याचे एक कारण म्हणजे महाराष्ट्रातून आलेल्या या मराठी मंडळींना हा पहाडी विभाग सह्याद्री पर्वतांच्या व भीमाकृष्णा गोदानदीच्या प्रदेशासारखा थेट वाटला. आज या काळ्या नदीच्या प्रदेशात त्यावेळचे मराठी समाजाचे नेते व द्रष्टे कै. लक्ष्मणराव व सौ. भागीरथीबाई पवार यांनी बांधलेले 'विठोबा रखुमाई'चे देऊळ ऐंशी वर्षे उभे आहे. धर्मा गोविंद या परिसरातील मराठी माणसांच्या जीवनाशी 'जो होय एक सुखदुःखपणी गडी तो' असे समरस झालेले आहेत. या बेटावरील कष्टकरी, कामकरी खेडूत मराठी स्त्रीपुरुषांची, तरुण-तरुणींची अद्‌भुत कहाणी धर्मा गोविंद यांनी आपल्या अद्‌भुत व अभिजात मोरस मराठी भाषेत सजीव साकार केली आहे. 'माहेरी गेली' या कथेतील काहीसे गूढ, अद्‌भुत व अमूर्त वातावरण धर्मा गोविंद थेट नेऊन मानवी सुखदुःखाच्या आंतरिक पण अनाकलनीय वास्तवाला विलक्षण प्रत्ययकारिकतेने व कलात्मकतेने नेऊन भिडवितात. हजारो मैलांवरच्या हिंदी महासागराच्या पोटातून कधीकाळी प्रचंड भूकंप होऊन जलपृष्ठावर आलेल्या मॉरिशस बेट नावाच्या इवल्याशा भूखंडावर वावरणारी ही कष्टकरी माणसे एका आपल्या भूत, वर्तमान व भविष्यकालीन भवितव्याशी जशी निगडित आहेत तशीच एका विशिष्ट समाजरचनेतही त्यांचे सामाजिक, मानसिक व आत्मिक पोषण झाले आहे. तशातही जातपात टिकून राहते पण तिला छेद मिळत जातो. धर्मा गोविंद यांनी केलेला मोरस मराठी समाजातील लोकगीतांचा वापर त्यांच्या कहाणीला उत्कट भावनिक परिमाणे प्राप्त करून देतो. खरोखर डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांनी ही कहाणी 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'तर्फे प्रकाशित करून मोरस मराठी भाषेला व मोरस मराठी माणसाला सांस्कृतिक व साहित्यिक उत्थापन दिले आहे.

*प्र. श्री. नेरूरकर*

# माहेरी गेली

१९७२ सालीच्या आश्विन महिन्याच्या सुरवातीला एके शनिवारी मी आपल्या शाळेतील मित्रांबरोबर ॲमोनच्या समुद्रा काठी सहलिला गेला होता. साढे नऊ वाजता आम्ही दऱ्याकाठी पोहोचलो होतो. त्या दिवशी आश्विनचा कडक उन्हाळा अंगावर झोंबत, होता. जवळच काही झावल्यांची झाडे होती. आम्ही सारे त्या झावल्यांचा झाडाखाली गेलो. सर्व समान ही तेथे आणलो.

मी रामा संगे दुकानाला कोका कोला व पावरोटी आण्यासाठी निघालो. दुकान थोड्याच अंतरावर होती. गप्पा मारीत दुकाना जवळ आलो. दुकानाचा ओशरीवर दोन कोळी आपल्या फाटक्या कपड्यात भिंतीला पाय टेकून उभे होते. एकाच्या हातात दारुची बाटली होती. आत एक बाई हिरव्या रंगाची मळकी पातळ नेसलेली होती. पातळीचे काही भाग दुरूस्त केलेले होते. तिच्या कमरेला एक लहानसा बाळ होता. तिने आपली टोपली फळीवर ठेवली होती. बाईंनी दुकानदाराशी दोन पाउन्ड तांदूळ मागितले. बाळ आईशी खाऊ मागू लागला पण आई त्याच्याकडे लक्ष देत नसे.

रामाने दुकानदाराला चार कोका कोला, एक पाकेट एमबासीचे सिगरेट, व दहा पावरोटी मागितल्या. चिनण्याचा मुलगा आतील खोलीतून आला. तो आमची मागणी पुरवीत होता. हट्टी बाळ पुन्ह पुन्ह 'खाऊ दे ;खाऊ दे'' अशी खाऊची मागणी पुरवीत अट धरून आईला बोचकडीत होता. इतक्यात बाईने त्या मुलाला दाटून बोलली. ''गप्प रहा.'' ते पाहून मी फळीवरच्या बरणीतून एक खाऊ त्या मुलाला देत होता.

''नको, राहू द्या.'' ती बाई म्हणाली.

''असं, नाही, बाई लहान पोर आहे. त्याला काय माहीत आहे. जर तुम्ही गरीब आहात की काय.'' मी म्हणालो.

"याला किती ही द्या तरी बसच नाही."

"दुकानातील हे सारे पाहून मोठ्या माणसाच्याच तोंडाला देखील पाणी सुटते. आणि हा तर पोर आहे. याला गरीब काय समजते." असे म्हणून त्या मुलाला खाऊ देऊन आम्ही दोघे दुकानातून निघालो.

रस्त्यावर मी रामाला सांगितले. "बघ, तू हे घेऊन चल मी तिकडून येतो की."

"बरं, लवकर ये अं!" रामा म्हणाला.

"हो, चल. मी आता येतो—अरे हो, ते विचारतील तर त्याना सांग फिरायला गेला आहे. थोड्या वेळाने येतो." मी त्यास म्हणाले.

रामा टोपळी घेऊन तिकडे गेला. मी इकडे तिकडे भटकत रस्त्याच्या उजव्या बाजूने जात होता. आता काय म्हणावे जवळपासची गावातील मुले तर मला मोठमोठ्या डोळ्यानी पाहत होती. रस्त्याच्या एकीकडे सागर आणि त्याच्या डाव्या बाजूस टिनाच्या पत्र्यानी मडवलेली घरे होती, तर एखादी घरे लपय व लकब्यानी बांधलेली होती. एका कोंक्रिटच्या घरा जवळ एक क्रिओलीन बाई आपल्या मुलाला अन्न भरवीत होती. एक दुसरी बाई आपल्या मुलाला गोदीत घेऊन दूध पाजीत होती. मी हा सर्व प्रकार बघीत जात होता. दोन तीन मुले माझ्या नावाने हाक मारत होती. त्यांच्या आवाज माझ्या ओळखीचाच होता. मी मागे वळून पाहिले तर कोणीच दिसे ना, म्हणून मी पुढे चाललो. ती आणखी तशीच "गोविन्द गुरूजी" हाक मारत होती. मी झट दिशी मागे वळलो तर ती मुले आपल्या सैपाक घराच्या खिडकीतून हाक मारीत होती. मी त्याना सलामी देण्यासाठी हात उचलला. मुलांना तर बरं वाटलं असावं, मला असे वाटले मी पुढे निघालो.

मी जिलोपुरी पर्यंत आला असावा की माझ्या समोर एक वृद्ध माणूस काठी टेकत येत होता. चालता चालता तो थकला असावा म्हणून तो रस्त्याच्या कडेला काठी रोवून त्यावर जोर देऊन एका दगडावर बसला. त्या वृद्ध अवस्थेत तो बिचारा रोगी ही दिसे. त्याने काळ्या रंगाचे सूट घातले होते. त्याचे दुरूस्त केलेले कपडे फाटलेले व मळके ही दिसत होते. त्याची दाढी मिशी वाढलेली व त्याचे पांढरे केस वाढलेच होते ;हे बोलायला नको. त्याचे तळहात व पायाचे तळवे उन्हामुळे फाटलेल्या जमिनी सारखे दिसत होते. गरीब बिचारा जिथे जिथे जात होता तिथे तिथे आपल्या बरोबर दुःखच दुःख झेलीत होता की काय असे त्याच्या चेहऱ्यावरून दिसले होते.

"बाबा, थकलात वाटतो?" मी त्याना विचारले.

"अं-थकलात हो?" असे म्हणून माझ्याकडे बघू लागले.

"आजारी आहात का?"

"आजारी तर पुष्कळ दिवसानीच आहे."

"मग अस एकटे का चालता?"

"या कुडीत जोवर प्राण हाय् तोवर माणसाला चाललं पाहिजे. काय म्हणता तुम्ही? माणसांची हालचाल तेव्हाच थांबते जेव्हा हा प्राण निघून जातो." ते असे म्हणून पूर्वेकडील रस्त्यावर बघू लागले.

"तुम्ही कुठे राहता बाबा?" मी विचारलो.

"कुठं राहतो. इथंच देवा! आणि कुठं राहू. ही माझी आई आहे हो! हिला एकटी सोडून कुठं जाऊं" ते जमिनीवर आपली काठी ठोकत बोलले.

"तुमची आई—कुठं आहे?" मी विचारलो.

"ही काय!" पुनः काठीने जमिनी कडे दाखवीत म्हणाले.

"कुठे हो?"

"हे पाहा, ही धरतरी माता हाय् ना. हीच माझी आई आहे; आणि कोण होऊं सकतं अं! तशी तर ती तुमची आई पण आहे."

"ती कशी?"

"तुमची आई तुम्हाला अन्न शिजवून देते. आणि जास्तीत जास्त थोडं लाड दाखवते. पण ही धरतरी माता अन्न उपजून पिकवून देते. लाखो लोक तिच्या स्तनपानाने माजले आहेत."

"हे सर्व तर ठीक आहे. पण तुमचे घर, तुमच्या घरातील माणसे? हे सारे मी विचारीत आहे."

"आईच्या मांडीवर बसणारा, आईच्या गोदीत खेळणारा बाळाला घराची गरज काय बाबू? राहिले घरचे लोक. ते तर तुम्हीच आहात. तुमच्या सारखे अनेक माणसं येतात नि जातात. ते माझे कुटुंब नव्हे का?"

"हे तर मी विसरले होते. बाबा तुम्ही आधी कुठे राहत होता?"

"मी कुठे राहत होता. ही तर एक जुनी कहाणी आहे."

"कहाणी जुनी आहे तर ती दिलचस्प असावी असे मला वाटतं. जरा सांगाना मी पण ऐकतो तुमची मजेदार कहाणी."

"तुम्ही माझी कहाणी ऐकाल?"

"हो, का ना? मला लोकावर घडून आलेली जुनी कहाणी फार आवडते."

"जर माझी कहाणी ऐकाल तर बसा. इथं बसा."

"बसतो. बरं आता आपली कहाणी खुषाल मनाने ऐकणार." मी त्याना असे सांगून त्यांच्या जवळच्या दगडावर बसलो. एवढ्यात एक काळी मोटार वायुवेगाने आमच्या समोरून गेली.

"आज काल काय मोटार चालवतात हे ड्राइव्हर लोक." ते त्या मोटारी कडे बघत म्हणाले.

"तरूण लोकांना कामच काय."

"बरं, ऐका." असे म्हणून ते मला आपली गोष्ट पुढे सांगू लागले.

# २

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी माझे वासतव्य वाक्ण्याला होते. माझे घरदार सर्व होते. माझी गुलाबासारखी आई आणि फक्त एक बहिण होती. घरातील लोकांचा मी एकुलता एक मुलगा असल्याने राजकुमार होता. माझे वडील हल्लीच देवाघरी गेले होते. त्या वेळी मी वीस एकवीस वर्षांचा असावा. माझे प्राथमिक शिक्षण चौथी पर्यंत झाले होते. आईने मला जमिनदारीची कामगिरी सांभाळण्यासाठी सांगितले. तसे ते काम मला आवडत नसे. माझा विचार काही दुसऱ्याच गोष्टीवर अवलंबून होता. पण आईची आज्ञा कशी मोडावी. तिच्या मनाला इजा होऊं नये म्हणून मी आईला त्या कामासाठी होकार दिला.

''मग काय झाले?'' मी त्याना विचारलो.

''ते पाहा तिकडे.'' आपल्या काठीने नैऋत्येकडे दाखवीत म्हणाले. म्हणजे माझ्या घरापासून सुमारे २६ मैलाच्या अंतरावर हे ऑमोन गाव आहे. आज प्रमाणे ते खेडेच होते. पण फरक इतकाच की पूर्वी या खेडवळ गावी पुष्कळ लोकांची बसती होती इथे. येथेच वडिलांची पन्नास साठ एकर जमीन होती. म्हणजे आपले लहानसे स्टेत होते. त्या कोपऱ्यावर जेथे तो नळ आहे. तेथे उभे राहून पाहाल तर हा रस्ता डाव्या बाजूला उत्तरेकडे पुढे सरकतो आणि पश्चिमेकडे नागमोडी वळणाने उतरत जातो मग पुनः सागर तीराला उत्तरेस डोकावतो. आणि उजव्या बाजूला पूर्वेकडे येताना रस्त्याच्या डाव्या बाजूला एक दुकान होती. ती वाट पुढे जाऊन उत्तर दिशेला वळते.

''तुमच्या वडिलांचे नाव काय? त्यांचा स्वभाव कसा होता? हे सारे आपल्याला कळले नाही अजून.'' मी त्याना विचारले.

माझ्या वडिलांचे नाव रामा. बाबा हे, कडक व शिस्तबध स्वभावाचे व्यक्ति होते.

त्यांनी नेहमी आपल्या नोकराशी शिस्त ठेवली होती. कामगारांना व शेतकऱ्याना थोडेच पैसे देऊन त्यांच्या कडून सदोदीत खूप काम करवून घेत होते. असे लोक म्हणत होते. ते खरे की खोटे हे तर आपल्याला माहीत नाही. होऊ सकते त्या वेळची स्थिती तशी होती. पण ती दीन दुबळी माणसे करणार तरी काय ते कुठेही गेले असते तर त्यांची तीच हाल झाली असती. पोट भरायला काम केलेच पाहिजे म्हणून ते बिचारे आपापली मान खाली करून सर्व प्रकारे जुलूम व अपमान मूठ आवळून सोसीत होते. एकीकडे त्यांच्या अविवेकाने त्यांना जखडून बांधले होते. दुसरी म्हणजे मालकाला तोंड देणे म्हणजे पाठीवर वेशणीची आसूड घेणे. त्या माराच्या एवजी त्यांना गप्प राहणे बरे वाटत होते.

सोमवारचा सोन्यासारखा दिवस उजाडला होता. नदी काठचा झुलझुल वारा वाहत होता. डोंगराच्या कुशीत शांभारेलची नही उत्सुक्तेने आपले मधुर तान सोडीत पुढे दक्षिण दिशेला जात होती. मी तिकडून आपल्या काळ्या व पांढऱ्या रंगाच्या मोटार सायकल वर बसून वाऱ्याच्या वेगाने उल्हषितपणा येत होता. ओफिसात जाण्यापूर्वी मी हवा खात पुढे निघालो. जाता जाता त्या नदीने मला बिणधोक अडविले. पाहतो तर पुढे जाण्यासाठी रस्ताच नव्हता !

मोटार सायकल थांबवून इकडे तिकडे पाहत त्या तीराने गवतामधून वाट शोधीत जात असता अलिकडे एक मळकट पायवाट दिसली. पुढे चालता चालता झाडाझुडपानी दाटलेल्या एका डोंगरावर पोहोचला. पुष्कळ चालण्याची सवई नसल्याने मी थोडेबहूत दमलो होतो. आणि आपल्या उजव्या हाताच्या तर्जनीने घाम पुसीत व सुस्कारा सोडीत, उजवा पाय एका दोन फुट उंचीच्या दगडावर टेकीत निसर्गाचा आनंद लुटत होता.

इतक्यात एक दहा अकरा वर्षाचा मुलगा आपल्या उजव्या खांद्यावर विळा घेतलेला आणि डाव्या हाताच्या काखाखाली धोंगरीने गुंडाळलेली कोरफडाची दोर घेऊन टनटन येत होता. तो मुलगा जात असता मान वळवून मागे मला पाहत होता. मात्र मी त्याच्याकडे पाहत नव्हता. मला तर काही दुसरीच कल्पना भासली होती. खरे म्हणजे मला सृष्टी पाहण्यात वेड लागली होती. त्याच घटकात काही तरी वस्तु पडल्याचा आवाज ऐकूं आला. उजव्या कडेच्या खांद्यावरून मी मान वळवून एक नजर टाकली, तर तो मुलगा विळा उचलीत होता.

"ए बाळ ! जरा थांब की." असे हाताने खुणा करीत त्यास म्हणालो. मग काय तो उभा असून मला बघत होता. त्या मुला जवळ जाऊन त्याचा गाळगुचा घेतला पण काय म्हणावे त्याला तर माझा बद्दल राग आला होता. तिथल्या गावा बद्दल काही माहिती

विचारायला त्याला अडविला. तो तर मला अनोळखी समजून की काय, मला घुरघुरूं लागला.

"तुझे नाव काय बाळ?" मी त्यास विचारले.

"रामू."

"किती चांगले नाव आहे."

"माझ्या नावाशी काय काम आहे. अं?"

"काय काम, तुझ्या नावाशी खूप काम आहे. बरं रामू हा कोणता गाव आहे?"

मी पहिल्यांदा या ठिकाणी आला होता. याच्या अगोदर ओफिसाशिवाई कुठे गेला नव्हता. त्या दिवशी काम करता करता दम निघाला होता. म्हणून मी विचार केला आज ओफिसात जाण्यापूर्वी पुढे काय आहे ते पाहून येऊ.

"माक्कोदे." असे माझ्या प्रश्नाचे उत्तर देत जात होता.

"अरे, थांब ना थोडं."

"का, काय हवं?" थांबून बोलला. त्याच्या या प्रश्नावर मी थक झालो.

"हे गाव फार छान आहे. अरे, काय मी तुला चोर दिसतोय?"

त्याने मला खाली वर पाहून थोडे शान्तपणाने म्हणाला, "बरं, बोला काय बोलाल तें."

"फार चौकश दिसतोस रे. बरं हे सांग पुढे काय आहे?"

"पुढे, म्हणजे तिकडे." बोटाने उत्तर दिशेला दाखवीत म्हणाला.

"हो, तिकडे."

"माणसांची घरे आहेत."

"त्या गावाचे नाव काय?"

"ब्यानोरी."

"इकडे माणसांची घरं दिसत नाही. का?"

"आहेत की."

"तू काय करतोस."

"साहेब काय करूं. गाईसाठी चारा आणतो?"

"माला गावाची वाट दाखवूं शकसील का?"

"मला उशीर झालय. आई माझी वाट पाहत असेल. थोडा वेळ इथेच थांबा की, मी जाऊन आता येतो." असे म्हणून रामू पुढे चालता झाला. त्या मुलाची चाल पाहून माझे

मन त्यावर रमले. मग मी इकडे तिकडे बघत तेथून प्रस्थान झालो ;जात होता की एकदम थांबलो. मागे फिरून पाहिले तर मला निसर्गाचे सुरम्य देखावे दिसले. डोंगराच्या चढणीवरून धबधब्याचे दुधासारखे पाणी या दगडावरून त्या दगडावर असे चार पाच चट्टाण आक्रमीत खाली उतरीत जात होते. ती नदी, खाली एका दरीत जाऊन कोसळली आणि पुढे सरकत पसरत जात होती की, वाटेत अथांग सागराने तिला पाहिले. त्याचे मन भरून आले. दुरूनच त्याने आपले दोन्ही हात उभारून तिच्या स्वागतासाठी उभा होता. जवळ गेली तर धावत येऊन त्याने आपल्या दोन्ही हातांनी तिला कुरवाळून धरले. दोघानी एकमेकास आलिंगन केले. जणू ह्या प्रेमळ वातावर्णात तिला मायेची पाखर मिळाली होती. ज्या प्रमाणे पुष्कळ दिवसानी एका बायकोचा नवरा घरी परत येतो. त्या नंतर पति पत्नि एक दुसऱ्याचे जसे मिलन होते. त्यांची ती प्रेमाची स्थिती कशी पळटते त्याच प्रमाणे इथे या नदीचे व सागराचे संगम झाले आहे. जणू यांचा उपभोग समजावा.

नदीच्या दोहोकडेला आम्रवृक्षाना मोहोर आला होता. लतावेळीना नाजूक कळया फुटल्या होता. त्या वेळी लता व आम्रवृक्षाचे एक रूप झाले होते. त्या झाडावर सोनेरी कैऱ्या तांबड्या झुबक्यात बसल्या होत्या. समोर चार पाच उंच उंच माडीवर कवळे नारळ लागले होते. त्यांच्या खाली हिरवळ पसरली होती. बियेफीची फुले फुलून काय ढीग लांदली होती. आणि इतर रानटी फुलांनी तिच्या तीराला बहारच सुटली होती.

जवळ पासच्या झाडांवर बुलबुल मधुर कुंजन करी आणि लांब लचक बेळूवर सुगरण गोड गाणी गात होती. आणखी सुगरण, रानटी कबुतरे, तुत्रेल व पायांकील या सारखे पक्षी निळ्या आकाशात तरंगत उडत होते. मी आपल्या उजवा हात वर नेत हनुवटीवर ठेवून तर्जनीने वरचा ओठ दाबला. माझे चित्त त्या भव्यतेवर एकाएक जडले. मी कौतुकाने त्या सुरम्य साजलेल्या दृष्याचे अवलोकन करीत होता. टेकडीवर चढत असता थोडा दमल्या सारखे वाटले, जवळच निळगिरीच्या सावळीत सुस्कारा सोडीत ओठानी फुस्स करून उभा राहिला. आणि इतक्यात माझा उजवा बाहु फरकूं लागला. "तुझ्या योग्यतेचे हे फळ कुठून आणूं. आणि ते ही या जंगलात. बरं ते सापडायचे कसे? ते सापडले, म्हणजे आपल्याला आकाशातून चंद्रच आणला. असे समजावे." असे हाताकडे पाहून स्वतःशी म्हणाला.

डाव्या हाताने वाकलेली झाडाची फांदी धरली. मान वर करून पाहिला तर आकाशात कापसा सारखी पांढरी शुभ्र ढगांची चादर वालत होती. मग मी स्वगत म्हणू लागलो. "वा ! किती छान. मला असे वाटते की देवाने हे स्थान आपल्या वास्तव्यासाठी निर्मिले आहे.

पाहा किती अद्‌भूत रचना आहे त्याची."

अकस्मात् माझी दृष्टी पलिकडे गेली. तेथे मला काय दिसले. तुम्हाला माहीत आहे?"

"नाही, सांगा ना. काय दिसले?" मी त्यांना सांगितले.

पर्वताच्या पायथ्या जवळ नदीच्या पात्रात परी लोक पोहत होत्या. पाण्याच्या पलिकडे पिवळ्या पुष्पांच्या परागातून परिपुष्ट पाचू त्या पिवळसर पतंगाना आपले पंख फडफडीत पिंगा घालीत असताना पाहत होती.

त्या एकांत स्थानी बाणासारख्या एक मधुर आवाज अचानक माझ्या कानाला येऊन चुंबला. त्या ध्वनी कडे कान देत, व हलकी पावळे टाकीत पुढे सरकत त्याच आवाजाच्या दिशेला जात होता की नदी ने माझी वाट पुनः अडवली. थबकून पाहिले तर नदी पसतीस चाळीस फुट वांडीत गेली होती.

तिच्या पूर्वेला थोड्या अंतरावर काही बदामाची मोठी उंच उंच झाडे होती. ज्यावर पिवळी तांबडी व हिरवी कोवळी पाळवी फुटली होती. आणि तिच्या परिसरात दगड धोंडे होते. या झाडामधून एक लहानशी वाकडी तिकडी मळलेली वाट डोकावत होती. त्या नागमोडी वळणाच्या दोन्ही बाजुला ललण्यांची झाडे दाटून गेली होती.

ह्या दरम्यानात एक सोळा सतरा वर्षाची तरूणी नाचत फिरत गिरक्या घेत गात गात येत होती. तिने ढोपरा पर्यंत लाल परकर घातलेला, त्याच्या खालच्या कडावर हातभर रूंदीचा पांढरा पटा लावलेला होता. आणि हिरव्या रंगाची चोळी तिच्या अंगावर कशी शोभून दिसत होती. पिवळ्या रंगाचे चीर कमरे पासून उजव्या स्तनाला झाकून डाव्या खांद्यावर पडून फडकत होते. ह्या कोवळ्या वयात तिच्या गोरा अंगावर तो तिरंगा पोशाख दुरून किती शोभून दिसत होता. ती कधी हिरणी सारखी धावत होती तर कधी ससा जसा अन् कधी तर अडकून अडकून उभी राहत होती. मग दोन्ही हात तोंडा जवळ आणून कबुतराच्या आवाजाचा अनुकरण करीत होती. आणि एकदम एका क्रुर जनावराने एका शेळीचा पाठलाग केला व ती आईचा आधार सोधीत ओरडत सुटते त्याच प्रमाणे तिचे सुद्धा अनुकरण करीत धावत सुटली.

मी तिच्याकडे जाण्याचा विचार केलाच होता. पण तिच्या जवळ जायला सोपे नव्हते. त्या उंचावरून खाली उडी टाकली की थेट यमपुराला पोहोचलो. एवढ्यात दोन अल्पवयाच्या मुली धावत आल्या. एकीचा हिरवा परकर, जाच्या खालच्या कडेला चार पांढऱ्या बारीक वाकड्या तिकड्या पट्या चमकत होत्या आणि तिची पांढरी चोळी व त्यावर पिवळे चीर मागून डाव्या काखा खालून पुढे बेंबी जवळ परकरात कोमचून, एक

कडा बाहेर लोंबत होता. दुसरीने निवळ हलका हिरवा परकर घातला होता. जांभळ्या रंगाच्या चोळीवर पुढच्या भागावर गुलाबाची फुले सुतानी रेखाटलेली होती. ऊन असल्यामुळे तिने आपला पदर डोक्यावर घेतला होता. त्याना बघून माझ्या मनाला एक प्रकाराने वेड लागली होती. मी त्या उतरणीवर वाट काढीत नदीच्या डाव्या तीरावरून जळपात्रात उतरून त्या तीराला गेला तर ती लावण्यवती नाहीशी झाली. मी आपली दृष्टी बरोबर सभोवार चालवली तर काही अंतरावर त्या दोघी मैत्रिणी त्या तरुणीला नेत असताना दिसल्या.

एक तर मी दमला होता. अन् पाण्यात पडून ही चिंब झाला होता. आता पाहाना ज्या आशने मी पैलतीर गाठले होते त्यावर पाणीच फिरल्या सारखे झाले. पण मी आपले धैर्य सोडले नव्हते. माझा विश्वास मुळीच खचला नव्हता. मी आपल्या ह्यातील कोणतेही काम अर्धवट सोडलेच नव्हते. त्या दिवशी मी आपल्या मनात पक्का निश्चय केला की या आठवड्याच्या आतल्या आत अवश्य तिची भेट गाठणार, तरच दम धरणार. त्या तिघी जनी तिकडे गेल्या मात्र मी एकटा जीवाचा राहिला. त्या क्षणी माझा धीर थोडा बहूत खचला म्हणून संतापलो, पण माझी स्वभिमानी वृत्ती जागली. तिकडून परत जाण्या शिवाय मला दुसरा मार्गच नव्हता. मी त्या स्थळातून परत निरूत्साह वाटेने आपल्या ओफिसात आलो.

म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
प्रा 237/2
मंत्रालय.

# ३

परतून आल्यावर काय पाहिले? कारकून मेजाजवळ एका खुर्चीवर बसला होता. नामावलीच्या व हिसोबाच्या तीन चार मोठमोठ्या वह्या भिंतीला सटून ठेवल्या होत्या. त्याच्या समोरील खिडकी उघडी होती. ज्यातून बाहेरील झाडाझुडपाची शेते व डोंगरमाळीचे सुरम्य नजारे दिसत होते. त्याच्या समोर एक भली मोठी वही उघडलेली होती. दौतात लेखणी बुडाली होती. चाळीशी नाकावर आणून मधल्या एका पानावर माणसांच्या कामा संबंधी काही हिसोब लिहीत होता. त्याच्या उजव्या बाजुच्या भिंतीवर माझ्या वडिलांचा जुना फोटो टांगलेला होता. त्याच्या पाठी मागच्या भिंतीवर हेंगर होते. एकावर एक टावेल लोंबत होता.

मी आत शिरलो की कारकूनाला माझी चाहूळ लागली, आपली चाळीशी सावरीत त्याने मला नमस्कार केला. कोट काढून हेंगरावर टांगत असताच मी त्यास विचारले.

"तबियत कशी आहे आपली?"

"ठीक आहे साहेब. आज कसा उशीर झाला. गाडी अगोदरच सुटली होती मला वाटतं."

"वाट चुकली होती." मी म्हणालो.

"कशी? अहो ! मी म्हणतो कोणाला तरी आपल्या बरोबर घेऊन येत जा नाही तर....."

"कुणाला आणूं आपल्या बरोबर."

"तुम्ही पण कशली बात करता. अरे बाबा ! आपला विचार तर काही उलटाच दिसतंय?"

"उलटंच दिसतंय. का?"

"बरं ते राहूं द्या तिकडे. कसे, काम व्यवस्थित चालले आहे ना?"

"हो ! सकाळी रामू व गोपाळ आले होते."

"का? काय झालं?" मी त्याना विचारले.

"अजारी असल्याने दोन आठवडे कामाला आले नव्हते."

"मग."

"उष्णे पैसे मागीत होते, पण देणार क़ोण?"

"ते गरीब आहेत की."

"गरीब आहेत, म्हणून काय....." हातातील लेखणी ठेऊन बोलले. "एक तर उणाड्या सारखे फिरत असतात. अन् वरून त्याना पैसे द्या. हूं !'

"आज त्याना पैसे नाही महणून ते आपल्याकडे आले होते. लक्ष्मण बुवा !माणसे का उणाड्यासारखे फिरतात? तुम्हाला माहीत आहे का? त्याचे कारण मी तुम्हाला सांगतो. त्या बिचाऱ्याना भर पोट जेवण मिळत नाही. त्याना चांगला पगार मिळत नाही. दरिद्र्याची बेबशीत त्यांना आपला हक्क मागायला अधिकार नसतो. तसं का?"

"साहेब, याना एकदा दिले की ते दर रोज हात पसरत राहतील."

पुढे दोन पावळे टाकून मेजावरून चहाची बाटली घेतली. थोडे मागे मुरडून कारकुनाला पाहिले. मग एका पांढऱ्या पेल्यात चहा ओतला. एक घोट पिऊन मी म्हणाला. "लक्ष्मण ! ते आले तर थांबायला सांगा. मी पलिकडच्या शेतात जात आहे. काही माणसे काम करीत आहेत. त्याना पाहून येतो."

"बरं ! बरं."

ऐन वेळी ते दोघे तिकडून गप्पा मारीत येत होते, हे खिडकीतून लक्ष्मणाला दिसले. तसे त्यानी मला हाक मारली.

"साहेब, ते येत आहेत?"

"कोण?"

"तेच दोघे, जाची मगाशी चर्चा केली होती."

"येऊन द्या." असे म्हणून मी निघून जात होता की ते दोघे गडी दारा जवळ येऊन उभे राहिले. मला पाहून त्यानी नम्रपणी नमस्कार केला.

"काय हवं? कोणत्या कामासाठी आलात? तुम्ही कोण?" मी त्यांस विचारले.

ते थोडे बहुत गोंधळले होते आणि घाबरल्या आवाज़ात त्यानी आपले नाव सांगितले.

"बरं, असं-तुम्हीच सकाळी आला होता. बरं, थांबा मी तिकडून येतो अन् पाहतो काय करायचे ते. लक्ष्मण जर कोणी आले की त्याना थांबायला सांगा. आणि हो !मी येई पर्यंत ते काम झाले पाहिजे." असे कारकुनास उद्देशून निघालो. पुनः आत जाऊन त्याना ते काम करण्यास बजावले. आपली मोटार सायकल घेऊन धडधडत वायू वेगाने गेला.

साहेब गेले. कारकून मात्र आपल्या ओफिसात काम करीत होते. हे दोघे गडी मोठमोठ्याने गप्पा मारू लागले. त्यांच्या या भेसूर आवाजानी त्या कारकुनाला काही अडचण पडीत होती. मग तो बाहेर येऊन, "हा बाजार आहे का, जे तुम्ही असे ओरडता. गप्प राहा नाही तर चालते व्हा. आपल्याला काय समजता हो?" "काय समजता—अरं ! आम्ही काय समजूं अं?"

"मी म्हणतो गप्प राहा." असे म्हणून ते आत शिरले. "एक तर बेकार अन् दूसरे पैसे शोधायला आले आहेत. तोंडात कामाचे नाव नाही. खामखा माणसाला परेशान करायला आले आहेत." असे स्वगत पुटपुटत आपल्या खिशेतून तंबाखुचा डबा व आगपेटी काढली. सिगरेट पेटवून आपल्या दोन्ही हातानी धरून चिलम सारखे ओढीत होता. मग विचार करीत आपल्या कामात गढून राहिला.

अर्धा तासानंतर मी परतून आलो. ते दोघे इथेच होते. मी कारकुनाकडून त्याना आत बोलाविले. ते विचारे माझा गंभीर चेहरा पाहून एकदम घाबरले होते.

"बरं, बोला काय हवं तुम्हाला?" मी त्याना विचारले.

ते तर स्तब्ध होऊन एकमेकांना बघून गांगरून गेले. त्यांच्या पैकी एकाने धीर धरुन म्हटले. "साहेब आम्ही आज़ारी होतो. काम झाले नाही. घरात एक दाणा सुद्धा नाही साहेब."

त्याचे हे बोलणे ऐकून लक्ष्मण तर रागाने फुगला होताच. "कोण कोण अजारी होते? जे आम्ही ताम्ही करीत आहेस."

"आम्ही दोघे साहेब." तो पहिला धिपाड माणूस म्हणाला.

"रामू मी तुला विचारत आहे. तुला एकट्याला, त्याला नाही विचारत मी, समजलास की नाही."

"हो, साहेब, घर चालवायला काही पैसे हवेत. दहा रूपये उष्णे द्या साहेब. काम करून दोन आठवड्यात परत करतो साहेब."

"तुला काय हवं?"

"मी तर आजारी होताच साहेब. पण काय बोलूं त्यात बायको पोरे देखील आजारी होती साहेब. तुम्हीच पाहाना."

"बरं पाहा, जा तिकडे पैसे घ्या अन् चालते व्हा. – लक्ष्मण याना पंधरा पंधरा रूपये द्या."

ते कारकुनाकडे गेले. पण कारकुनाने केवळ दहा रूपये प्रत्येकास दिले. त्यानी पंधरा रूपये सांगिले आणि ह्यांनी तर दहाच रूपये दिले. त्याना काही समजेना. विचार करीत पैसाकडे बघीत होते.

"आता काय हवं? पैसे गावले ना, तर चालते व्हा." लक्ष्मणाने सांगितले.

बिचारे काय बोलणार पैसे मिळाले, ठीक झाले ते जात होते की मी त्याना अडविले. "थांबा, पैसे मिळाले ना."

दुसरे काही न बोलता. "हो ठीक आहे."

"केव्हापासून कामाला लागणार?"

"उद्या पासून साहेब."

"आज काय झाले होते जे कामावर आलात नाही."

"याच साठी आलो होतो पण आपल्या......."

"बरं पाहा ! मी तुम्हाला पैसे दिले पण उद्यापासून नोकरीवर यायला पाहिजे समजले ना."

"हो साहेब जरूर येऊं."

असे सांगून दोघेजण पैसे घेऊन हर्ष मनाने गेले. मी आपल्या समोरच्या मेजावर दोन्ही पाय टेकून काही गोष्टीवर विचार करीत खुर्चीवर बसला होता. मग मी कारकुनास सांगून घरी गेला.

# ४

दुसऱ्या दिवशी पहाटेला लवकर आंधोळबिंधोळ आटोपून, प्रार्थना झाल्यावर मी कामाला निघालो. ओफिसात सुयोगाने सगळी कामे व्यवस्थित चालली होती. काम करीत असता माझ्या मनात काही विचार आले अन् त्याच बरोबर मी गुणगुण करू लागलो. झटदिशी माझा विचार पलिकडे धावला आणि मी उठून आपली मोटार सायकल घेऊन स्वार झालो.

ओफिसातून निघालो तर इकडे तिकडे गेला नव्हता, गेला होता तर थेट त्याच ठिकाणी जिथे एक दिवस पूर्वी आला होता. सायकल एका झावल्याच्या झाडाखाली उभी करून फिरत फिरत त्या कालच्या स्थळावर पोहोचलो. काल जेव्हा मी अचानक इकडे आला होता. तेव्हां मला काही नवळ दिसले होते. त्या नवळाईने माझा मनाला एक प्रकारची वेड लावली होती. म्हणून मला त्याच देखाण्याने मोठ्या आतुर्तेने ओढून आणले होते. त्या दिवशी मी आपल्या मनात त्या मुलीला भेटण्याचा निश्चय करून आलेला. मी तिथे अगोदरच झाडामागे एका झुडूपाच्या आड जाऊन लपला होता. तास भर तिची वाट पाहिली पण कोणीच त्या वाटेनं सरकले नव्हते. वाट पाहता पाहता जीव कंटाळला होता पण माझा निश्चय असा तसा बदलणारा नव्हता.

अखेरी पलिकडून एक बाई आपल्या डोक्यावर गवताची मोळी घेऊन येत होती. तिच्या पोषाखावरुन मला वाटले की तीच युवती येत होती. डोक्यावर गवत असल्याने तिला ओळखायला थोडे अवघड होते. ती बिचारी थकली मांदलेली बाई हळुहळु येत होती. त्या बदामी झाडा खाली येऊन तिने आपली मोळी धाडकन् आपटली. तिच्या अंगावर घाम फुटलेला. त्या मोळी जवळच्या भळ्या मोठ्या दगडावर झाडाची गर्द सावली होती. त्यावर जाऊन ती टसकून बसली आणि खांद्यावरचा कोयत्ता काढून खाली ठेवला. मग तिने निसंदेह आपला परकराचा कडा उचलून
तोंडावरचा घाम पुसला. एकाएक माझी दृष्टी तिच्या त्या उघड्या मांडीवर विद्युलता प्रमाणे येऊन पडली. आता काय बोलावे, त्या अर्धनंग गोरस मांडीवला पाहण्यात माझे मन किती उतावले झाले. जणू इतक्यात जसे कोणी तिच्या कानात सांगितले की काय, झटदिशी तिने ती झाकली.

मग मान उचंबलून उजवा हात वर करून तिने समोर पाहिले तर कोणी तरी येत होते असे तिला दिसले. तिच्या दोघी मैत्रिणी गवत घेऊन जवळ आल्या होत्या. त्या दोघीजनी देखील थकल्या होत्या, मोळ्या आपटून तिच्या जवळ जाऊन बसल्या. एकीने तिच्या कानात काही तरी सांगितले की त्या मोठ्या थाटाने हसल्या. तिसरीला काही समजेना,

त्या हसण्याचे कारण तिला कळे ना. इतक्यात पहिलीने तिला ते कानमंत्र दिले. आता घ्या तिघींचे हसणे. जणू काय हास्यस्पद गोष्ट होती ती असे मला वाटले.

मी त्या झुडपाच्या मात्र अडकून पडला. तेथून बाहेर पडायचे कसे. त्या दोघीनी आपले हात तिच्या खांद्यावर ठेवून एकीकडे बघत होत्या. ती मधली बाळा आपले पाय हलवीत होती. तिचे कोवळे हात त्यांच्या स्कंधावर टेकून त्या निळ्या आभाळाकडे हसत मुखाने पाहत होती. त्यांचे लक्ष आपल्याकडे नाही असे पाहून, हीच संधी साधून मी त्या झुडपाबाहेर निघालो.

त्यांच्या न कळत अकस्मात मी तिकडून त्यांच्या समोर प्रवेश झाला, त्या मुळे त्या थोडं बहुत दचकल्या. जवळच्या एका गवताची काडी ओढून मी त्यांच्या पुढे आलो.

"ए मुली ! तुम्ही कुठे राहता?" मी त्याना विचारले.

माझे बोलणे ऐकून त्या दोघी जणी आपल्या मैत्रिणीच्या तोंडाकडे पाहूं लागल्या. एक नजर माझ्यातर्फे फिरवली तर एक नजर आपल्या बहिणीकडे पाहून गप्पच राहिल्या.

"ए ! मधली बाई मी तुमच्याशी म्हणत आहे." पुनः तिच्याशी म्हटले.

"माझे नाव मधली बाई नव्हे. माझे नाव सरिता आहे. सरिता. समजले की नाही." माझ्या कडे न पाहता मात्र आकाशाकडे पाहत म्हणाली. "काय हवं आपल्याला?" तिचा तो प्रश्न ऐकून थक्क झालो.

"बरं सरिताबाई आपल्या चुकीबद्दल क्षमा असावी."

"कोणाकडून चूक झाली आहे."

"माझे म्हणणे असे आहे की, चूक तर माझ्याने झाली आहे मी त्या बद्दल माफी मागतो आहे."

"असं ! बरं, बरं !'

"अग बाई माझी !' दुसरी म्हणाली.

"आपले नाव किती सुंदर आहे. तुमचे रंग रुप पाहताच लोकाच्या मनाला काय मोह पाडते."

"असं ! यात काय नवळ दिसलंय अं ! ते तर मी आहेच."

"आईचा ! मी खरं म्हणतो?"

"काय तरूण मुलीशी बोलायला हे एक तरिका आहे का? हो हो ! बोला ना."

"हे कोठून उगवले आहेत? चला ग इथून, चला. ह्यांचे काय?"

असे म्हणून मालती गौरीचा हात धरुन ओढीत पुढे जात होती. आणि गौरी सरितेचा हात ओढून जाऊं लागली. तसे मी आपला हात तिच्या समोर आडवा आणून लिला पुढे जाऊं दिला नाही.

"हे काय हो !शरमं नाही. लाज वाट नाही की? आई बहीण नाही का तुमच्या घरी." सरिता म्हणाली.

"भला पाहुण्या माणसाने ह्या प्रकारी एका अणोळखी मुलीचा रस्ता अडविण्याचे कारण काय?" गौरी थोडे रागास येऊन म्हणाली.

"त्याचे कारण काय. आणि काय होऊं सकेल. अहो बागेतील वाढलेल्या हिरव्या कोवळ्या झाडाना तितकी शोभा येत नाही. मात्र त्यांच्या मधे फुले विकसीत झाल्यानेच सौंदर्य लाभते. त्या सौंदर्यपूर्ण बागेतील शोहळ्याचे स्वाद घेण्यासाठी काळा भुंगा फार दुरूनच येतो व त्या फुलांना तल्लीनतेने चुंबू लागतो. त्यात तो मस्त होतो. त्यातून निघे पर्यंत त्या फुलांच्या परागानी तो पिवळा धमक होऊन जातो. ते पहा ना."

एका फुलावरच्या भुंग्याकडे इशारा करीत सरलपणे सांगितलो. "जे काय बोलायचे आहे ते स्पष्ट बोला. या सगळ्याशी माझं काही संबंध नाही. .... नाही तर ..." तसे म्हणून ती माझा हात एकीकडे सारून जाणार होती. पण मी तिचा हात धरला.

"मी ज्या कामासाठी इथे आला होता. ते तर तुमच्या या सुंदरते ने भुलवून टाकले आहे. बरं, ते राहून द्या तिकडे."

"चल ग गौरे. या सरितेला काम नसेल की काय. तिचे काय, आई दटावेल तेव्हांच तिला कळेल ना." मालतीने गौरीला म्हटले.

"तुमच्या मैत्रिणी किती काळजी घेतात हो तुमची." मी तिच्या मुखचंद्र पाहत म्हणालो.

"मी लहान थोडीच आहे जे माझी काळजी घेणार त्या."

"हो, तर मी कशा पैकी इथं आला होता?"

"मला काय माहीत, कशाला आला होता ते."

"तुम्ही फुकट राग करता बाई. मी खरं सागंतो तुमच्या या रूपात काय जादू आहे. जे विचारायचे ते मी विसरले. हो, आता लक्षात आलं. इथली माणसं काय करतात?"

"इथली माणसं काय तुमच्या सारखं थोडंच काम करतात. ते तर दिवसभर माशा मारतात."

"तसं नाही, खरं, म्हणजे मी आपल्याला मना पासून म्हणतो. आपला विचार असा

की त्यांच्याशी मैत्री जोडून त्याना मदत करावी.''

''तुम्ही कोण, साधू धर्मात्मा आहात?''

''नाही.''

''आईबापानी आश्रम उघडलंय् का?''

''नाही.''

''हे नाही. ते नाही तर मग व्यर्थ वेळ का घालवता अं. जा चालते व्हा.''

''सरिताबाई, मला परका समजू नका. ती माणसे काय करतात? कशी वागतात? या बद्दल माहिती हवी आपल्याला.''

''इथली साधी माणसं मजुरी करून एक ओक्ताची भाकरी कमावतात. बायका गुरे पाळतात.'' असे तिने मंद स्वरात सांगितले.

''आपल्या घरी कोण कोण आहेत?''

''आपल्या घरी....'' असे अडथळून म्हणाली.

''हो म्हणजे तुमच्या घरी.''

''असे तर, आई, वडील, दोन बहिणी आणि एक सोन्या सारखा भाऊ.''

''ते ही मजुरी करतात का?''

त्या दोघी जणी आपापली मोळी उचलायला जात होत्या की त्याना इसारा करीत म्हणालो. ''थांबा मी मोळी उचलून देतो.'' लगेच त्यांची मोळी उचलून डोक्यावर दिली. मग मी सरितेची मोळी उचलायला गेलो. मोळी उचलत असता ती माझ्याकडे मी तिच्या कडे बघूं लागलो. मोळी अर्ध्यावर आणून थांबलो. तिकडून गौरीने आमच्या कडे पाहिले तर तिला काय दिसले. आम्हा दोघाच्या दृष्टीला एकच काळा स्वरूप भिडला होता. तसा प्रकार पाहून गौरीने मोळीचा तोळ माझ्या वर सोडला अन् खांकरली. तसे लगबगीने घाबरत ती मोळी सरितेच्या डोक्यावर उचलली. मग त्या तिघी जाऊ लागल्या.

''तुम्ही, जाता.'' मी तिच्या कडे पाहून म्हटले.

''हो !' तिने मागे वळून होकार दिला.

''आता, पुन्हा तुमची भेट कधी होईल.''

''मी त्या पलिकडच्या काठाला टेकडीवर राहते.'' माझे नक्की उत्तर न देता म्हणाली.

''मी तुमच्या घरचा पत्ता विचारीत नाही बाई. मी म्हणत आहे. आणखी केव्हां भेट होईल आपली.''

''दर रोज मी आपल्या बहिणी बरोबर गवताला येते.''

"उद्या आपली गाठ पडेल का?"

"हो माझी बहीण व मी..."

"अं, तुमच्या बहिणी येणार. तर झाली सुटका." असे म्हणून डोके खाजविले.

"तसं का? काय झालं? काही खोटं झालं का?"

"काही नाही. तुम्ही एकटी येणार नाही, मला वाटतं."

"एकटी, ना बाबा ना. यांच्या शिवाय कुठेही जात नाही."

"भीती वाटते का?"

"कसली भीती? मी कोणाहि भीत नाही."

"भीत नाही तर मग."

"वाघ थोडेच आहात जे मला मटकावणार. ही गोष्ट नाही. खरं तर त्यांच्या शिवाय कुठेही गेले नाही आज पावत. व जात नाही." असे म्हणत जात होती.

"जर तुम्ही येणार नाही तर माझी गोष्ट अपूर्ण राहील. येणार ना."

"बरं."

"आई सपथ."

मान हालवीत होकार देउन पुढे चालली. ती चालत होती तर कमर काय लचकत होते. जांघाना कशी वळणे येत होती. मी मागे उभा राहून तिच्या ठुमकिरी चालीवर आपल्या नयनाना एक वार तिकडे भिडवली होती. समोरच्या त्या मोडणीवर दिसेनासे होई पर्यंत एक टक पाहत राहिला कधी विचार करतो ना, त्या लावण्यवतीच्या सौंदर्याने मला कसे वेधून घेतले होते. शेवटी तिथून प्रस्थान होण्याची पाळी आली. दुपारी एक वाजले होते. कडक ऊन पडले होते.

"बरं, इतका वेळ? भूक लागली नव्हती का?" मी म्हाताऱ्याला विचारलं.

मला काय वेड्या कुत्र्याने चावले होते. जे मी उगीच वेळ घालवीत थांबणारा होता. काय बोलूं बाबू. तिच्या या काचे सारख्या रूपाने आणि तिच्या गुलाबी ओठानी जणू, मला नशा चढली होती.

मी परत घरी गेलो. घरी गेल्यावर पुस्तक वाचताना त्यावर माझे तेवढे लक्ष बसत नसे. रात्री पलगावर गेला की झोप लवकर येईना. आपल्या अंथरूणावर या कुशी वरून त्या कुशी वर एक सारखे तळमळ होता. थंडी खूप वाजत होती त्या मुळे किती उशिराने डोळ्यांना शुषुप्ती आली.

# ५

बराच वेळ झाला होता. तिकडे माझे मित्र माझी वाट पाहत होती. त्यानी मला सोधण्यासाठी रामाला पाठवले. सोधत सोधत राम आला.

"अरे ! तूं इथंआहेस. आम्ही तुझी वाट पाहत आहोत तिकडे."

"तूं, मी तूला सागिला होता ना. माझी काळजी घेऊ नकोस. सर्व नाश नाझे."

"काय सर्व नाश झाले. – हे कोण?"

"हे, सांगतो आता. – हे इथले एक गृहस्थ आहेत. – हा माझा मित्र रामा आहे."

"ठीक आहे." म्हतारा म्हणाला.

"अरे यार ! हे मला आपली कहाणी सांगत होते की तू मध्ये आलास."

"बरं. मी जातो तर."

"कोण तुला जायला सांगतय् आलास तर कहाणी ऐकून जा. – तुम्ही तंबाखू ओढता ना."

"आजकाल कोण तंबाखू ओढतय्." म्हतारा म्हणाला.

"अरे तुझ्याकडे एक सिग्रेट असेल तर दे ना." मी रामास सांगितले. रामाने खिशेतून एक एमबसी काढून त्या गृहस्थाना दिली. गृहस्थनी ती पेटवली.

"चल रे, ते तिकडे तुझी वाट पाहत आहेत."

"थांब ना पुरी गोष्ट ऐकली नाही अजून आणि तू म्हणतोस चल. अरे बाबा, चालून चालून थकला आहेस की थोडं थांब स्वास घे घे मग आपण जाऊं. – हो, तर मग पुढे काय झाले?" मी म्हताऱ्याला विचारले.

"मला सरितेची वेड झोकानी लागली होती." ते गृहस्थ असे म्हणाले. वेड लागली. असे ऐकताच रामाला हसूं आवरता आहे नाही. पोट धरून खो खो हसूं लागला. "अरे, झालं तरी काय?" मी म्हताऱ्याच्या तोंडा कडे बघून रामाला विचारलो.

"म्हाताऱ्याला वेड झोकानी लागली." रामा हसत हसत म्हणाला.

"काय, काय, वेड झोकानी लागली." असे विचारीत या गोष्टीवर लक्ष देऊन मी पण हसूं लागला. मला बघून म्हाताराही हसू लागला.

"गप्प बस रे–सांगा हो."

"हो तर मी म्हणत होता." जसे म्हाताऱ्याने पुनः कहाणी आरंभली तसे रामा आणखी हसू लागला. या वेळी मी आपल्या हाताने त्याचे तोंड बंद केले व म्हताऱ्याला सांगितले. "सुरु करा हो."

हो, तर मी काय म्हणत होता. मला सरितेची वेड झोकाने लागली होती. जसे नदीला

पूर येतो तसा. बागेतील कोवळी नाजूक सुमनाना पाहून मधुकर मोहून जातो. त्याच स्थितीत हा राव साहेब देखील सापडला.

पहिल्या मुलाखतीत तिने मला जे वचन दिले होते. असा समजा की त्यात माझा करारच झाला होता. म्हटल्या प्रमाणे सरिता अगोदरच आपल्या बहिणी बरोबर गवत आणण्याच्या निमिताने त्या ठिकाणी पोहोचली होती. मालती व गौरी एकीकडे चारा कापत होत्या. सरिता दुसरीकडे एकटीच रानात शिरली. एकटी असून घाई घाईने हिरवी ताजी तवानी कासिया कापत होती. चारा गोळा करून बाहेर निघाली. एक पंजा गवत रस्त्यावर ठेवून पुनः रानात शिरली. सर्व कापलेले गवत बाहेर काढून; सहा दोरा अंथरून त्यावर ते गवत व्यवस्थित एक चांगली झुबकेदार मोळी बांधली.

मी इकडून अधासा सारखा धापा टाकीत जात होता. मला बघून ती रस्त्याजवळ ललण्याच्या झाडा आड लपली. त्या ठिकाणी पोहोचल्यावर मला कोणीच दिसले नाही, म्हणून चहुंकडे नजर टाकून एका झाडाजवळ उभा होता. अचानक माझी दृष्टी झाडाच्या पानात डरलेल्या एका पक्षीवर गेली. मग माझ्या लक्षात तिच्या प्रति काही विचार बालगून तिला शोधू लागला. तिथे कोणाला ही न पाहता मी स्वतःशी म्हणाला. "हे काय, इथे तर कोणीच नाही. तिने मला फसवले वाटते."

मग दोन तीन पावले पुढे टाकून एका ब्याजोजोच्या झुबक्या तरू समोर आला. तिथे गवताची बांधलेली मोळी पाहून आपल्या मनाला थोडे तरी सांतवन झाले. क्वचित माझे मन अजून बुचकल्यात पडले होते. मला नक्की माहीत नव्हते जर ती मोळी सरितेचीच होती

किवां इतांची होती. झटदिशी माझ्या अंतःकरणातून एक मंद आवाज निघाला.

"ती इथेच आहे."

"ती इथेच आहे. कुठं?"

"कुठं तरी लपली आहे."

जवळच एक जुनी दगडाल भिंत उभी होती. त्यावर चढून मी इकडे तिकडे तिला बघीत होता. आणि ती त्या पुढच्या ललण्याच्या पानाच्या छिद्रातून हुलकत होती. गमत म्हणून तिने माझ्या मागे एक लहानसा गोटा टाकला. मी एकदम घाबरलो. पुनः तिकडे डोकावले की तिने एक दगड उचलून थोड्या अंतरावर फेकले. सावध होत त्या ठिकाणी गेला, तोवर गौरी गवत घेऊन माझ्या समोर आली होती. तीहि किती सुंदर होती. तिला पाहून क्षणार्धासाठी स्तबध झाला. तिने माझ्याकडे पाहिले आणि झट आपल्या वाटेने

झपाझप माझ्या समोरून निघाली. त्या वेळी सरिता त्या झाडामागून आपल्या हातात थोडे गवत घेऊन पलिकडून निघाली ;जसे तिला काहीच माहीत नव्हते. आणि दुरून मला खूप पाहत होती.

"अग बाई, तुमची, ती मैत्रीण कुठं आहे. ती आली नाही का?" मी गौरीला इशारा करीत विचारले.

"ए साहेब !माझं नाव अग बाई नव्हं. माझं नाव गौरी हाय, गौरी समजलाव की नाय. खबरदार अशी आणखी हरकत केली तर..." असे मागे वळून थोडी नाराजगी दाखवून म्हणाली.

"बापरे बाप ! ही तर कोपलेली मरी आईच निघाली."

ओठ दाबीत उजव्या हाताची बोटे हालवीत, एक पाय वर उचलून स्वतःशी उद्गारलो. "बरं बाई, या लहानशी चुकी साठी माफी असावी." तिच्या पुढे जाऊन हात जोडून विनवणीने म्हणाला.

गौरीला ते हसू आवरता आले नाही. तोंड एकीकडे करून खुदकन हसली. दोन पद पुढे चालली की मी तिला पुन्हा हाक मारली.

"गौरी बाई ! थांबा ना थोडे."

"काय हवं?"

"अग बाई तुमची...."

"आणिक अग बाई."

"गौरी बाई तुमची मैत्रीण कुठे आहे हो. ती दिसत नाही."

"मैत्रीण."

"हो, काल तुमच्या बरोबर आलेली ती."

"मला काय माहीत, कशली मैत्रीण आणि कुठली मैत्रीण. हं." तोंड नाक वाकडे करीत बोलली.

"गौरीबाई, तुम्ही किती चांगली आहात हो."

"मस्करी करायला तुम्हाला खूप येतं की."

"तुमची कसली मस्करी करूं मी. ज्यानी तुम्हाला निर्मियले तोच त्याचा पात्र आहे."

"वा ! वा !' अशी म्हणताच सरिता विळा धरून येत असताना तिला दिसली.

"ती पाहा आपली सोबती येत आहे."

"आपली सोबती."

"आपली नाय् तर काय तुमची."

"मी कधी म्हटलं की माझी सोबती आहे."

"सरिता, हे तुला शोधत्यात ग ! तेही कुठं, जंगलात. सांभाळबाई आपला. मी चालते." असे म्हणून ती गेली.

"ही !'

तिला आपल्या दृष्टी समोर पाहून आपल्या अधीर मनाला धीर आला, जीवात जीव आला, शरीरात आणखी शक्ति आली. एकमेकाना पाहून दोघेजन क्षणभर मुर्तिमंत झालो. काय म्हणू. त्या वेळी मध्यमार्गी तिक्षण बाणासारखी एकमेकाची नजर जुळली.

इतक्यात आकाशात गमन करणारा प्रभाकर आम्हाला एक अनुरुप जोडपे समजून आनंदाने व्योम मंडपात लोंबला होता. आम्हाला आर्शीवाद देण्यासाठी त्याने मेघराजाला पाठवले. याच अवधीत मेघमंडळानी पावसाची वृष्टी केली. अवचितच आमच्यावर पावसाची सर कोसळू लागली त्यामुळे आम्हाला चेत्त आला.

लगबगीने तिचा डाव्या हाताचा पंजा धरून पुढे पुढे धावत, तिला ओढीत त्या भल्या मोठ्या वृक्षा खाली नेले. मी केव्हा आला होता. हे सर्व आमच्यापैकी कोणी हि अगोदर विचारले नव्हते.

"याच वेळी या पावसाला यायचा होता." पाठीमागून तिच्या खांद्यावर उजवा हात ठेवून म्हणाला.

"आणि तुम्हाला या वेळी यायला हवा होता अं" माझ्या हनुवटीस तर्जणी फासून म्हणाली.

"हो की, पहा ना, मला सुद्धा याच वेळी यायला हवा होता बरं. – मी एक गोष्ट विसरली."

"ते काय?"

"तुमचा निरोप घ्यायला. तुम्ही बरं आहात का."

"माझा निरोप घ्यायला. मी आजारी असते तर इथे आले असते का?"

"तुमचा नाही हो."

"तर कुणाचा?"

"त्यांचा."

"त्यांचा."

"हो, तुमच्या घरची माणसे बरी आहेत का? हे सर्व विचारायला विसरलो."

"ओ ! हो ! असं बोलाना."

त्या दिवशी वाऱ्याने मेघमंडळाना बेडकांच्या लग्नांत, बेडकांना आशिर्वाद देण्यासाठी अगोदरच आमंत्रन पाठवले होते. रस्त्याने येत असताना सर्व पारवांना, हरणांना, पाडसांना व सशांना हि बोलावले होते. ती सारी जनावरे बेडकाचे लगीन पाहायला मोठ्या उत्सुक्तने निघाली होती. जाता जाता वाटेत त्यांना अंधार भेटला होता. त्या मुळे ती आक्रोशत होती. हरणे-पाडसे ठेचालू लागली. वाट दिसे नासे झाली.जनावरे किंकाळू लागली. तोवर सारे वऱ्हाड एका वडाच्या झाडा खाली आले होते. बेडकाच्या घरी काय थाट, काय सोहळा साजला होता. काय मंगळ वाद्ये वाजत होती. ते ऐकून वऱ्हाड मडळी म्हणाली. "चला आपण इथूनच बेडकाचे लगीन पाहू या." झिमझिम पाऊस पडूं लागला.

एवढ्यात पुनः वळवाचा पाऊस आला. वरूण देवाने असा सोसाटयाचा वारा पाठवला ज्याचा झोकाने झाडाच्या पानांत खिंडार पडली. एक झोक पाऊस तिच्या तोंडावर पडला. तिच्याकडे पाहून मी सोंग करूं लागला की दुसरा झोक डोक्यावर पडला. दोघेजण काय थटाने हसलो. तिकडून मालती व गौरी गवत घेऊन भिजत येत होत्या. गवत ठेवून घाईघाईने जवळच्या एका ब्यानोआरच्या झाडाखाली दडल्या.

मालती गौरीच्या डाव्या बाजूला उभी होती. कमरेला कोमचलेला पदर ओढून मुखावर दोन चार लाकासीयाची हिरवी पिवळी पाने चिटकावलेली व वरून पावसाचे पडलेले थेंब पुसत होती. थंडीने त्यांचे अंग थरथरत होते मी. आपल्या बोटाने तोंडावरचे पाणी पुसून खाली झडकावले. सरितेची अंग थंडीने काकडत होते. तिचे ओष्ट खालीवर होत कंपीत होते. तिचे दात कणकणत होते. तिला त्या कंपीत अवस्थेत पाहून माझी दृष्टी अवचित मालती व गौरीच्या गारठल्या अवस्थेवर भिडली. हा प्रकार पाहून अवलोकून सरितेच्या स्कंधावर हात स्पर्शला. तिने मान वळवून माझ्याकडे एक हास्य पूर्ण नजर टाकली. लगेच मी त्या दोघीकडे बोटाने इशारा करून दाखवले.

झाडाखाली आम्ही दोघे जवळ असून एकमेकापासून अंतर राखलो होतो. पण असा वाटतो की तसा प्रकार मेघराजाला आवडला नव्हता. आम्हा दोघांना आलिंगन करण्यासाठी त्याने एक युक्ति काढली. लगेच त्या घनातून सिंहासारखा भयंकर आवाजाची गरजना उत्पन्न केली. बरे आता या पुढे काय बोलावे. त्या आभाळाच्या विस्फोट आवाजाने त्या भिजलेल्या जमिनीवरून झटकन् माझ्या छातीशी येऊन चिटकावली. आम्हाला बघून आकाश मार्गाने जात असलेली तड्डीत मोठ्या थाटाने हसली. तेव्हां आम्ही एकमेकाला घट्ट कवलटून धरलो. आमच्या रोमरोमात वीज संचरली.

दोघांच्या पापण्या मिटल्या, असे थोड्या वेळेसाठी आम्ही मुर्तिमंत झालो. इतक्यात आभाळ पुनः गराजले. आम्ही एकदुसऱ्याला मळमळत आणखी गच्च धरलो. या दृष्टीने मेघराजाने आपली युक्ति मांडून आपली कल्पना अचूक ठरवली. या उपकारासाठी मेघराजाला शाबासकी दिली पाहिजे म्हणून वीज प्रचंड ज्वाला आणून आमच्यावर ताडदिशी भासली.

या थडाक्याच्या साह्याने आमचे झालेले एक रूप उजेडात आले. ते पाहून गौरीने मालतीला खेचून म्हणाली. "ते बघ तिकडे."

इकडे बघून पोट भरून हसूं लागल्या. मग मी सरितेला बघू लागलो, ती मला बघू लागली. तिने माझा हात आपल्या वरून काढला व एकीकडे होऊन मान थोडी बहुत खाली करून लाजली.

"ह्या ईश्वराच्या काम पाहा, किती निराळे आहे. योगा योगाने या कडक उन्हाळ्यात अवचित पाऊस पाडणे, एकाक्षणात आधार सोधणे आणि दूर असलेल्या लोकाना जवळ आणणे, मग त्यांच्यात एकरूपता समावणे. ही सुयोगाची गोष्ट नव्हे काय !' तिने माझ्या या गोष्टीवर लक्ष देऊन माझ्या चेहऱ्याकडे एक नजर पाहिले.

"हे देवा ! ह्याच प्रमाणे जर तुझी कृपा रोज आम्हांवर असली असती तर किती बरे झाले असते. आमच्या जीवनात कधीहि वेगळेपणा राहिले नसते." आकाशाकडे हात उचलीत पाहत. सरिता मात्र विचारात पडली होती.

"सरिता" मंदगतीने तिच्या कडे पाहून मी हाक मारली.

"अं."

"तुला कसे वाटते?"

"कसे वाटते? काय?" असे बोलून आपल्या डोक्यावरील पदर सावरून एक टोक दाताखाली दाबला. आणि एकीकडे बघून ओठावरू गोडी आणली. मला काही ऐकूं आले म्हणून मी डाव्या बाजूला वळला. याच ओक्ताला त्याची नजर चुकून ती उजव्या बाजूने सरकंत नाहीशी झाली. इकडे पाहिलो तर एकाएक कुठे तरी गुप्त झाली होती.

"सरिता-सरिता-सरिता." असे हाक मारली. "अरे ! कुठं गेली ही." पण ती गप्प बसली होती. त्या क्षणी झाडाच्या पलिकडे एक पाय मागे झाडाला टेकून उभी होती.

"तूं इथे आहेस?" मी विचारले.

"अं."

"मला वाटतं तूं काळजीत दिसतेस." थोडं जवळ जाऊन म्हणाला.

"काळजी, नाही तर कशली काळजी?"

"नाही तर का गप्प दडलीस."

"मला कोणाची भिती आहे का, जे मी दडणार."

"असं, कोणाचीहि भिती नाही? बरं मला ही भीत नाहीस?"

"तुम्हाला, तुम्ही वाघ थोडेच आहात, जे मला खाऊन टाकणार."

"एवढा विश्वास, माझ्यावर, ते कशापैकी."

"विश्वास, अहो मुलीने जर आपल्या मनापासून एका पुरूषाला मानले, तर ती त्या पुरूषाला देव समजून त्याची पूजा करते."

"खरं, सरिता, आज माझ्या मनाचे ओझे दूर केलीस." असे बोलून तिला दोन्ही हातानी कवलटून आपल्या उराशी गच्च धरले. "किती भाग्यशाली आहे मी." असे म्हणून तिचा आनंदाचा पाराच फुटला. तिचे गाळ धरून दोन्ही कडे चटाचट तिचा मुका घेतला.

"तुझ्यापेक्षा भाग्यवान तर मी...." असे वदून आम्ही दोघे गवताच्या अंथरलेल्या ओळी गादीवर बसलो.

"फार विचित्र आहेस."

"बाबा पण मला विचित्रच म्हणतात."

"तुझे वडील काय करतात?"

"ते सरदारी करतात."

"बरं, इकडचे लोक कसे आहेत?"

"इथली गरीब माणसं उदार मनांची आहेत. कष्टाळू व प्रमाणीक प्रवृत्ति भोळी माणसं आपल्या बेबशी शिवाय करणार ती."

"तसे तर तू सुद्धा भोळी दिसतेस." असे बोलून तिच्या ओळसर कुलल्यावर आपला हात स्पर्षला. घाबरल्या नजरेने माझ्या कडे पाहून माझ्या हाताला एक असा झटका दिला जणू मला विजेचा झटकाच लागला होता.

"हे काय करता शरम नाही हो. कोणी पाहिले तर."

"हे शरमविरम कुठून आलं अं ! मगाशीच मला सर्वव्यापक परमेश्वराची उपाधी दिलीस. अन् आता शरमाची अट लावतेस. हं !

"नाही तर काय? मी म्हणते कोणी पाहिले तर." लाडी गोडीने म्हणाली.

"आमच्यादोघा शिवाय कोण आलय् इथं?"

"कोण आहे? ते पाहा."

"कुठे?"

एका हाताने माझे डोके वळवून फांदीवरून आपल्या तर्फे पाहणारे पक्षीणीकडे तिने इशारा केला. पाउस पडतच होता. अधुनमधून आभाळ गरजत होते. विजा चमकत होत्या. ती चिमुकली पाखरे कशी प्रेमाने एक दुसऱ्याच्या पंखात चोच घालून, तर कधी एकमेकाना चोचीला चोच सटवून काहीतरी सांगत होती. त्या पाखरांना असे थाटाने हसूं लागलो की तिकडे त्या दोघी बहिणीनी आमच्या हसण्याचा आवाज ऐकला.

"काय गप्पा गोष्टी चाललेय ग तिकडे." गौरी मालतीकडे बघून बोलली.

"माहीत नाय ग ! काय करीत हायत ते."

"चल बघूंया."

"चल."

असे म्हणून दोघी त्या पावसात धावतच त्या झाडाखाली आल्या. आणि गुपचुप आम्हाला हुलकून पाहत होता. त्याना काही समजले असावे की काय, म्हणून एक इकडून तर दुसरी तिकडून आल्या. त्याना आपल्या समोर पाहून माझ्या जीवाचा तिलपापड झाला होता.

"अं ! असं, आता कुठं जाशील. चल आज बाबाना तुझी सगळी करणी सांगते की. चल ना ! अं, अशी, अलबत तू घास कापायला आली होतीस ना. चल ना बरं." त्या दोघी म्हणाल्या.

आम्ही लज्जीतपणाने उठलो. सरिता हात जोडून गयावया करूं लागली. कारण ती एकदम घाबरली होती.

"मी हात जोडते बाई, बाबांना बोलूं नका ग. नाही तर... "

"आज आम्ही सगळ्यानाच सांगणार. काही बोलूं नकोस. काय समजतेस तू माणसाला. खरोखर बोल, काय करीत होतीस झाडामागे."

"खरं, सांगते बाई काहीच नाही बाई." असे ती विनवीत म्हणाली.

"काही नाही अं काही नाही." असे बोलून दोघ्यापैकी एकीने गाणे सुरू केले.

मुलगीः— शहराच्या पाहुणा कोठून आला<br>
झिमझिम पाऊस घेऊन आला<br>
गावाच्या मुलीला फसवायला।। अग बाई गावाच्या मुलीला फसवायला।।

मोठमोठे डोळे काढून बघतो कसा
बघा बाघाचा जबडा उघडतो जसा
सोंगाडी नखरा करायला आला॥

वाटेत तिच्या आला एक बावा
प्रेमेच्या भिक्षेला आला हो बुवा
झोळीत भरून नेला ग तिला॥

आण ग काठी घालूया मेळ्याच्या पाठी
गावात घालूंया त्याची ग मोठी बाटी
सबक शिकवतो ग सोंगाड्याला॥

भिमरावः— नको नको बाई, सोडा हो मला
परगावी जायला हवा हो मला
नको मारू नको झोडपूं पाहुण्याला
मी तर तुमच्या बहिणीचा होणारा नवरा॥

गौरी व मालती गाणे म्हणत असता मी ही त्याच भरात गाऊं लागलो.

इकडे मुली रानात मौजेने गाणे म्हणत होत्या. तिकडे आई घरात तांदूळ निवडीत विचार करीत होती. "कुठं आहेत ह्या ! एवढा वळवाचा पाऊस पडत आहे. अजून यांचा पत्ता नाही. काय बोलूं याना मी." ह्या प्रकारी मुलींची काळजी घेत रूक्मिणीबाई आपल्याशीच म्हणाल्या. ऐन वेळी शंकर भिजलेल्या अवस्थेत कुरकुरत घराचे दार ढकलत आत प्रवेश झाले. त्यांच्या काखाखाली भाताची टोपळी होती. आणि उजव्या हातातील काही, जिच्या खालचा भाग लोखंडी व टोकदार होता. कपडे भिजले होते.

"भिजत आलाव?" रूक्मिणी बाई असे म्हणून उठून कपडे आणायला गेल्या. ते त्यानी आपला कोट काढला. तोवर त्या तिकडून कपडे घेऊन आल्या. "बघा श्याप भिजलात ना."

"काय करू. संबाकडे थोडा वेळ थांबला. पाऊस सुटलाय असं पाहून मी धावत निघालो. येता येता वाटे मधीच आणिक पाऊस पडू लागला." असे काठी खुंटीवर अडकवून व बायकोला टोपळी देत म्हणाले.

"पोरं कुठं हायत."

"घासाला गेल्यात हाय्. अजून त्यांचा पत्ता नाय्. मला वाटतय त्यांना पाऊस दिसत नाय्." नवऱ्याला कपडे देत म्हणाल्या.

"तिघी जणी." असे कुरकुरत म्हणाले.

"हो, तिघीजणी"

"चहा गरम कर मी अंघोळ करून येतोय." असे म्हणून ते गेले. बायकोने चहा साठी पातेल्यात पाणी ओतून चुळीवर ठेवले. आणि त्या पुनः तांदूळ निवडूं लागल्या.

पाऊस अजून सुटला नव्हता. अंगणात तांबडे पाणी तुडुंबले होते. पक्षी घराच्या वळचणीस शिरून झोप घेत होते. घुरानी मळलेली लहान मोठी झाडे झुडपे व गवताची अंगे पावसाच्या त्या उघळत्या सरीनी धुऊन साफ सुफ झाले होते. पावसाचे पाणी पिऊन पिऊन झाडाचे पाट फुगून जड झाले होते. त्यांची हिरवी पाने टवटवीत झाली होती. रानातील ह्या पावसाचा देखावा फार देखना होता. अशी कल्पना करीत मी देवाचे काम पाहत होतो. पाऊस लगबग उबाला होता. आमचे गाणे संपल्यावर पावणे दोन वाजायला आले होते. "चला ग." असे म्हणत सरितेचा हात धरीत मालती व गौरी आपल्या गवता जवळ धावत गेल्या. पाऊस एकदम थांबला होता. मी झाडाखाली एकटाच राहिला. इतक्यात आकाशातील ढगात रविने आपल्या तेजोमय शक्तिने भोक पाडून धरित्रीवरील दाट हिरवळीवर चमचम करूं लागला.

"लवकर बांधा ग! एवढा उशीर का लावलात."

"तिकडे हिला खूप वाढलेले कासिया दिसले. अन् कापायला गेली की चार पाच पिवळ्या माशा येऊन डसल्या." असे गवताचे पाणी एकीकडे झाडीत, ते दोरीवर ठेवीत गौरी बोलली.

"मी ऐवढे गवत नेणार नाही. पावसाने भिजलेली मोळी फार जड होईल. हे धर थोडे तू घे." असे म्हणत मालती गौरीला थोडे गवत देत होती. सरितेची मोळी बांधून झाली व तिने ती मोळी थोडे वर उचलून खाली आपटीत होती. असे दोन तीनदा तिने उचल आपट केली. तोवर मी तिच्या जवळ उभा राहिला. त्या दोघीनी ही आपापली मोळी बांधली. मोळी उचलून त्यांच्या डोकीवर ठेवण्यात मदत केली. मग आपण तेथून निघालो. सरिता त्यांच्या मागे होती आणि तिच्या उजव्या बाजूने मी तिच्याशी गप्पा मारीत जात होता. आम्ही सारे ओळेचिंब झालो होतो. वाट वाकडी तिकडी असून पावसामुळे एकदम बिकटून माखलेली. नदिला पुलापर्यंत पूर आला होता. त्या लाकडी सेतूला ओळांडून पलिकडच्या तीरावर आलो. समोर एके ठिकाणी थोडी सपाट जागा दिसली, येथे त्यांनी आपल्या मोळ्या आपटल्या.

माशानी डसल्यामुळे मालतीला थोडे बहुत दुःख सोसावे पडले. त्या मुळे ती जास्त दमळी होती.

"आह ! उफ ! ओ ओ ! बापरे बाप !" कमरेवर हात टेकत उदगारली. त्या दोघींना टेकडीच्या चढणीवर चढताना काहीसा कंटाळा वाटला नव्हता. पण मालती बिचारी कशीबशी टेकडी चढली. तोवर त्या दोघी घरी पोहोचल्या असाव्या. आणि हिला तर थोडा उशीर च झाला होता.

पावसात इतका भिजला होता की गारठून च गेलो होतो. मग पाण्यात चालत, चिखल तुडवीत आपली मोटार सायकल घेऊन ओफिसाकडे धूम ठोकली. तिथे जाऊन आपल्या कारकुनावर सर्व काम सोपवून, त्याच्या हातात फडताळाची चावी दिली आणि जे विशेष काय करायचे होते ते सर्व बजाऊन मी लौकरच मी घरी गेलो.

घरी गेल्यावर आई दाराविमुख एका आराम खुर्चीवर बसून कपडे शिवत होती. तिच्या पाठी मागच्या भिंतीवर चौकटीत बसवलेले शिवाजी महाराजाचे एक मोठे चित्र लावले होते. फरशी वर मध्येच एका लहानसा काळ्या जांभळ्या रंगाच्या मेजावर पांढऱ्या कुत्र्याच्या एक सानुला पुतळा होता. मेजाच्या खालच्या फळीवर एका डब्यात हिरवी वनस्पति होती. बेतानी वेळलेल्या चार खुर्च्या होत्या. डाव्या बाजूला खिडकी जवळच्या कोपऱ्यात एका फळीवर चार पाच पुस्तके उभी ठेवली होती. काहीचे कपाट लाल तर काहीचे निळ्या व पिवळ्या रंगाचे होते.

पडवीत शिरताच आईने डोके उचलून मला पाहिले. त्या वेळी मी झपाट्याने मधल्या खोलीत गेला. आई गडबडून उठली व माझ्या लागोपाठ आली. "अरेरे !बघ कसा भिजला आहे.– माया, चहा गरम कर लवकर." असे म्हणून तिने मुलीला हाक मारून ते काम बजावले. "हो आणते की." असे दुसऱ्या खोलीतून मायेने होकार दिला.

"पाऊस थांबल्यावर यायला हवा होता. अन् पावसात येण्याची कसली घाई लागली होती अं." आई बोलली.

"छिं-छिं-अच्छुम्." असे मी तीनदा शिंकरलो.

"बघा कसा शिंकरतो." एक रूमाल देत म्हणाली.

"रस्त्यावर मोटारसायकल सोडून माणसाना पाहायला, शेतात शंभर फुट अंतरावर चालून गेलो. अकस्मात मुसळधार पाऊस कोसळला. तेथून रस्त्यावर येता येता एकदम ओळाचिंब झालो. तिथून पावसात भिजत आफिसात अन् इथ पर्यंत असाच येत आहे." असे म्हणून आईला फसवले.

"उद्या असाच पाऊस पडला तर जाऊं नको."

"का?"

"बघ कसा भिजलास अन् आजारी पडलास तर."

"मी लहान मूल थोडेच आहे. मीच का तो पहिला माणूस जो भिजून आजारी पडणार."

"तुला तसा हवा तर जा. कोण मना करतो तुला अं. पण...."

"पण पण काय करतेस मी एका श्रीमंताचा मुलगा आहे म्हणून ना. एकदा जाऊन त्या शेतावर काम करणारे शेतकऱ्यांना बघ. ते रोज पहाटे सूर्योदयाच्या अगोदरच मळ्यात पोहोचतात. त्याना न कडक ऊन ग्रासते न पाऊस ही त्याना अडवितो. उन्हाळा असो किवां पावसाळा असो, पण त्यांचे काम कळ सुत्री सारखे चालत असते." आपल्या दोन्ही हातानी आईचा दोन्ही बाहु धरून म्हणत होता. मग दुसरे कपडे केले.

"बरं हे घ्या चहा." मेजावर चहा तयार करून बहिणेने चहाची वाटी माझ्या हातात देत म्हणाली.

आपल्या पलगावर चढून लाल कंबल ओढून आडवा पडला होता. बहिणीच्या हातातली चहाची वाटी घेऊन चहा पिऊं लागला. चहा प्याल्यावर जवळच फळीवर प्रेमाची गादी या नावाचे एक पुस्तक पडले होते. ते काढून वाचूं लागलो. वाचता वाचता माझे डोळे मिटत आले. मी गाढ झोपी गेलो. आई व माया सैपाक घरात गेल्या होल्या होत्या. त्या दोघीजणी सैपाक करण्यात रमल्या होत्या. सैपाक झाल्यावर माया मला उठवायला आली. "दादा उठा की." दार उघडून तिने दोनदा हाक मारली. मग तिकडूनच गेली.

"कुठं आहे तो. हाक मार ग त्याला. जेवणार नाही का तो?" आईने हात धुऊन मायेला विचारले.

"आताच हाक मारली."

"हाक मारलीस तर कुठे आहे. जा ग जागव त्याला."

"दादा, दादा उठा हो. चला लवकर उठा. हे काय जेवायचे नाही का?" असे हाक मारीत तिने मला हलवीत जागे केले.

"अं :- जा ठेव तिकडे नंतर जेवीन." असे कुरकुरत म्हणाला.

"आई दादा म्हणतात मग जेवीन."

"काय? नंतर जेवणार. नाही, लवकर उठायला सांग." आई त्या खोळीतून म्हणाली.

"तूं-तूं काडटे, थांब, आता तुला मी मजा दाखवतो." असे म्हणून तिच्या वर उडी टाकली. इतक्यात तिने झट दिशी दार बंद केले. मग तिने पुनः दार उघडून मला चिडवू लागली. मी धडपडत उठलो आणि दारा पर्यंत तिला धरायला गेलो की, ती तिथून पसार झाली.

मग मी तोंड धुवायला सैपाक घरात गेलो तर माया काही तरी करीत होती. मला पाहून तिने गरम पाणी व साबून देत थटावून म्हणाली. "महाराज !हे घ्या पाणी." तिच्या हातातून पाणी व साबून घेऊन तिचा गालगुच्चा घेतला तशी ती ओरडत पळाली. घाई घाईने अंग धुतले नंतर आम्ही जेवणासाठी बसलो.

आईने जेवणासाठी बटाट्याची भाजी केली होती. कैरीचे लोणचे, आम्टी, व दही तयार केले होते. मायेने भाकरी भाजली होती. आणि भात शिजवला होता. त्या दिवशी काय चांगले पकवान तयार केले होते. आई लेकीने आवडीने जेवले पण माझा जीव बरा नसल्याने मला भरपूर जेवता आले नाही. रात्री कोफी पिऊन झोपलो.

## ६

तिकडे सरितेची घरची सगळी मंडळी जेवणानंतर रोज तास दीड तास गप्पा गोष्टी करीत असतात. त्या प्रमाणे त्या दिवशी सुध्दा सगळी माणसे गप्पा मारायला बसली होती. सरितेची आई भिंती जवळच्या दिव्याच्या प्रकाशात एका फाटक्या सदऱ्याला खुंटी लावत होती. तिच्या जवळच शंकर मामा मांडी घालून बसले होते. ते आपल्या बायकोला काही तरी सुचवीत होते. उजव्या बाजूला दुसऱ्या खोलीत एका चारपाई जवळ आजीने विष्णूला आपल्या जवळ धरुन एका चटई वर बसली आणि त्याला रामायणातील एक गोष्ट सांगत होती. मुली ऐकत होत्या. सरिता आपल्या पांघरुणावर या कुशीवरून त्या कुशीवर लोलत होती. त्या दिवशी झालेल्या प्रकाराच्या विचार घोटाळ्यात पडली होती म्हणून तिला झोप लवकर आली नव्हती. तिकडे आजीची गोष्ट चालूच होती. गोष्टीला अर्ध्या वाटेत सोडून सरितेचे डोळे मिटले.

ती गाढ झोपी गेली. तिला एक सुरेख स्वप्न पडले. स्वप्नात तिने काय पाहिले? एके संध्याकाळी ओमोनच्या समुद्रकाठी पिंपळाच्या झाडाखाली बसली होती. तीन चार होड्या पाण्यात डुलत होत्या. तीन कोळी आपल्या डोक्यावर मासांच्या टोपल्या घेऊन, खांद्यावरून जाळे लोंबवीत काठाने जात होते. त्यांच्या पलिकडे समुद्रात सुमारे चारशे फुटांच्या अंतरावर इल-ऑ-फुरनो नावाच्या एक लहानसा बेट दिसत होता. सूर्याची कोवळी किरणे तेथील हिरव्या कुरणावर पसरली होती आणि त्या पिवळ्या तांबूस उन्हाने झाडाची पाने व त्यांचे मुकूट सोन्यासारखे चमकत होते. नभावरल्या ढगावर जणू काय गुलाल चढला होता.

ते दृश्य पाहून ती मस्त झाली होती. इतक्यात झाड्यावरून अश्वत्थाचा लाल दाणा तिच्या ओटीत पडला म्हणून ती थोडी दचकली. तिला असे वाटले की एक भला मोठा आंबाच पडला असावा म्हणून ती सोधू लागली. तिच्या हातात पिंपलाचा दाणा

सांपडल्यावर तो उचलून त्या कडे पाहून थोडी हसली. तिच्या शेजारी मी तिचा हात धरून वाळूवर बसला होता. मी सुध्दा त्या रंगीबेरंगी देखाव्यात रंगून गेला होता. तिचे हसणे अचानक माझ्या कानावर पडले.

"काय झाले सरिता? ए, सरिता काय झाले?" मी चकीत पणाने म्हणाला पण ती हसतच होती.

"सरिता, ए सरिता, काय झालं ग?"

"अं"

"काय झालं ग, जे हसत आहेस?"

"ओटीत आंबा पडला अन् पाहते तर पिंपळाचा दाणा." माझे उत्तर देत म्हणाली.

"यात काय नवल."आधी थोडे हसून विचारले.

"नवल नाही तर काय."

"मला वाटतं तुला नवळाई म्हणून काही वस्तु दिसली नव्हती अगोदर. बरं चल."

"सागराच्या पात्रातील पाणी कसे शांतमय आहे. आहे ना?" असे माझ्याकडे पाहून व सागराकडे बोट दाखवून म्हणाली.

"हो, चल थोडे फिरून येऊ?"

"नाही, जा तुम्ही."

"का?"

"होडी उलटली तर."

"शु....प ! असे शब्द तोंडाबाहेर कधीही काढू नये. मी जो तुझ्या बरोबर आहे."

उठून दोघेजन एक दुसऱ्याचे हात धरीत होडी जवळ गेलो. मी आधी चढलो मग तिचा हात धरून तिला होडीत घेतले. होडी हालली तिला थोडी भिती वाटली म्हणून ती माझ्या जवळ बसली होती. होडी हालत डुलत जात होती. पाण्याचा खळबळ आवाज कानाला किती मधूर लागला होता. दोघे जण एकमेकांना एकटक पाहत होतो. आमच्या डोळ्यात प्रेमाचा ज्वलंत निखारा पेटला होता. मग सरिता पाणी उचलून खेळत होती. लाटा उसळू लागल्या त्यामुळे तिला थरकाप आला. तसे मी आपला हात तिच्या खांद्यावर ठेवला. थोड्या अंतरावर गेलो की तिकडून काही कोळी मासळी मारून आपल्या होडीत आनंदाने गाणे गात परत येत होते :–

: आम्ही दरियाची लेकरे
हो...: हो.... आम्ही दरियाची लेकरे॥

पाऊस आला वारा झोंबे
होडी लाटा संगे झुंजे
हाल बे हाल जे झाले रे
मरतील आमची पोरे
देवा रे ! देवा रे ! वाचव रे.॥—
जातिने तर आम्ही कोळी
राहतो आम्ही दरिया काठी
या पाहा कोळ्याची बसती
संध्या काळी एकत्र होती
हिलमीळ गाती आमची पोरे॥—
देव आम्हाला पावलय्
दरियाच्या मुलाना पोसतय्
आम्ही दरियावर बा जगतय्
जगाच्या पोराना पोसतय्
हो.... हो.... आम्ही दरियाची लेकरे.

आम्ही सुध्दा त्या कोळ्यांच्या मागोमाग त्यांचे गाणे ऐकत व त्याचे रसास्वाद घेत परत येत होतो. त्यांच्या गाणीत जणू काय मजा, काय थाट होता. आपल्याला असे वाटले की, का ना आपण त्यात मिसळून जाऊ. आम्ही गाणे ऐकत ऐकत काठाला आलो. आनंदाच्या भरात आम्ही तर वेडेच झालो होतो. किनाऱ्याच्या वाळूत लोळू लागलो. खूप खूप हसलो. एवढ्यात एक मोठी लाट येऊन आम्हा दोघांना झाकून टाकले. आमचे कपडे ओळेचिंब झाले. सरिता आपल्या अंगावरचा परकर हातानी धरून पिळत होती. पुढे गप्पा गोष्टी करीत चालत होतो. पुनः त्या झाडाखाली जाऊन बसलो.

"आता जायचे कसे." सरिता म्हणाली

"चालत चालत, पायानी."

"हे तर मलाही ठऊक आहे."

"तर मग काय."

"कपडे भिजले आहेत की."

"काढून टाक अन् चल झटपट."

"तुम्हाला शरम नाय् वाटतं."

"नाही बा? बस एक काम कर. तू माझे कपडे घाल मी तुझे घालतो."

"कसे शोभून दिसाल."

"हे नाही, ते नाही. वडिलांना भितेस."

"नाही, ते माझ्याशी लाड करतील. वाघासारखा जबडा थोडेच उघडतील. मला इतके आवडतील इतके आवडतील जशी कुत्र्याला काठी आवडते."

"बाप रे बाप ! असं, तो बघ तिकडे वीर श्री महाराज आपल्या सोनेरी रथात बसून आपल्या महालाच्या दारात पोहचला आहे." असे म्हणत असताच अंबरावरला सोन्याचा गोळा सागराच्या पिवळ्या पदरात जाऊन पडला. दोघे जन रस्त्यावर हातात हात धरून हसत बोलत जात होतो की अचानक झाडाझुडपातून चार पाच माणसे निघाली. मी मागे वळून पाहिले तर त्यांच्यापैकी एकाने माझ्या डोक्यावर एक सोठा हानला. इतक्यात ती मोठ्याने किंकाळली. अन् जागे झाली. त्या वेळी ती थोडी बहुत गोंधळली.

"काय झालं बेटी?" असे म्हणत वडील तिच्याकडे आले.

"स्वप्नात ओरडली हाय की." आजीने उत्तर दिले.

ती असे बघत होती जसे बावरलेली, "ब बेटी भ्यालीस का." वडिलांनी पुनः विचारले.

"अं नाही, एक मोठा वाघ." ती खरी गोष्ट टाळून म्हणाली.

"वाघ, वाघ कुठं? वाघ कुठून आला. तो असेल तर स्वप्नात वाघाला पाहून भ्यालीस. वेडी

ते तर स्वप्न होते. आणि स्वप्न खरं होत नाही. जा नीज." वडील म्हणाले.

"हो."

"दिवसात माहीत नाही कुठेकुठे वावरतात अन् रात्री चाबा पसरतात." ते स्वतः म्हणाले.

जानकी आजीची गोष्ट इथेच संपली. तिने सरितेवर चादर ओढीत म्हणाली "नीज बेटी भिऊं नकोस मी इथंच आहे." आणि हळुवारपणे तिला थोपटले. सगळी मुले झोपायला गेली. दोघे नवरा बायको सुध्दा झोपायला गेले. मधल्या घरात नेहमी प्रमाणे टिनाचा लहानसा दिवा टिमटिमत होता. सगळी मंडळी झोपायला गेली.

"हे सर्व ठीक आहे. पण मला हेच कळत नाही, की तुम्ही त्या वेळी आपल्या घरी होता. आणि तुम्हाला हे सगळं कळलं कसं? अं" मी म्हाताऱ्याला विचारले.

"ते महायोगी आहेत. म्हणून त्याना ते सर्व कळलं." रामाने माझ्या कडे बघत मिसकील भावाने सांगितले.

"माझ्याशी मस्करी करता ना. पण ही गोष्ट खरी आहे." म्हातारा म्हणाला.

"असं नाही, पण ती तुम्हाला कळली कशी?" मी विचारले.

"हो, हे सर्व मला तेव्हाच कळले. एक आठवड्या नंतर जेव्हा सरिता मला पुनः एकदा अरण्यात भेटली होती तेव्हा तिने मला हे सारे सांगितले होते.

## ७

चौथ्या दिवशी पहिला कोंबडा आरवला की आई जागी झाली. दुसरा कुकुर आरवताच तिने सरिताला हाक मारली. "सरी ! ए सरी ! लवकर ऊठ की." असे म्हणून दिवा घेऊन सैपाकघरात गेली. हात पाय धुऊन चूळ पेटवली. पातेल्यात चहा साठी पाणी भरून चुळीवर ठेवले. आता उठेल की मग उठेल, पण उठणार कधी, असे विचार करीत होती.

"सरी ! ऊठ ग लवकर" तिने दारा जवळ जाऊन हाक मारली.

"अं." असे हुंकार देऊन कुरकुरत तिने चादर नीट ओढून सारे अंग झाकले.

"बघ आगीवर पाणी ठेवलंय. मी पाण्याला जाते ऐकलीस ना." असे सांगून आईने कमरेला हांडा घेतला व हातात दिवा घेऊन नदीवर जात होती. गावातील सगळ्यांच्या घरी हीच एक आरोळी, "ऊठ ग चल पाण्याला." आणि सगळ्या बाया त्या गार अंधारात हातात दिवे, कमरेला घागर किंवा टीन बादली घेत डोंगराच्या उतरणी उतरत पाण्याला जात होत्या. काही बाया त्या खाडीत उतरत होत्या तर काही स्त्रिया डोक्यावर हंडे भर पाणी घेऊन चढत जात होत्या. त्या दिव्याच्या प्रकाशात बायांचे चेहरे मलाही स्पष्ट दिसत नव्हते तरीहि त्या किती शोभून दिसत होत्या. डोंगराच्या चढणीवर जणू काय रोशनाई झगमगली होती. मध्येच रिकाम्या टिनाचा आवाज, गाई गुरांचे हंबरबागड आणि पक्षींचे किलबिलणे आणि मधून मधून कोंबड्यांचा मधूर आवाज कानाला किती गोड लागत होता.

रुक्मिणीबाई पाणी भरून आली तरी सरिता उठली नव्हती.

"सरी, सरी, अरे ! काय अजून उठली नाही. बाई माझी काय बोलावं या पोरीला. सरिता ओ सरिता. उठलीस की नाय." असे आईने पुनः हाक मारली. आजी जागी झाली होती.

"सरिता, ऊठ बेटी ऊठ. बघ आई तुला हाक मारतेय ग—बघ एकदम उजाडलय ग, चल ऊठ लवकर नाय तर ...." असे आजीने तिच्या जवळ जाऊन हाक मारली.

"उठते ना. अजून अंधार पडलांय." ती असे म्हणतच होती की कोंबडा आरवला.

"ऊठ ग ! कोंबडा केव्हांच आरवला."

"या कोंबड्याना काम थोडेच आहे. ते तर रात्रंदिवस आरवत राहतात." असे म्हणून डोळे चोळीत सरिता उठली.

"ती उठली की नाय?" आईने बाहरून विचारले–

"उठली ग." आजी उत्तरली. आणि "चल जा लवकर." सरितेला म्हणाली.

ती धडपडत उठून घाईघाईने हात पाय धुतले. आईने भात येळून दांडा दिला मग बादलीत थोडे पाणी घेऊन गाईची धार काढायला गेली. सरितेचे वडील उठले. दतुनाने दात घासत असताना "हरि विठ्ठला नारायणा." असे गुणगुणत होते. सौच मुखमार्जन झाल्यावर त्यानी सूर्याला दंडवत केला. सरितेने चहा तयार केलाच होता. इतक्यात आई दूध घेऊन आली. ते उबलून चहात पाडले. ताटात भात काढून नवऱ्याला वाढायला गेली. सरिता गोठ्यात गेली. आई इतर काम करत होती. आजीने भांडी घासली. ती गोठा साफ करून, गाईंना पाणी पाजून, चारा घालून बाहेर पडली.

वडिलांचे जेवण झाले. "आज लवकर याल ना?" ताट उचलून म्हणाली.

"हो, का?"

"राघो मामा येतील ना."

"ओ, असं, मला वाटतं जरा उशीर होईल. आज तर खूपच काम राहिलय करायला." मग वडिलांना आपली शिदोरी व काठी घेऊन चालते झाले. एवढ्यात सरितेने विचारले. "बाबा गेले का?"

"हां, आताच निघाले."

"बाबा, बाबा थांबा जरा." असे धावत बाहेर निघत तिने हाक मारली.

"का ग काय झालं?" थांबून विचारले.

"मला.... मला...."

"हो ! बोल, काय हवं?"

"बाबा मला.... मला....

"हां, बोल ना काय आहे ते. अन् मला मला काय घोटत आहेस."

"आज आजा येणार आहे."

"ते तर येणारच. मग."

"तर आज जरा लवकर या." जे म्हणायचे होते ते टाळून भलतेच सांगितले.

"बरं, तू सांगतेस तर लवकर येईन. आजाची खूप काळजी घतेस अं." असे म्हणून ते चालते झाले. वाटेत जाताना ते माणसाना कामाला जाण्यासाठी ललकारत होते. सगळी

माणसे आपल्या घरातून, झोपडीतून कुदळी, टोपळी कोयते आदि घेऊन बाहेर पडली.

रस्त्यात जात असता आकाशात तांबडे फुटले होते. पश्चिमेच्या दिशेला नभमंडपात गुलाल पसरला होता. तेथील थंड वायूमंडळात पक्षी गण गोड गाणी म्हणत चारा सोधायला सुटले होते. आणि शेतकरी बिचारे पाखरांचे गाणे ऐकत जात होते.

उषःकाल झाला म्हणजे आईने सर्व मुलांना उठवले. तोंड धुतल्यावर सगळ्यांनी उषःपान केले. हे त्या घराण्याचे एक वैशिष्ठ्य होते. रुक्मिणीबाई तुळशीवृंदावना भोवती प्रदक्षिणा घालून तुळशीच्या झाडावर उदक सोडायच्या, आणि मुलीही त्याचप्रमाणे फेरा करीत आणि पाणी सोडायच्या मग सूर्यदेवाला नमस्कार करायच्या. घरची सर्व कामे आटोपली की लकडी किंवा गवताला जात होत्या.

त्या दिवशी ती नेहमीप्रमाणे घरची सर्व कामे आटोपून सरिता आपल्या बहिणी बरोबर घास आणायला बाहेर पडली. सदा सारखे ती गवत कापत होती. पण त्या वेळी तिचे गवत काढायला हात लवकर उठत नव्हते. अंबरात थोडे बहुत उदशीपण आच्छादले होते. इकडे तिकडे फिरून वेळ घालवीत होती. दोन दीढ तासात त्या दोघीनी मोळीपुरते गवत आणून एका सपाट जागेवर बांधली. मग गौरी व मालती दीर्घ स्वास घेत बसल्या. अखेरीस सरिता थोडे गवत येत होती. तिला पाहून गौरीने विचारले.

"काय ग मोळी बांधलीस

"नाही ग ! आज माझा जीव गवत कापायला लागत नाही."

"अग बाई—हे बघा—हिला तर जीव लागत नाय् जीव लागत नाय तर मग काय करत होतीस तूं."

"येडी, काय बोलणार ती. जशी तुला काही माहीत नाय." मालतीने गौरीला तसे सांगितले.

"मला काय माहीत हाय्. काहीच नाय बाई, सांग ना तूंच."

"हं, पोरीला वेड लागलय् ग वेड."

"वेड लागलेय कुणाची?"

"पाहुण्याची अन् कुणाची. एका दिवसात त्याने हिच्यावर मोहिनीच पाडली." असे स्पष्ट बोलून मालती गौरीच्या कानात काही तरी कुजबुजत होती.

"काय म्हणते ग गौरी ती?" सरितेने तिला विचारले.

मग गौरी व मालती तिच्याकडे बघून बघून हसूं लागल्या. एवढ्यात तिला चिड आला.

"तो आला नाय् तर आम्ही काय करूं." मालती बोलली.

"तो कोण ग?"

"तो, तोच ग जो काल ...."

जवळच एक ढेकूळ होते ते उचलून तिने मालतीवर फेकले. तसे मालती एकीकडे सरकली आणि जीभ काढून, हाताचा आंगठा चेहऱ्याच्या समोर आणून सरितेला चिडवीत होती.

"मालती तर ठीकच म्हणतेय्. यात चिडायला का? बरं मालती, चल ग तिला थोडं गवत कापून देऊ. नाय तर उशीर होईल ग." असे गौरीने मालतीला सांगितले.

दोघीनी तिला थोडी मदत केली. शेवटी तिघीजनी आपापली गवताची मोळी घेऊन घरी गेल्या.

पूर्वीप्रमाणे ती रोज आपले काम करून गवताला जात होती. घाईघाईने आपल्या आवडणाऱ्याची वाट पाहू लागली. असे तिने एका आठवड्याभर त्या बदामाच्या झाडाखालच्या खडकावर बसून तिथल्या पायवाटेला एक टक लावली होती. दिवसभर तिच्या गुलाबासारख्या चेहऱ्यावर खिन्नता पसरत होती. सकाळी सूर्य उगवला की तो तिच्या जिवनात थोडा आल्हाद आणीत असे आणि दुपार झाली की तिचा उदास चेहरा लटकत असे. या दोन दिवसाच्या पाहुण्याने तिच्या कोवळ्या जीवावर बरे काय मोह पाडला होता.

"अजी साहेब. बरं मला एवढे तरी सांगा. तो पाहुणा होता तरी कोण?" मी त्या म्हाताऱ्याला विचारले.

"तो पाहुणा."

"हो, तो पाहुणा?"

"तो आज पावत जिंदा आहे."

"तुम्ही आपली ओळख करवूं द्याल का?"

"हो, करवून देईन. का नाही."

"त्यांचे नाव काय?"

"त्याचे नाव, भिमराव आहे, भिमराव."

तिकडे मला पडसे व खोकल्याने खूप गांजले होते. त्या वेळी आजच्या या नवयुगा सारखे डॉक्टर नव्हते. पूर्वीच्या लोकाना जडीबुटीने औषधपाणी करणे हे एक स्वाभाविक गुण होते. आई मला दर रात्री सित्रॉनेल व आले एका पातेल्यात उबालून गरम गरम प्यायला देत होती. कधी कधी काढा करून पाजीत होती. तसे केल्याने दोन तीन दिवसानी

माझी बिगडलेली तबियत जरा सुधरली होती. आठवड्याभर पडविच्या खुर्चीवरून अंथरुणावर आणि अंथरुणावरून तळमळत खुर्चीवर दिवस घालवीत होता. घरातल्या चार भिंतीत कोंडळ्या सारखा असून मला तर कंटाळवाणे आले होते. घडोघडी तिचीच आठवण येत होती. माझे सारे लक्ष तिच्याकडे गेले होते.

हळुहळु एक आठवडा गळला. रविवारचा तेजोमय दिवस होता. आई माझ्याच समोर खुर्चीवर बसून एका पांढऱ्या चादरीवर कशिदा काढत होती. मी तर एकदम काळजीत दिसत होता.

"घरात बसून बसून जीव कंटाळून गेला."

"मला माहीत आहे. तुला तिकडची हुरहुडी लागली आहे."

"असे नाही आई. तुला तर माहीतच आहे लक्ष्मणबुवा आता वयात आले आहेत, किती काम करणार ते."

"हे तर खरं. हां, तिकडे गेलास की, त्यांना सांग वेळ मिळाली तर इकडे येतील."

"बरं—काय मोठं काम आहे का?"

"असंच समजावं."

मी खिडकीतून बघत होता. एवढ्यात माझी नजर दाराकडे वळली, तर समोर लक्ष्मण उभे होते.

"ते पाहा लक्ष्मणबुवा." दाराकडे बोटाने दाखवीत म्हणाला.

"कुठं रे?—खरंच की."

"जा दार उघड"— "या या."

"या या, आईने आताच तुमची आठवण काढली." मी दार उघडून बोलला.

"नमस्कार बाई." ते हात जोडून म्हणाले.

"नमस्कार दादा, कसं काय? कशी घरची मंडळी बरी आहेत ना." आईने विचारले.

"हो, सगळी बरी आहेत."

"बसा ना बसा, आज कसं येणं झालं इकडे?"

"पुष्कळ दिवसानी तर येत नाही आणि भिमरावाला आठवड्याभर पाहिला नाही. मी तर काळजीत पडलो. म्हणून मी विचार केला की जाऊन एकदा पाहून येतो.

"त्या दिवसा पासून त्याला खोकला व पडसे लागले आहे. आज जीव बरा दिसला तर त्याला तुमची चिंता पडली आहे."

"हे कोण? लक्ष्मण मामा, नमस्कार मामा," परातीत चहा आणीत माया म्हणाली.

"आशिर्वाद बेटी, कसे गणपत कुठे आहे? ठीक आहे ना तो?"

"हो ठीक आहेत. आताच आपल्या एका मित्रा बरोबर बाहेर निघाले आहेत."

मायेने चहा करून दिला. त्यानी चहा घेतला. मग लक्ष्मीबाईने एक नजर लक्ष्मणाकडे तर एक नजर माझ्याकडे पाहिले. तिला काही म्हणायचे होते पण मी तिच्या समोर असल्याने, ती बोलायला अडकली होती. इतक्यात माया चहाच्या उसट्या वाट्या उचलून आत गेली. तिच्या मागोमाग मी सुध्दा गेला. मग लुगड्याचा पदर डोक्यावर सावरीत बसली.

"बाई तुम्हाला काही सांगायचे होते, मला वाटतं?"

"अशी तर खास बात नव्हती. दादा तुम्हाला तर माहीत आहे, भिमराव आता मोठा झाला आहेत. अन् कामाला ही लागला आहे."

"हो, खरं च की."

"मी विचार केला आहे जर याला आपण लवकर फासात पाडूं तर बरं होईल."

"फासात पाडायला."

"हो की ! संसारात राहण्याची एक मात्र युक्ति आहे. काय म्हणता?"

"म्हणजे त्याचे लग्न कराल, ठीक आहे. पोरगी कुणाची?"

"मुली तर पुष्कळ आहेत, असे तर माझ्या भावाची मुलगी आहेच."

"ठीक आहे. मुलगी चांगली आणि ती ही उत्तम घराण्याची, भट्टबुवाना बोलावून सुमुहूर्त निश्चित करा, उशीर कशाला?"

"पण दादा, आपल्याला चांगली सुशील सून हवी. आणि हे काम मी तुमच्या हाती सोडते.

"बरं, याचे तुम्ही फिकर करू नका. मी पार पाडतो ते."

"हे तर आई बापाचे कर्तव्य आहे.'

"मुलांना चांगल्या मार्गी लावणे हे आईबापाचे मोठे कर्तव्य आहे. आणि हे आपल्याला केलेच पाहिजे. बरं बाई आता मला मेहुण्याकडे जायचे आहे."

"बसा ना. काय इथं रोज रोज येता."

"पाहा न जर उशीर झाला की तो निघून कुठे तरी जाणार."

"भिमराव, दादा जात आहेत." आईने मला हाक मारली.

मी आतल्या खोलीतून आला.

"आता कधी येणार इकडे?" आईने त्याना विचारले.

"आता काय सांगू. पुढच्या आठवड्याला मी दादाकडे येणार. तसेच वेळ साधून एक नजर इकडे टाकून जाईन."

"तुम्ही लौकरच जात आहात. जाण्याची कशली घाई आहे हो, काय रोज रोज इकडे येता." खोलीच्या दारातून येऊन म्हणाला.

"हां भिमराव, काही कामासाठी मला दिप्लिवेर गेले पाहिजे."

"थोडं वेळ थांबा की, अन् मग खुशाल जा."

"आताच बाईला सांगितला, उशीर झाला की मेहुणा निघून जाणार आणि माझे काम तसेच राहील." असे म्हणून ते दारापर्यंत आले होते.

"बरं ठीक आहे. थोडं थांबा मी येतो." आत जाऊन आलो.

"बरं हे घ्या." त्यांच्या हातात पैसे देत म्हणाला.

"राहूं द्या की याची काय गरज होती." असे ते घ्यायला नाकारत होते. त्या वेळीचे पाच रुपये म्हणजे आजचे पन्नास रुपय. आता मात्र त्याना हा प्रश्न पडला. ते घ्यायचे कसे अन् नाकारायचे ही हे त्यांना कळेना पण शेवटी आईच्या म्हणण्यावर त्यानी ते स्विकारले. "घ्या ना दादा जाताना मुलांसाठी खाऊ विकत न्या की." असे तिने आग्रह केला होता.

"बरं बाई, राम राम, येतो की." असे म्हणत जात होते.

"बरं या ! राम राम."

लक्ष्मण आपल्या मनात हसत बाहेर पडले. रस्त्याजवळ आल्यावर आपल्या मुठीतील पैसे पाहून आतल्या आत हर्षले. जणू त्याना काही लोट्रीच मिळाली होती. 'आज आपले भाग्य उजाडले आहे.' ह्या प्रकारी ते आपल्या मनात घुटघुटत होते. ती नोट घट्ट धरून मग कोटाच्या आतल्या खिशात मोत्या सारखे जपून ठेवली. जाता जाता त्यांच्या मनातील चांदणे झकासले.

## ८

सोमवारचा सौम्य दिवस सोन्या सारख्या किरणानी झलाकलेला. देवळाच्या कळसावर सोनेरी रंग चढला होता. श्री समर्थाच्या योगाने शक्तिशाली भिमराव चक्र चालवायला निघाला म्हणून मी आपली भाताची टोपली मोटारसायकलच्या हेंडलावर ठेवली आणि आई बहिणीला एक नजर बघून मी पण आपला चक्र चालवायला निघाला. रस्त्याच्या कडेला येऊन मी दिसेनासे होई पर्यंत आई आणि माझी लाडकी बहीण माया मला खूप पाहत होत्या. एकुलता एक मुलगा असल्याने मी तर आईचा जीव होता म्हणून तिचे चित्त माझ्या वाटेला उभे होते.

नऊ वाजता आपली टोपळी घेऊन ओफिसात शिरलो. त्या वेळी कारकून आपल्या कामात गुंग होता. मी मांजरासारखे पावले टाकीत आत शिरलो. त्याना आपली चाहूळ अजिबात लागली नव्हती. शावकासपणे आपली वस्तु दुसऱ्या मेजावर ठेवली तरीही त्याना माहीत झाले नाही. जाणून बुजून मी त्यांच्या जवळ एक चमचा पाडला. ते असे चौकले जसे की त्यांच्या अंतःकरणातला बारूड फुटला. मी तर पोट धरून हसूं लागलो. त्यानी मान वळवून पाहिले तर मी त्यांच्या मागे उभा होता.

"आलात ना, कसे."

"नमस्कार मामा कसे?" मी हसत विचारलो.

"हे काय बा असं" घावडल्या आवाजात म्हणाले.

टोपली व कोट काढून एका खुंटीवर टांगून मी पुनः कामाला लागलो. दहाच्या सुमारास हात धुऊन आपला फटफटवा घेऊन फडफड करीत पलिकडच्या वाटेन मी स्वार झालो. कारकुनास वाटले की तो अंगणात काही तरी पाहत असेन, त्यांना काही विचारायचे होते म्हणून त्यानी मला हाक मारली. सायकलचा आवाज ऐकताच ते दारा जवळ आले तोवर मी पसार झाला होता.

"हा जातो तरी कुठे, हे ईश्वरालाच ठाऊक आहे. तो कुठकुठं जात असतो ते." चाळिशी सावरीत म्हणाले "काय बोलवं आजच्या तरण्याना, काम न धाम आखीर काय करतील." असे उदगारून खुर्चीवर कामात रंगले.

मी अधासारखा धावत धावत त्या ठिकाणी पोहोचलो—सरिता तर त्याच जागेवर उदास मनाने बसली होती. मागच्या बाजूने जाऊन तिच्या डोळ्यांना दोन्ही हातानी धरले.

"गौरी, गौरी सोड ग गौरी! डोळ्यावरचे हात सोडवीत म्हणाली पण इतक्यात तिला कळून आले की हे तर कुणी दुसऱ्याचे हात होते ते. मी तिथे होतो हे अजिबात कोणाला ही माहीत नव्हते. याच अंतरात गौरी व मालती एकेक कोठून उगवल्या, जणू कोण जाणे. आम्हाला एकत्र पाहून त्या हसूं लागल्या म्हणून मी चटकन आपले हात काढले. आणि मला समोर पावून प्रथम थोडी हसली. मग या पुढे काय बोलावे बुवा! तिचा रुसलेला तोंड पाहून थोर नागिणच दिसत होती. जसे ती एकदम माझ्यावर तुट पडेल, दचकून डसेल की काय असे उभी होती. काही न बोलता गडी काय रुसली होती! तिथून झटपट उठून एकीकडे नखरा करीत जाऊन बसली.

"अग बाई, असं" "खरंच रुसली आहेस." दोन्ही हात जोडून

"कशी बरी आहेस ना?"

"जा, मी तुमच्याशी बोलणार नाही." तोंड फुगवून म्हणाली.

"का? हो, राणी रागावली आहे. बरं, माझ्याशी बोलणार नाही."

"नाही."

"नाही"

"एवढे दिवस कुठे झोप घेत होता? जे आज उगवलात."

"खरोखर रागावलीस तू? झोप ...ती तर घरी घेतली होती. तुला काही एतराज आहे?"

"आणि म्हणता एतराज आहे का? कोणाला सवड आहे तुमच्याशी बोलायला?"

"तुला आणि कुणाला."

"हं, मला वाटतं जिला काम नसेल. ती तुमच्याशी गप्पा मारू सकेल. मला नाही."

"एवढी राग. तर काय माझ्याशी आणखी कधीही बोलणार नाहीस ना, बरं ठीक आहे."

ती तर गप्पच राहिली. मला पाहून तिचा अंतःकरण तर फुलून गेला होता. फुग्याप्रमाणे गगनात तरंगत होता.

"बघ आज पासून मी आणखी कधी तुझ्या या वाटेवर येणार नाही. ठीक आहे." असे म्हणून मी पिसाळत निघाला. मी काही अंतरावर गेला असावा की तिकडून गौरी सरितेकडे धावत गेली.

"बरं झालं आता तो गेला." गौरी म्हणाली.

"जाऊं दे काय झालं."

"जाऊं दे काय झालं. मग रोज अवदशागत का वाट पाहत होतीस. काय सोंग करीत होतीस."

"खरंच ते गेले." इकडे तिकडे पाहत म्हणाली.

"नाहीतर काय. – वेडीकुठली जा विनवून आण आता."

"जा ग बोलावून आण." गौरीचा हात धरून म्हणाली.

"जा तूच, कोण जाणार. पायावर कुऱ्हाड मारुन आता दुसऱ्याकडून पट्टी बांधवतेस. जा."

तिकडून ती धावंत माझ्या पाठलाग करीत आली. जशी ती माझ्या पुढे आली तशी ती घसरून धाडकन् पडली. तिला तळमळ असताना पाहून माझ्या नाकावरचा राग झाडाच्या

बुंद्याला पोहोचला.

"उफ.... अं.... आ." ती कुरकुरत होती.

"सरिता .... सरिता." असे केविळवाण्याने माझ्या मनातला आवाज बाहेर पडला. इकडे तिकडे पाहिलो तर जवळपास कोणीच दिसत नव्हते. तिच्या जवळ गेला तर ती जमिनीवर हात टेकून उठायला प्रयत्न करीत होती. तसा तिचा पाय दुखूं लागला.

"माझा पाय ग ! माझा पाय !' ती दुखाने कहरत होती.

"कुठं लागला, पायाला, बघूं तर." तिचा उजवा पाय धरत म्हणाला.

"हो. आ. आ. इथेच."

"धावली नसतीस तर पडली नसतीस ना. मी मुद्दाम तुझ्या साठी आळा होता. आणि तूं...."

"मला काय ठाऊक. उफ.... आ... माझा पाय."

"उठूं सकशील का?" तिला हात धरून उचलत होतो. पण तिला उठायला कष्ट होत होता. मग तिला आपल्या खांद्यावर उचलून नेत होता. गौरीने तिला आपल्या खांद्यावर उचलून आणीत असताना पाहिले. त्या वेळी गौरीला काही विचाराचे होते. पण ते न विचारता माझ्या मागे बघत चालली.

"अग बाय, काय झाले?" गौरी असे दोन तीनदा मंद स्वरात पुटपुटली. समोर जाऊन मी सरितेला खाली उतरून म्हणालो. "घसरून पडली. मला वाटतो तिचा पाय मुरगळला आहे."

"आता घरी जाणार कशी ही."

"एक फडका द्या." हात पुढे करीत मागितलो.

"हे घ्या." तसे गौरीने आपल्या पदरातील एक कडा चिरून दिला. त्या चिंध्याने तिच्या टाचा वर एक पट्टी बांधली.

"दोन दिवसात ठीक होणार." असे बोलून मी उठन जात होता. मध्येच गौरीने विचारले. "भिमराव बाबू तुम्ही जाता?"

"एकदा जर कोणी आपल्यावर विश्वास केला होता आणि आज तोच भरवसा तळाशी पोहोचला तर त्याचे काय मोल."

"भिमराव बाबू तुम्हाला ठाऊक नसेल. बिचारी रात्रंदिवस तुमचीचआठवण काढते. रोज अकराच्या सुमारास या खडका वर बसून तुमची वाट पाहते आणि आज तिने थोडी थट्टा केली त्या बद्दल तिचा पाय मुरगळला."

"बस राहू द्या. तिने मला समजले असेल तर. त्या दिवशी मी इथून चिंब होऊन गेल्यावर आजारी पडलो. एकीकडे ताप, खोकळे आणि पडसे आले होते. जणू यानी तर माझा जीव निघत होता."

"तिला काय ठाऊक बाबू? आता तर बरं आहात ना."

"म्हणून मी तुमच्या समोर उभा उभा आहे."

"राहू दे ग ! माझा नशीब चांगला नाही तर काय करूं" सरिता दुखी मनाने म्हणाली.

"दर रोज तर त्यांच्या नावाची माळा जपत होतीस आणि आता म्हणतेस राहू दे."

"मी कोण आहे? कोणाची माळा जपणारी?"

"असं बरं, आखीर तुला काय सांगूं" या प्रमाणे बोलून सरितेकडे नजर भिडवीत गेलो. दोन्ही हातानी काखाखाली धरून तिला फुलासारखे वर उचलले.

"सोडा.... सोडा हो मला." असे सरिता म्हणाली व दोघे जन खदखदा हसूं लागले. "वेडी कुठली, मी काय खरोखर जात होता. मी तर...."

"तुमची आई बरी आहे ना?" तिने विचारले.

"हो, ती तर बरी आहे. केवळ मला घाव लागला होता." तिला उतरून सांगितले.

"कसा? कुठे, पाहू तर." काहीच माहीत नसल्याने ती विचार पूस करूं लागली.

"पाहशी का बरं, बघ इथे." सदऱ्याची बटने काढीत तिचा हात धरीत आपल्या हृदयाशी स्पर्षवून म्हणाला. मग आम्ही एकमेकाना हास्यपूर्ण नजरेने पाहूं लागलो. त्या क्षणाधीसाठी तिच्यावर ओढावलेला दुःख कुठल्या तरी कोणपाडीत जाऊन लपला होता.

"ओ, माझा पाय."

"आजचा हा दिवस कसा विचित्र आहे."

"विचित्र." असे बोलून ती स्तब्ध झाली.

"आठवड्याभर आजारी असलेला रोगी, बरा झाल्यावर आपल्या जीवलगाला भेट देण्यासाठी दुरून आला. तिला भेटून....."

"अगोदरच का ना म्हणालात?"

"तेच सांगायला आलो होतो पण काय बोलूं, याच्या पूर्वीच फुगली होतीस."

"काय झालं होतं?"

"ताप आला होता, पडसे लागले होते."

"हेच ! यात काय मोठी गोष्ट घडली होती. हे तर सगळ्यांनाच होते."

"तुला तर काहीच वाटत नाही."

"नाही काय वाटणार?"

"नाही."

"अं. हं."

"मला असं वाटतं की तुला तर माझी पर्वाच नाही."

"पर्वा नाही, तर काय, आ... उफ.... अय्या."

पाय थोडा उचलल्यामुळे तिला थोडा त्रास झाला म्हणून ती कळवळली. त्या दुखाने तळमळत असल्यामुळे झटकन उचलले. त्या दोघीजनी आपापली मोळी घेऊन जात होत्या. त्यांच्या मागोमाग गप्पा मारीत सरितेला नेत होता. कसेबसे नदी ओळांडून टेकडी चढली.

गावात पोहोचलो की लहान बापडी मुले व इतर माणसे मला त्यांच्या बरोबर पाहून चकीत झाली. त्या मुलापैकी एक गोजिरावाना मुलगा धावत सरदारच्या घरी गेला.

"मावशी, मावशी एक माणूस..."

"काय."

"एक माणूस सरिता अक्काला खांद्यावर उचलून आणतय ग."

"काय रे बोलतोस."

"हो चल बघ ना. सरिता आक्काला उचलून आणतय्."

"कोण? कुठे रे?"

"ते बघ तिकडे येताय्."

रूक्मिणीबाई भाजी तयार करीत होती. त्या मुलाचे बोलणे ऐकून हातातील पळी घेऊन धडपडत बाहेर धावली व दारा जवळ उभी राहून त्या मुलाला पुनः विचारत होती इतक्यात त्याना समोर येत असल्याने पाहताच पळी तेथेच आपटून धावत सुटली. त्यांचा जवळ जाऊन विचारू लागली.

"काय झालं ग? काय झालं पोरीला?"

"काय नाय?" गौरीने उत्तर दिले.

"काय झालं नाय तर तिला उचलून आणायला कसली गरज होती."

"घाव लागलय् ग तिला." गौरी पुढे चालत बोलली.

"कसा?"

"दगडगोट्यावर पाय घसरल्यामुळे छपकन पडली."

"घसरून पडली. बाई माझी !' असे म्हणून पुढे पुढे येऊन दार उघडत आत शिरली.

तिने मला आत शिरायला सांगितले.

"या इकडे या बाबू." बाबू शब्द ऐकून मी तिच्या तोंडाकडे पाहिले अन् खोलीत प्रवेश झालो.

"चारपाई कुठं आहे?" सगळीकडे एक नजर टाकून विचारलो.

"इथे आणा, या इकडे या." आई म्हणाली.

तिला एका चारपाई वर बसवून मी स्वयम् एका खुर्चीवर बसलो. "बाई, थोडं तेल आणा तर." तिच्या आईला सांगितलो. मग ती बांधलेली पट्टी सोडली. आईने एका वाटीत थोडे तेल आणून दिले. ते तिच्या पायावर फासून मळत होता.

गौरी व मालती आपापली गवताची गोळी घेऊन गोठ्या कडे गेल्या होत्या. त्याचा वास लागल्या मुळे गाई हांबरू लागल्या. गौरी मोळीच्या दोरा सोडूं लागली. मालती मोळी आपटून पाणी आणायला गेली. गौरीने सर्व घास एके ठिकाणी एकत्र केले. तिकडून मालतीने दोन बादल्या पाणी आणले. गाईना पाणी पाजले मग जनावराना गवत घातले तदनंतर अंग धुऊन कपडे केले.

त्या घराच्या जुनाट खोलीत आई व आजी उभी होती. त्यांच्या पुढे सरिता खाट्यावर पाय खाली लोंबवीत बसली होती आणि मी तिच्या सामोऱ्या बसून तिचा पाय चोळीत होता. तेलाची वाटी एकीकडे ठेऊन एक फडका मागितला.

"हे घ्या." तिच्या फाटलेल्या लुगड्यातून एक लांबसा तुकडा चिरून देत म्हणाली. पुनः मी त्या चिंध्याला रूळवून सरितेच्या पायाला एक पट्टी बांधली. ऐण वेळी गौरी व मालती आल्या.

"पट्टी चांगलीच बांधली की." गौरी आपल्या पदराला हात पूसत म्हणाली.

"बरं, मी जातो. रोज पाय चोळून पट्टी बांधत राहा." असे म्हणून मी जात होता. की तिकडून गौरीने होकार दिला.

"तुम्ही याची फिकीर करूं नका." तसे मी तिच्या कडे वळलो. इतक्यात आमच्या दोघात धक्काच लागला असता. आपला तोळ सांभाळीत मागच्या मागेच सरकलो. " अं. हं. बघा की, थोडा चहा घ्या." असे म्हणून तिने मला थोडे पाणीं दिले.

"हे काय?"

"पाणी." गौरी म्हणाली.

"कशाला?"

"हात धुवायला बाबू." आजी म्हणाली.

"मी विसरलो. जर माझा मळका आहे म्हणून."

गौरीने माझ्या हातावर पाणी ओतले. हात पुसून जात होता. पण आजी तर आजीच. "होय, बाबू पहिल्यादा घरी आलाव थोडा चहा नाय घेणार का? थोडा चहा पिऊन जा" आजी बोलली.

"राहूं द्या दुसऱ्या दिवशी पिणार."

तो वर गौरीने चहाची वाटी माझ्या समोर करीत म्हणाली. "धरा, थोडा चहा प्या." असे म्हणून गौरी ने चहा पाजण्याची जिद केली. मला दुसरे काही करता आले नाही. चहा प्याला आणि जात असता. "खूप गोड आहे. चहा. बरं, मी येतो." असे म्हणून मी उठलो. मी दारा जवळ पोहोचलो.

"आता कधी येणार बाबू?" आजीने विचारले.

"एखादा वेळ सापडला तर...."

"आपल्याला घर दिसलाय् आता येऊं सकाल."

"बरं नमस्कार." असे म्हणून घराबाहेर पडलो. बाहेर रस्त्या बाजूला मुलाबाळांची दाटी भरली होती.

मुलंचे कपडे मल्लीन होते. सरासरी तेथील मुलांचे पोट फुगलेले दिसत होते. काही बायांची ही तीच गत झाली होती. मोठमोठे डोळे वासून मला पाहत होते. मी जात असता काही मुले माझ्या मागोमाग येत होती. माझी नजर चहुकडे धावत होती. एवढ्यात एक मुलगा आकस्मिक कोठन तरी उगवला. मला पटु तर आश्चर्यचकीत दृष्टीने पाहूं लागला. एका माणसा मागे सगळे गावच लोटला होता तसा प्रकार पाहून गोपाळ सुद्धा त्यांच्याबरोबर बघत पाठलाग करीत जात होता. दोन्ही हातानी मुलाना ढकलीत हाटवीत पुढे जात होता. एवढ्याता गोपाळने आपली दृष्टी मागे वळवली. पाहतो तर काय. रामू येत होता.

"अरे साम्या ! तुम्ही कुठं जाताव हाय् रे?" रामाने त्यांच्या पैकी एका मुलाला विचारले.

"कुठं जाऊं. या माणसाने आपल्या सरितेबाईला उचलून आणलं होतं म्हणून आम्ही त्याना बघताव हाय्." साम्याने त्याचे उत्तर दिले.

"सरिताबाईला काय झालंय्?" उभे राहून रामूने विचारले.

"कुणाला ठाऊक. मना वाटतं तिला घाव लागलंय् रे."

"केव्हा तरी भेटला असावा हा माणूस. – हां रे ! गेल्या सेमेनात त्यांची भेट झाली

होती.'' असे बोलून पुढे आला. ''साहेब... ओ साहेब !' असे त्याने हाक मारून उभा राहिला. मी मान वळवून मागे पाहिलो. तर तो ओळखीचाच निघाला. ''अरे रामू, तू कुठं होतास?''

''तिकडून येत होतो की तुम्हाला पाहिले.''

''कसं, ठीक आहेस ना?''

''हो.''

तो माझ्या जवळ आला होता. ''आज घासाला गेला नाहीस रे ! त्याच्या डोक्यावर हात फिरवून असे सांगितले.

''गेलो होता. आताच आलो.''

'' हे धर, खाऊसाठी.'' त्याच्या हातावर एक चारान्नी ठेवून म्हणालो. मग मी चालता झाला. मी दिसेनासे होई पर्यंत तो उभा राहून बघत राहिला.

''माणूस तर चांगला हाय.'' संबा म्हणाला.

''हा रे ! फार चांगला. त्यानी मला पैसे दिले.'' असे बोलून परत घरी गेला. आणि घाईघाईने आईच्या हातावर ते पैसे सोडले.

''कोणी रे पैसे दिले?'' आईने विचारले.

''त्या साहेबानी. खाऊ साठी दिले. शहराला जाशील तर खाऊ विकत आण की.'' तसे मुलाच्या आईने ते पैसे जपून ठेवले. त्या ओक्ताचे पैसे आन्ने आजचे पाच रूपये होत. मुलाला पैसे मिळाले म्हणून त्या बाईच्या मनात माझ्याप्रति मोठी श्रद्धा उत्पन्न झाली.

त्या दिवसापासून माझ्या आयुष्यात नव चैतन्य निर्माण झाले आणि सरितेच्या दुःखी मनाला नवयुग आले. एवढे दिवस आपण लपून छपून एक दुसऱ्याशी भेटत होतो. प्रेमाच्या भरात वनात स्वर्गाचा हवा खात होतो. काय मौज उडवीत होतो. मला वाटतं की विधात्याला ही तसा प्रकारे गुळछडी उडवताना बरे वाटले नव्हते म्हणून की काय, जाणून बुजून त्याने तसा प्रसंग माझ्या मार्गी आडवा उभा केला. मग दर दोन तीन दिवसानी मी सरितेची मुलाखत घेण्यासाठी कोणत्याही एका बहाण्याने तिच्या घरी जायचा.

माझा चांगला उदार स्वभाव पाहून आजी प्रभावीत झाली असावी म्हणून मी तिच्या परीक्षेत उतरला. पण माझ्याशी ती गोष्ट कशी सांगणार. कारण त्या वेळी ज्या घरात मुलगी असेल तर त्या घराण्यातील लोग आपल्या वयात आलेल्या विवाहयोग्य मुली साठी कधी ही वर सोधीत नव्हते. वेळोवेळी जेव्हा मी त्यांच्या घरी जायचा तेव्हां आजीचे दोन्ही ओठ काही तरी बोलायला थरथरत होते, पण काही कारणमुळे ती गप्पच राहत असे.

# ९

एके दिवशी सकाळचे दहा वाजले असावे. गावातील सगळी माणसे कामाला गेली होती. बायका गवताला गेल्या होत्या. गावात सगळीकडे शान्तता नांदली होती. जर राहिले होते तर केवल चिण्या जगातील तारे ;रस्तोरस्ती रम्यतेने क्रिडा करीत असताना सर्व विसरले होते. रविराज कडकडत होता. असा वेळी मी डोंगर चढून या खेड्यात प्रवेश झाला. चेहऱ्यावर मोती टपकत होते. मुख्य वाटेवर आल्यावर खिशातून रूमाल काढला व मुख पुसून जात होता.

सरितेच्या दाराजवळ आल्यावर, दार उघडे होते. खुटीला एक पांढरा फडका लोंबत होता. पुढे येऊन दारात हुळकून पाहिले तर घरात चिमणी, मैना दाणे टीपूत होती. त्यांच्या शिवाय आणखी कोणीच नव्हते का? घरातील लोकाना भिती दाखवूं तर कशी मजा उडेल, आपल्या मनात अशी कल्पना बालगून मी मांजरासारखे पावळे टाकीत दुसऱ्या खोली गेला. तर पुनः वेड्यात अकल मारली.

"सरिता.... सरिता...." असे हाक मारून पाहिले पण होकार द्यायला कोणी नव्हते. "अरे, इथे तर कोणीच नाही. कुठे गेली ही." असे स्वतःशी म्हणून मी मागे सरकला आणि दीर्घ स्वास घेत खुर्चीवर बसलो. एकाएक मला काही हुक्की आली मग साहजिकपणेः—

"रामा रे रामा वन वन ढुंडली छायेला।

पण सांपडली न मज ती बाला॥" या गाण्याच्या भेसूर तालावर गाऊं लागलो. "काय मस्त नजारा आहे. न घरची, न दाराची फिकीर माणसे असावी तर अशी." असे स्वगत वदून गप्प राहिलो.

अचानक मला कशाची तर स्मृती आली होती म्हणून मी हात वर केला होता. ह्या दरम्यानात सरिता मागच्या दारातून कोठून तरी उगवली. क्वचित माझा हात वर पाहून ती दचकली. चोर शिरला आहे की काय असा विचार बालगून, काही न बोलता मागच्या मागे सकरकत घराबाहेर पडली आणि धावत जाऊन शेजारच्या बाईला हाक मारली, "शकू आजी इकडे या तर." जोराने धापा टाकीत म्हणाली.

"काग? काय झालं." दारा जवळ येऊन शकू आजीने विचारले.

"माहीत नाही, घरात कुणी तरी बसलाय ग."

"कोण हाय्?"

"माहीत नाही. जशी मी घरात शिरले तसे काय पाहते. एक हात उठला."

"एक हात?"

"हां एक हात ग."

"मग."

"मी तर एकदम भ्याले... चला ना माझ्यासंगे."

"बरं थांब." असे म्हणून आजी आत गेली आणि विळा घेऊन बाहेर पडली. दोघीजनी धडपडत आल्या.

घराच्या दाराजवळ आल्या की शकू आजीने मंद आवाजात हाताने इशारा करीत विचारले.

"कुठं हाय ग?"

सरितेने हाताने खुना करीत खुर्चीकडे दाखवले. मग म्हातारी घाबरत आपला पदर सावरीत, हातात विळा घेऊन पुढे झाली. सरित्ता तिच्या मागोमाग घाबरत घाबरत आली.

"तुम्ही कोण हो? काय करताव इथं?" माझ्या पाठी मागे येऊन शेजारणीने विचारले. तिचा तो भेसूर आवाज मला थोडा निराळा वाटला. मी बहुतेक चाचऱ्या सारखा दिसलो. मी वळून पाहिले तर रूद्र रूप धारण करणारी थेरडी हातात विळा घेऊन संग्रामासाठी उभी होती. त्यांना पाहून मी हसत उठला. "अरे हे काय?"

"तुम्हीच होता इथं? हं."

"नाही तर कोण होता?"

"माझा तर जीवच निघाला होता."

"च्-च्-च्-वा ! जीव निघाला. बघाना जीव निघाला पण अजून उभी आहे. काय बोलावं हिला."

"मी तर काही भलतच समजलं होतं."

"असं ! बरं, काय तुमच्या घरी पाहुण्याचे ह्याच प्रकारी सेवा सत्कार करतात?"

"हिने पाहिले काय नाय् अन् झटदिशी बोलवायला आली." असे म्हणून सरितेकडे पाहिले. "कुठला पाहुणा हाय ग? त्यांची ओळख-बिळख केलीस नाय?"

"हे शहराला राहतात आजी."

"डोळ्यानी नीट दिसत नाय ना." माझ्याकडे बघत म्हातारी बोलली. "पहिल्यांदा आल्यात काय?"

"नाही आजी ते चार पाचदा इथे आले आहेत." आजी कडे बघत म्हणाली.

"चार पाचदा आले आहेत. दहादाच का ना सांगतेस?"

"काय ग तुझ्या कपाळात अक्कील नाय का? एवढी मोठी झालीस तरी...."

"मला काय माहीत जे हे येऊन बसले आहेत."

"विचरायला हवं होतं आधी. तुम्ही कोण? कशाला आलात? तुम्हाला काय

पाहिजे?— आता ते आपल्याला काय समजतील हेच ना, की खेड्यातील माणसं जंगलीची जंगलीच राहतील. ते कधी माणसं होतील." म्हातारी म्हणाली.

"बरं आजीबाई ते सर्व राहू द्या." मी आजीस म्हटले, "बघ, मोठी माणसे कशी वागतात. जाऊन त्याच्याकडे बसून शिक, चार माणसात कसे वहिवाट करायचे ते, समजलीस ना आता."

आजी म्हतारी आणखी काही म्हणायची होती की मध्येच अडवून मी म्हणालो. "आजी बाई तसे तर त्याचे काही कारण नाही."

"काय कारण नाही, तुम्ही उद्या नावे ठेवाल की." ती म्हणाली.

"यात तर चूक माझ्याने घडली. कोणाला ही न विचारता घरात शिरलो." मान ऐटीत आणून आजीशी बोललो.

"रूक्मिणी कुठं हाय ग?" तिने सरितेला विचारले.

"ती आजी संग मामा कडे गेली आहे."

"बरं आता पाहुण्याला जितेगिते करून चटकन् देस." असे सरितेला बजाऊन जात होती.

"आजी तुम्ही जात आहात?" आजीला विचारले.

"हां बाबू, थोड्या घडीने मुली येतील घास घेऊन, अन् लागतील ओरडायला."

"ते का हो?"

"जेवणासाठी. तकारी पकवायची हाय् ना." असे बोलत ती दारा जवळ पोहोचली होती. तसे मी पुनः तिला हाक मारली. "आजी. ते ऐकून ती मागे वळली.

"थांबतर." असे म्हणून पुढे तिच्या जवळ गेलो.

"काय झालं बाबू? तिने विचारले.

"एक बात सांगायला विसरलो."

"बरं बोला ना."

"आजी.... आजी...."

"हां बोला काय हवं."

"आजी, तूं खूप चांगली आहेस ग."

पण काही न म्हणता आजी खुदकन आपल्या मनात हसून गेली. "हा पोरगा आखरीत करतो." बाहेर निघून प्रसन्न मनाने बोलली. माझ्या प्रति आणखी काय काय म्हणाली असेल कोण जाणे.

शकू आजी तिकडे गेली. माझ्या सेवेसाठी सरिता इथेच उभी राहिली होती. ती माझ्याजवळ आली. तिच्या खांद्यावर हात ठेऊन "आजी समजदार आहे." म्हणाला.

"व्हा तिकडे." माझ्या सदऱ्याचे बटन धरीत म्हणाली व माझ्या तोंडा कडे बघत तिने विचारले. "केव्हा आला होता."

"इथे येऊन मला आठवडा लोटला आणि आता विचारतेस केव्हां आलात. चल झटपट चहा आण, ऐकली नाहीस का? आजीने काय सांगितले ते."

"आजी चे काय."

"बरं, तू कुठं गेली होतीस?"

"शेजारणी कडे गेले होते."

"तर मग खूप गप्पा गोष्टी उडाल्या असतील?"

"घरी कोणीच नाही म्हणून मी गवताला गेले नाही. भांडी घासून बाहेर पडले की ती....." दाराकडे हात वळवून म्हणाली.

"काय, शेजारणीही मोकळी आहे का?"

"हो, पाहा ना." थोडी हसली. "ती माझ्या कडे आली आणि भलतीच गप्पा सुरू करूं लागली. एवढ्यात तिच्या घरात कोंबड्या शिरल्याचा......"

"आणि इथे तू आपले घर उघडे सोडून गेलीस. चोर येऊन घरात सर्व चोरून नेले असते तर."

"एकदा एक चोर आला होता. तेव्हा पासून या गावात दुसरा चोर आलाच नाही."

"बरं काय लुटलं होतं त्याने?"

"त्याने."

"हो त्याने." काय लुटलं होतं?"

"त्याने असा मोठा छापा मारला होता की याच्या पुढे माझ्या तोंडातून एक शब्द निघवत नाही बोलायला."

"असं, काय चोरून नेले त्याने?"

"माझे मन."

"असं, मग काय झाले?"

"मग काय बोलूं मी. त्या गोष्टीवर जेव्हां जेव्हा मी विचार करते ना तेव्हां मला असं वाटतं की मी स्वतःलाच विसरून जाते."

"चू-चू-चू-चू बिचारी ! त्या मेळ्याने काय हाल केला."

"बसून बसून कधी कधी विचार करते की त्याने माझे मन चोरून नेले, भला त्याला काय मिळाले." ती बोलली.

"त्याला दुःखच दुख मिळाले असेल." खिन्नता प्रकट करून म्हणालो.

"त्याला कशले दुःख."

"तो चोर इथून गेल्यावर, त्याच्या मनाला मोठा धक्का बसला आहे. रात्री त्याच्या डोळ्याला झोप येत नाही."

"तसं का?"

"हे बघा, आता तसं का? त्याने जो तुझे मन लटले होतेना. इथून जाताना आपली स्मृती इथेच विसरली होती. तुला झोप येते का?"
तिची हनुवटी धरून म्हणाला.

"मला."

"हं."

"अजिबात येत नाही."

"तर तुला त्याच्याशी प्रेम झाले असेल."

"हे प्रेम म्हणजे काय?"

"बरं ये मी तुला दाखवतो."

"तुम्ही प्रेम केलात का कधी?"

"सरिता माणसे प्रेम करीत नाही. ते करण्या योगा नाही."

"तर."

"माणसे माणसात वहिवाटून त्याना प्रेम होते."

"तर काय त्या चोराशी माझे प्रेम होऊन गेले."

"असेच समजले पाहिजे."

तिकडून गौरी आपल्या पदराने हात पुसत घरात शिरली. घरात शिरत असता तिला एक पुरूषाच्या बोलण्याच्या आवाज ऐकूं आला. तिने डोळ्यांच्या पापण्या वर उचल्या तर तिथे मी सरितेबरोबर उभा होता. आम्हाला पाहून तिने विचारले.

"स्वारी कधी आली?"

"कधीच येऊन तुमची वाट पाहते आहे." तिचे उत्तर देत म्हणालो.

"आपली वाट कशाला पाहायची. जिची वाट पाहायला हवी होती. ती तर आपल्या समोर उभी आहे. आणि भलत्याची कशाला पाहायची." गौरी म्हणाली. "चहा पाणी

दिलीस की नाय् ग." तिने सरितेला विचारले.

"खरं च ग !चहा द्यायला विसरले." सरिता तिच्याकडे बघून म्हणाली. "थांबा मी येते आता अं." असे म्हणून ती चहा आणायला गेली.

"लवकर आण ग. दिवसभर पोटात कावले ओरडत असतील. ग. तुला काय झालंय्? आता पसनच लग्नाची वेड लागलेय का.—अजून सारं दिवस असं पडलय." सरितेला उद्देशून म्हणाली.

थोड्या वेळाने गौरीला असे वाटले की जे तिने मला बोलले ते, मला वाईट दिसले असेल की काय, असा विचार करीत होती. पण उलट मी तिचे बोलणे खेळात घेतले होते. त्या मुळे मला मुळीच खेत वाटला नाही.

"गौरीबाई, आज तर मरणातून वाचलो." गमत म्हणून मी गौरीला असं सांगितले.

"का काय झालं? काही इजा झाली नाय ना?" माझे बोलणे ऐकून तिने मला असे विचारले.

"काय बोलूं गौरीबाई तुम्हाला. तुमची ती बहीण आहे ना. आपल्या शकू आजीला घेऊन मला विळ्याने कापायला आल्या होत्या."

"असं, बरं !'

त्याच वेळी सरिता सैपाकघरातून हातात चहाचा पेला आणीत दारा जवळ प्रवेश झाली.

"खरं च ग याना विळ्याने कापायला आली होतीस?"

"तुझ्याशी काय तक्रार करीत आहेत ते?–ते काय समजतात मी त्यांचे बोली ऐकली नाही का?" सरिता माझ्या कडे येत म्हणाली. मला चहा देऊन गौरीजवळ हसत गेली.

"विचारना मी खोटं सांगतो." हातात चहा घेऊन म्हटले.

"मला काय ठाऊक ग, जे हे येऊन घरात बसले आहेत. ऐक ना मी मुक्ताकडे गेले होते. थोड्या वेळाने मी तिकडून परत आले. घरात शिरताच कोणी तरी माणूस आला आहे असा मला भास झाला. पाहिले तर खरोखर एक माणूस बसला आहे. मी तर एकदम घाबरले माझे मन चाचरले. भितीमुळे मागच्या मागे सरकून शकू आजीला बोलवून आपले. ऐक ना आता तिने काय केले. विळा घेऊन घरात शिरली. मी तिच्या मागे मागे भीत भीत आले. आता विचारायला गेली तर हे दिसले."

तसे दोघीजनी हसूं लागल्या आणि बोलू नका गौरी ला तर मोठी गंमत वाटली. मग गौरी आंधोळ करिता निघाली.

"बरं गप्पा गोष्टी करा, मी येतेच." जात असता गौरी म्हणाली मी चहा प्याला. आणि सरितेच्या हातात उष्टा पेला देऊन बोललो.

"मी जातो आता."

"काय आलाता अन् काय जाता."

"मला उशीर झाला आहे. माणसे काम करीत आहे...."

"जेव्हा बघाल तेव्हा कामाला जायचे आहे. जेव्हा काही बोलाल तर उशीर झाला आहे. तुम्हाला वेळ कुठं असते. बांधून थोडेच ठेवले आहे जे..."

"आईला ! माणसाना काम बजाऊन इकडे आलो. माणसांच्या अंगावर मोती टपकत होते. ते टपोरे बघून विचार केला की हे मोती माझ्या राजकुमारीच्या गळ्यात कशी शोभून दिसेल. इतक्यात तू समोर दिसलीस आणि मी धावत सुटलो."

"कुठं?"

"माझ्या राजकुमारीला एक नजर पाहून जाऊं म्हणून. पण मला काय माहीत जे मध्येच घोटाला होईल ते." असे म्हणून तिचा गालगुच्चा घेऊन घरातून निघालो. मीं जात होता म्हणून ती उंबरठ्यावरून मला एक सारखे पाहत राहिली. पेला तिच्या हातात च होता. ऐवढ्यात तिला गौरीच्या बोलवण्याच्या आवाज ऐकूं आला की काय म्हणून ती आत शिरली. हातांतील पेला जवळच्या मेजावर ठेवून तिकडे गेली.

म. रा. ग्रा. सं. मं. ग्रंथालय
प्र/239
2
मंत्रालय.

# १०

सकाळचे आठ वाजले होते. ऊन धरणीच्या उरावर रेंगालत होते. गावातील नाऱ्या वनश्रीत चालल्या होत्या. सरिता आपल्या बहिणी बरोबर गुरासाठी चारा आणायला निघाली होती. त्या तिघीजनी गवत कापण्यास त्या स्थळावर पोहोचल्या. त्यांच्या पैकी दोघीजनी एकीकडे शेतात शिरल्या. आणि सरिता एकटी गवत सोधीत काही दूरावर पोहोचली होती. ऐन वेळी मी तिकडून वारा खात आला. मला पाहताच तिच्या मनाचा फुगा फुगला आणि आनंदाने हसत धावत येऊन माझ्या उराशी ती गुरफटली. आणि मी तर नेहमी प्रमाणे तिच्या गालावर गोड पापाचे चार पाच चटके बसवले. तिचा उजवा हात मागच्या बाजूनेच खांद्यावर घेतला आणि डावा हाता तिच्या कमरे भोवती आणला तशी तिचा हासरा चेहरा थोडा बहुत लाजला. तिच्या डोळ्यात आपली नजर मिळवून दोन पावले पुढे चाललो.

"स्वारी कुठं निघाली होती." मी तिला विचारले.

"स्वर्गाच्या तळ्याला."

"खरं, वा ! हे मी काय ऐकतो आहे." उजवाहात आभाळाकडे उचलत उद्गारला.

"ते तू पाहिली आहेस का?"

"नाही."

"तर तो ओळखायचा कसा?"

"असाच, पाहिले नसेन तर यात काय झालं. शोधून काढीन."

गवताची एक काडी मुरडून म्हणाली.

"तुम्ही तो पाहिलात का?"

"हो की."

"कुठं आहे तो?" स्वर्ग पाहण्याचा तिला मोठा आमिष झाला होता.

"तो पलिकडे आहे." मी तिचे उत्तर दिले.

"तो कसा आहे?" तिने विचारले.

भला अता मी तिला कशी समजूत घालूं. आज पर्यंत बाप जन्मात मी तर स्वर्ग हा शब्द नुसता ऐकत आलो. तो कसा आहे. हिला मी कसा सांगू. इथं तर माझ्या हा प्रश्नच पडला. तरीही मी तिला आपल्या स्वप्नातील स्वर्ग तिला पटवून दिला.

"ते तर लोकाना विरंगुला पाडणारे दिव्य स्थळ आहे. मला असे वाटते की तू देखील त्या अप्रतिम देखाण्यात उजलून जाशील. चल दाखवतो तुला."

असे बोलून तिच्या हाताचा पंजा धरून पुढे होऊन तिला ओढीत नेत होता.

वाटेने जात असता आपण दोघे देवाचे नजारे पाहत जात होतो. जंगल दाटवले होते. प्रकृतिची सुषमा उडाली नव्हती, ती तर आपल्या हिरवळीने लौकिक होती. जांभळ्याची मोठमोठी झाडे काळ्या गुळगुळीत फळांनी फांद्याना जमिनीच्या दिशेस वळवून टाकल्या. इकडे तिकडे पाहत दोघे मागे पुढे जात होतो. तिचे डोळे एकदम पिकलेल्या जांभळावर भिडले. तशी ती त्वरीत मला काही न म्हणता एका झाडावर जाऊन चढली आणि चांगली चांगली जांबले वेचून तोंडात घाली. "हूं..... ! काय जांबूल आहे हे." डोळे टौकारून जांबले खात म्हणाली.

"मी थोडे पुढे गेला होता. "सरिता तुला भिती वाटत नाही का?" मागे न पाहता मी सरितेला विचारलो. असे विचारल्यावर तिच्याकडून काहीच उत्तर मिळाले नाही. "अरे काय झालं जे काहीच बोलत नाही." असे लक्षात आणून, मी मागे फिरून पाहिले तर तिथे नव्हती. "अरे, ही कुठे गेली." असा विचार मनात म्हणून "सरिता.... सरिता...." असे मी तिला साद घातला. "सरिता.... सरिता...." चार पाच पावळे मागे घेऊन पुनः हाक मारली ते तिने ऐकली पण गंमत म्हणून ती गप्पच राहिली. तिला इति असतत शोधत

गेला. जाता जाता आचानक माझी दृष्टी एका जांबली वर पडली. ती एका फांदीवर उभी असून जांबले खात होती. गुपचुप मी झाडाखाली गेलो, तिने मला पाहिले नाही. "हं !तू इथे आहेस आणि मी तुला तिकडे शोधत आहे. मी तर एकदम घाबरुन गेला." मान वर करून बोलला.

"ते का? हं, या चढा ना." एका हाताने वरची फांदी धरून तिने विचारले.

"तू एका एक नाहीसी झालीस की."

"मी भूत थोडीच दिसते का?"

"हं, तर मग."

"चढा ना."

"तूं चढली आहेस ना, म्हणून त्याची गरज वाटत नाही मला."

"रागावलात ना."

"मी कोण आहे जो तुझ्यावर राग काढणार?"

"फळे केव्हा पिकतात हो?"

"फळे केव्हा पिकतात." मंद स्वराने बोलून मी पुनः म्हणाला "खूप जुनवतात तेव्हा."

"बरं ते कशासाठी पिकतात?"

"खाण्यासाठी." असे बोलून खालच्या फांदोरीला दोन तीन जांबले लोंबत होती. ती तोडली.

"तर मग काय बोलता."

"जर तुला ते खायला मन केलं होतं तर मला सांगायचे हवं होतं. मी तोडून दिले असते."

"वेळ कुठं होता विचारायला जे मी विचारत बसूं. आणि ते तुमच्या लक्षात यायचे कधी." असे म्हणून ती पाय पुढे टाकत होती, की तिचा पाय फांदीवरून निसटला. तिला तोल सांभालता आला नाही. "बघ बघ सावकास." मी वर पाहून असे म्हणतच होता की ती धपकन पडली. पण सुदैवाने ती माझ्या हातात च पडली. आणि माझ्या पायाखालचा एक लहान दगड निसाटल्यामुळे माझा पाय घसरला. मला तिचा भार सांभाळण्यास असमर्थ झाला. मी ही धपकन पडलो. तशी ती माझ्या उरावरून उठली. मग मी कहरत कहरत उठलो. कमरेला हात दाबून, "आ... आ... उफ... आ !' असे उद्गार काढले की, तोंड एकी कडे करून ती हसूं लागली. तिला तर मोठी गंमत वाटली होती.

इथं पाखराचा जीव जात आहे. अन् तिला तर हसूंच सुटले आहे. पाहाना तिला कशी मजा सुटली आहे.'' मी म्हटले. माझ्याकडे मान वळवून व वेणी सारून पुढे म्हणाली.

''अंगात दम नाही अन् बाबा रान दाखवायला निघाला आहे. हं, हे काय दाखवणार.''

''हे सारे तुझ्याच साठी झाले आहे.'' असे बोलताच् कमरेला हात लावून, ''ओ-आ-उफ आयो ! असे उदगार करूं लागलो.

इतक्यात ती तिकडून माझ्या जवळ आली. ''अय्या, चुचुचू बिचारा, बघा कसा घाव लागला आहे.'' नखरा करीत म्हणाली.

''शुक्रगुजार देवाची जे मी तिथे होता. नाही तर तुझाच हात पाय मोडला असता.''

''माझा हात पाय कसाला कोण मोडणार अं?'' असे बोलून तिने कमर, आंग दाबण्याचा पुनः नखरा केला. 'थोडी जांबले तोडा ना. ते पाहा कशी पिकून गुळगुळीत झाली आहेत.'' माझा हात धरीत लडिवाळपणा म्हणाली.

''जा तोड, मी तोडणार नाही. घाव लागला आहे, पुरे झाले नाही का?''

''तोडा ना ! थोडीशी तोडाल तर यात काय मोठं हे बिगडेल.''

''हं !' असे फुस्कार करून पुटपुटत गेलो. झाडावर चढलो आणि ती खालून दाखवीत म्हणाली. ''हे बघा इकडे. इकडे हो.''

''चूप ग.'' असे म्हणून दुसऱ्या फांदीवर चढून वेचूं लागलो.

''ऐ ! धर.'' एक मूठ खाली फेकला. ती एकी कडे पडली. ''पदरात घेना–इकडे ये ना–आपला पदर पसर.'' असे बोलून सरासर जांबली वेचून खाली पाडूं लागला. मग खाली उतरलो. ती मला दाखवत होती आणि मी तिच्या पदरातून एक तोंडात घातले. ''बरं, चल आता.'' मी बोललो.

आम्ही तिथून येत होतो की, रस्त्यावर निघत असताना लालण्याचा काटा तिच्या पायात रूतला. ''आ... आय् !' असे उद्‌गारून तिने पाय उचलला. ''काय झाले?'' तसे मी विचारलो.

''काटा रूतला.''

''बरं झालं.'' असे म्हणून काटा काढण्यासाठी तिचा धरला.

''नको पाहिजे, माझ्या हातात शक्तिनाही का काटा काढायला.''

''वा, वा !' मागच्या बाजून पाय धरून, काटा काढून तिला दाखवत म्हणाला. ''बघ, – धर तुझा काटा.'' तिच्या हातावर काटा सोडीत म्हणाला.

तेथून फळे खात चाललो. जाता जाता आपण एका नदी काठी पोहोचलो. पलिकडे उत्तरेस एक जळप्रपात दिसत होता. त्याच्या अवती-भोवती झाडे उचंबली होती. इतक्यात सरितेला एक शुभ्र पक्षी उडताना दिसला. "तो पाहा तिकडे." बोटाने तिकडे इशारा केला.

"कुठे?" मी विचारलो.

"तिकडे वर पाहा."

"ओ–हो ! तो"

"कोणता पक्षी आहे तो?"

"त्याला पायांकील म्हणतात."

"कसा सुंदर दिसत आहे."

तिचे उत्तर न देता काही गोष्ट सांगितली. "तिकडे आभाळात बघ. सूर्याची किरणे त्या निळ्या आभाळातील दाटलेल्या ढगाच्या भोकातून पृथ्वीवर पडत आहेत." हातानी हावभाव करीत एकदम तिच्या कडेला येऊन कास्थाचे झाड धरलो. अलिकडे झिमझिम पाऊस पडत होता. काही दुरीवर नदीच्या थरात इंद्रधनुष्याचा गोफ दिसत होता. सूर्य डोक्यावर आला होता. मी जमिनीवर आडवा झाला होता. आणि ती ही माझ्या जवळच लोलली. मी तिच्या सुंदरतेला मोहीत झाला अन् इतक्यात उरावर रेंगाळू लागला. मग मी मान वर केली तर रवि भोवती मला इंद्राचे कमान दिसले. "हे इंद्रदेवा !तुझा खेळ कसा अनोखा आहे." आकाशाकडे पाहत उदगारला.

"कोणाचा खेळ? कसला खेळ?" ती म्हणाली.

तिच्या गळ्या भोवती आपले दोन्ही हात गुफून तिच्यिा नजरेत नजर मिळवून म्हणाला. "आज तूं माझ्या हाताच्या पासात पडली आहेस. तिकडे सूर्याच्या गळ्यात विन फुलाची सप्तरंगी माळ पडली आहे."

मग तिने वर पाहिले आणि झटदिशी उठून ती एकीकडे एका झाडामागे जाऊन उभी राहिली, आणि जवळची पाने मुरडून फेकत होती. ती जवळ नसळ्या मुळे मी उठून पाहिले तर जवळच्या वाढलेल्या झुडपामुळे ती दिसत नव्हती म्हणून इकडे तिकडे नजर टाकून शोधीत होता. पुढे गेला तर झाडामागून तिचे कपडे दिसले. गुपचुप मी तिच्या मागे जाऊन एकदम ओरडला. "पाव." त्या वेळी ती थोडे बहूत चरकली तिने मान वळवून त्या आवाजाच्या दिशेस पाहिले. मग मी तिच्या समोर येऊन दोन्ही हातानी तिचा गाळ धरला आणि माझे डोळे तिच्या डोळ्यात समावले. एका क्षणा करिता दिपावला होता. एवढ्यात

तिच्या पापण्या आपोआपखाली वळल्या, तसे मी आपल्या मनाने पुढीर उद्‌गार काढले.

"या गोड वाऱ्यात रूप तुझे आवडले।
पाहा या डोळ्यात मोती कसे भरले।
जीवाला वाटते एकदा चुंबून यावे।
या रेशमी केशात हा गोरा गाळ कसा लाजला।
ओठ हालले हसे फूल ते उमळले।
या रूपाचे काय वानू मोळ ते।।

असे म्हणून मी आपला उजवा हात तिच्या खांद्यावर ठेवला. त्या हाताच्या स्पर्शामुळे तिचे अंग रोमांचित झाले. विजा सारखी माझ्या गळ्या भोवती तिने एकदम हात घालून मला कवटाळून धरले.

"तुम्ही माझ्या स्वासाची तार हो।
तुम्ही माझ्या वाणीची धार हो।
देणार तुम्हीच मोती एक पाणीदार।
मी तर जीवनातला एक कार।
म्हणून तुम्ही मला सोडून जाणार नाही ना." ती म्हणाली.

"असा विचार तुझ्या लक्षात आला तरी कसा. सरिता मी तर तुझ्या साठी आला आहे. आणि सदा तुझाच राहीन."

"मला माहीत नाही हो, मला असे वाटले की आमची सोबत पुष्कळ दिवसा पर्यंत टिकणार नाही."

"वेडी कुठली, छे! असा खुळकट तोंडाने बाहेर काढायचे आहे का?" तिचा गाल धरून बोललो.

"माझ्या गळ्यात मंगळ सुत्र कधी बांधणार हो!'

"तुझ्या गळ्यात मंगळसुत्र,–याचेच फिकीर करतेस. बरं उद्याच आईला पाठवतो बात पक्की होईल."

"या जीवाचा काय भरवसा, कोण जाणे उद्या काय होणार ते?" उदास मनाने बोलली.

"हे तर खरं, पण तुला हे सर्व बोलायचे कारण काय?"

"अशीच सांगते."

"अशीच काय, काही कारण असावे म्हणून."

"नाही, देवा शपथ काहीच नाही. – हां उद्या जर आपले लग्न होईल. मुले होतील, पण मला काहीसे झाले तर मुलाना त्रास देऊं नका अं?"

"आपल्या मुलाला कोणी दुःख देतं का?"

"उद्या जर मी मेले तर तुम्ही दुसरे लग्न करणार की, मग ती बाई आपल्या मुलाला दुःख देणार नाही का?"

"पण तुला हे सगळं कुणी सांगितलं अं?"

"आजी नेहमी सांगते. काही सावत्र आया खट्याळ व अवदशाच होतात."

"सरिता, देवा शपथ जर तुला काहीतरी झाले तर दुसरे लग्न करणार नाही तुझ्या शिवाय. – आम्ही दोघे अशी बात करीत आहोत जसे की आपले लग्न कधी झाले आहे."

"केव्हां ते दिवस येणार जेव्हां आपण मिळून संसार करूं."

"फार लवकरच येणार आहे तो दिवस."

"चला की."

"वरं थांब इथेच मी येतो आता." असे म्हणून जवळच्या झाडावरला दिसलेला पेरू तोडायला गेला.

"हे धर पेरू खा. खूप गोड आहेत हे." ते आणून तिला देत म्हणाला. त्या सोन्या सारख्या पेरूना पाहून ती म्हणाली. "ही सर्व फळे खायला किती गोड लागतात, पण ती कशी ताजी तवानी होतात? हे कोणी पाहिले आहे का?"

"भला हा प्रश्न विचारायचा आहे का? ती कशी पिकतात? कशी वाढतात, हे सर्व आपल्याला माहीत नाही. आपल्याला फक्त एवढंच माहीत आहे. फळे पिकली की खालली पाहिजे."

"पुरूषाचे कामच काय?"

"बागेतील फळांना वाढविण्यास किती श्रम लागतो आणि ही रानातील फळे किती निराळी आहेत. त्याना न पाणी घालावे लागते. न खत ही घालावा लागते. पण त्यांची फळे किती गोड, ताजी व मोठी ही दिसतात." तसे मी पेरू तोंडात घातला.

"हां, पण दोन्ही फळे सारखीच असतात. त्याना मुबलक हवा हवी व भरपूर पाणी ही हवे." त्या फळा कडे पाहत म्हणाली.

"तुला सप्तरंगी माती पाहायची होती ना. चल पाहून येऊं" ह्या प्रकारी तिच्या बोलण्याच्या उद्देशावर मात मारली.

"चला !' ती म्हणाली. मग तिच्या कटीवर पाणि लावून फळे खात हासत खेळत तेथून निघालो.

आम्ही दोघे रानातील मळल्या वाटेने जात होतो. अरण्यातील वृक्षलता वाढलेली. तरूराज डौलाने बहरले होते. आणि रानटी फुलझाडे हळाहळ हासत होती. कपी महाराज आपल्या कळपासवे मौजेने या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत क्रिडा करीत चालला होता. त्या पशुना बघून मी तिच्या कडे बघून सोंग करूं लागला. जसे मी पण त्याच्या मध्ये मिसळला होता. माझे वाकडे तोंड पाहून तिला तर आपार मजा वाटली.

वाट नागा सारखी वळणे घेत पुढे निघाली. आपण दोघे तरणे त्याच वाटेने वळत गेलो. जणू प्रेमाची रसिक पावळात पावळे मिळवून गाणे म्हणत जात होतो.:–

मुलगा– "मनाला मनाच्या दोरीने बांधून।
संग संग चालतो इथे आपण।।
ही पावले मिळवून जातो जिथे।
घेऊन जातो गोडी तुझी तिथे।
मुलगी– हे प्रेमाचे पथिक सांगा तुम्हीच
आपली सहल संपेल कुठे?
मुलगा– जिथे मन माझे गाइल रंगून।।
मुलगी– नव्या जगात नवी रोशनी आली।
इथे आवड माझी लपली होती।
मुलगा– इथेच कुठेतरी लपली होती।
मनाला खबर मुळीच नव्हती।
पदर सार आवड आली जागून।।
मुलगी– कळीचे माझे आता हे फूल झाले.
म्हणा हो आता चूक कोणी केले.
मुलगा– सुमन हे उमळत राही सदा
मन आपले मिळत राही सदा
या जीवाला जीव कोश मिळाला
तुम्हाला विचारते हे मन।।

दुपार उलटत आली. ह्या सगळ्या बायांचे गवत कापणे पुरे झाले होते. त्यानी मोळ्या बांधल्या पण सरिता अजून दिसत नव्हती. म्हणून गौरी तिला शोधायला गेली. तरी ती दिसलीच नाही. लोकांना कळू न यावे की ती सरितेला बघायला गेली होती की काय, त्या करिता ती मुद्दाम जंगलात शिरली. काही वेळाने थोडे गवत कापून घेऊन आली. त्या बायकापैकी एकीने विचारले. "अग पोरीनो ! चलाल नाय का?"

"चला चला बाई माझे थोडे घास तिकडं राहलंय् ते आणून तुमच्या पाठलागच येते." गौरीने सांगितले.

"चल ग पोरी, मग येऊन नेना." ती बाई म्हणाली.

"मग केव्हां न्हियाचं ग. चला ना आम्ही येताव ना."

"अग ती सरिता कुठं हाय्?"

"ते काय तिकडे घास कापत बसलेय ती."

"ती जाल की नाय्?"

"चला ना आम्ही तिच्या बरोबर येताव."

बाकीच्या सगळ्या बाया आपापली मोळी घेऊन गेल्या. बराच वेळ झाला तरी सरिता दिसत नव्हती.

"अरे, ही गडी अजून करतेय् बरं." असे विचार करीत गौरीने पुटपुटत आपली मोळी बांधत होती. त्यांची अंगे घामाने बडबडली होती. गौरीच्या गालावरून घाम गळत होता.

"गौरे ! ही सरिताबाई कुठं हाय् ग अजून दिसत नाय्." मालतीने विचारले.

"जा बघ ना तिकडे."

मालती सरितेला बघाय गेली, पण ती कुठे ही दिसली नाही. म्हणून ती परत आली.

"अग तू आताच सांगितलीस ना. ती घास कापतेय. पण ती मुळीच दिसत नाय?"

"मला काय ठाऊक ग. ती कुठं गेलेय् ते." तसे बोलत गौरी समोरच्या दगडावर बसली. "एक तर मी थकलेय्, आणि उलटं सरिता कुठं हाय्. जशी तुला म्हायृत नाय. बावा बरोबर कुठं तरी गप्पा गोष्टी करीत बसलीय् असेल.". गौरी म्हणाली.

"तुला तर भलतंच सुचलय्." मालती उठत म्हणाली.

"नाय तर जाऊन सोध ना, मला काय विचारतेस." तिचा रागीट स्वभाव दाखवत म्हणाली. गौरीला काही न म्हणता पुढे जाऊन येरझारा घालत होती. या बाजूला बघ त्या बाजूला बघ पण ती दिसेच ना.

"आका—आका—ओ आका चल ग. आम्ही जाताव ग चल." पण सरितेकडून कुठलेच उत्तर आले नाही म्हणून तिने पुनः हाक मारली पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

"मालती, ए मालती ! येग आखरीत च करते ही, तिला घराची शुद्ध हाय का?" गौरीने मालतीला हाक मारत म्हणाली.

"आता काय बोलतील ते लोकं घरात." मालती स्वतःशीच म्हणत होती. "चल ग बाई तिला सोधायला. नाय तर काय म्हणतील आम्हाला."

"कोण काय बोलंल? कुणाची गरज हाय बोलायला."

"अग आई ईचारंल ना. मग काय सांगशील."

"कोण, आई, ती तर उद्या येल."

"बाबानी ईचारलं तर...."

"काय तरी सांगून ठेऊं. तो पावत येईल." असे म्हणून गौरी घरी जायला उठली.

"चल ग, तिला कुठं जाऊन सोधशील. येईल आपली एकटी. ये उचल." गौरी आपल्या मोळी जवळ येऊन म्हणाली. पण मालती विचार करीत होती की आपण तिघी बहिणी सकाळी घरातून संगेच निघालो आणि आता तिला जंगलात सोडून जाऊं हे कसे शक्य होईल. या व्याकुलतेत बुडाली होती. पण शेवटी ना इलाजाने त्या दोघीना घरी परत जावे लागले.

इकडे चालता चालता आम्ही दोघे प्रेमाच्या धुंदीत एका उंच सखल स्थळावर पोहोचलो. क्वचित आम्ही थोडे बहुत थकलेले होतो. येथे आल्यावर दीर्घ स्वास घेत आम्ही उभे राहिलो. दुरून एके ठिकाणी माती ढीग ढीग भर ठेवलेली दिसत होती.

"हे काय दफनस्थान?" त्या मातीकडे इशारा करीत म्हणाली.

"ते."

"हां तेच."

"ते तुला दफनस्थान दिसत आहे?"

"तर मग."

"हे दफनस्थान नव्हे माझी राणी. यालाच स्वर्ग म्हणतात. तू तर स्वर्गाच्या तळाला जाणार होतीस ना."

"ही माती, आणि स्वर्ग, हे म्हणता तुम्ही."

"चल ना एका क्षणात सगळं पटेल की."

"असं, बरं, चला तर पाहू." तिने असे म्हटलेच की मी तिचा हात धरीत पुढे चाललो. चार पाच पावले पुढे गेलो. एवढ्यात ती धावत सुटली. मग काही बीक च दिसले असावे की काय म्हणून ती थोडी थबकली. खरोखर तिला काहीं नवल दिसला असेल असा मला भास झाला होता.

"हे काय?" मी विचारलो.

"सृ... ऊ... प." तोंडाजवळ बोट आणून उदगारली. पण यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या भूमीवर इंद्रधनुष्याचे रंग पडले होते. जणू काय इंद्राची वसतीच असावी असे तिला वाटले असावे. पण तिला माया नगरीची काय कल्पना. तिला तर एक मात्र वेड लागली होती. "सरिता–ए–सरिता." जसे कोणी तिला हाक मारत होती. "सरिता, ये ना ग. माझी लाडकी बाहुली." एकाएक तिने आपला हाताचा पंजा मोकळा केला. एक टक लावून हळुहळु पावले टाकत चालली होती; की अकस्मात ती. धावत जाऊन सृष्टी मातेच्या गोदीत लोळू लागली.

मी गडी तिला बघतच राहिलो. मग काय करावे मी तर आणखी घोटाळ्यात पडलो. "अरे. हिला झाल तरी काय, जे अशी धावत गेली." या विषयी मला काही कल्पना नव्हती. या विचाराने मला काही समजेना.

"बस, आता इथे उभा राहून काय करायचे." असा विचार करून स्वतःशी बोललो. शेवटी मी पण पहायला गेलो. ती जणू तल्लीन झाली होती. हातानी त्या मातीचा उधळाउधळ करीत होती. मी मंदगतीने तिच्या समोर जाऊन उभा राहिलो. झटकन वाकून खालची दाणेदार माती उचलून तिने माझ्यावर अक्षतांचा अवरोहन केला. मी आपल्या कल्पनेने सुद्धा तिच्या मिळालेल्या आनंदाचे वर्णन करायला असमर्थ झाला आहे.

"हे काय करतेस अं?" असे म्हणताच तिने जवळच्या बियेफीची फुले वेचून मला आयुष्यमानाचा आशिर्वादच दिला होता. "हे काय करतेस अं?" मी पुनः म्हटले.

"अं ! काय करते, काय करते?" असे म्हणताच माझ्या तोंडाकडे बघता बघता बेहोश झाली आणि धाडकन त्या आईच्या उरावर पडली. तिची हनुवटी धरून हालवू लागला. "सरिता, सरिता, काय झालं तरी?" तिला हाक मारत होता. पण ती बोलणार कुठे. झटदिशी मी आपल्या अंगावरचा सदरा काढून वारा घालू लागला. त्याचा काही उपयोग होत नसल्याने मला एक युक्ति सुचली. सदरा घालून पाणी शोधायला गेला.

काही मापाच्या अंतरावर एक ओढा वाहत होता. मी ओढ्या जवळ गेलो. आपल्या बरोबर भांडेगिंडे नव्हते. पाणी न्यायचे कसे ह्याचा विचार करीत होता. माझी दृष्टी कच्चूच्या पानावर वळली तसे ते मुरडून, त्यात पाणी घेतले.

तिकडे ती शुद्धीवर आली तर मी तिथ नव्हता. ती मला हाक मारू लागली. तिचा आवाज माझ्या कानापर्यंत अस्पष्ट होता. म्हणून मी तिला साद दिला नाही. आता ती मला सोधू लागली. मी तिकडून कच्चूच्या पानात पाणी घेऊन येत होता. जेव्हां मी त्या

ठिकाणी आलो तर ती गायब झाली आहे. असे पाहून मी देखील मोठ्याने हाक मारूं लागला. ते ऐकताच परत येत होती. मी पश्चिमेस तोंड केले होते. "कुठे गेला होता तुम्ही?" पाठीमागून तिने विचारले.

"जो प्रश्न मी तुला विचारायचा होता. तो तू मलाच विचारतेस."

"हे कशाला?"

"ऐका आता, हे कशाला? या दुनियेची रीत पाहा. मी म्हणतो ना."

"काय, मी म्हणतो ना. मी हे विचारते, हे काय करायला आणलात?"

"तुझ्या साठी."

"तुझ्या साठी. माझ्या साठी का?"

"बरं. आधी हे सांग, ठीक आहेस ना?"

"हो, पण...."

"पण तुला काहीच–बरं राहू दे ते तिकडे." असे बोलताच ते पान सोडून उजवा हात वर उचलला की सारे पाणी खाली पडले.

"गेलं सारं मसनात." तसे म्हणून ते पान झडकावून टाकले. मग ती खदखदा हसूं लागली.

"हसण्या शिवाय तुझे कामच काय. जिकडे पाहा तिकडे बत्तीशी काढत राहते."

"अहो, मी काय केले जे माझ्यावर असे कोपता."

"कोपणार नाही तर काय. मगाशी स्वर्गाचे नाव ऐकताच बेशुद्ध झालीस. वारा घालूं लागलो, महाराणीसाठी पाणी सोधायला गेलो."

"मी बेहोश झाले होते. कुठे?"

"तू–ये दाखवतो?"

आपण दोघे तिथे गेलो. "बघ, इथे डोळे वासून बघ खूप." तिचा हात धरून म्हणाला.

"ही कुणाची जागा आहे हो."

"ही देवाची जागा आहे, अन कुणाची आहे?"

"देवाची ही मायावी भूमी पाहा आगळिक
उंच असा स्थळी सृष्टि एक अलौकिक ! आहे ना !'

"हो, शामारेल नाव लाभले या स्थळाला
अति रम्य हे देखावे हे देखावे जगाला
मर्गी गमने पांथिकास लाभले हारिख
बघा बघा ना पवित्र अशी माझी धरणी दैविक॥"

माझे म्हणणे ऐकून माझा हात ओढून ती म्हणाली.

"हे पाहा इकडे, सात रंगाची भुमी जणू इंद्राची ही बसती.
चित्त आपले पाहा कशी आकर्षती
रचना ही ओळखावी जाऊनी नजीक
जवळून ते कळेल नाही तिचे बीक."

थोडे पुढे जाऊन त्या डोंगराकडे उद्देशून मी हे पुढील उद्‌गार काढले.

"पाहुण्याचे स्वागत करती पर्वत माळे.
फुलुनी झाडे देऊनी रसाळ जी फळे
पुण्यवंत असावा इथला तो थवाईक
ज्याने दिली आहे जगाला ही शोभा नैसर्गिक."

"बघा बघा ना माकडे रमविती क्रिडा करूनी
पाखरे ती कशी मन भाती गगनी तरंगुनी
आणि समीर तुसार निसर्गाला देती पौष्टिक." ती माझ्या भोवती फिरून आसपासच्या झाडावर माकडाना दाखवित म्हणाली.

समोरच गोयक्देशीनचे झाड होते. मी तिला उचलून त्या झाडाखाली बसवले. एक लहानशी काडी घेऊन जमीन खवत तिने मला विचारले.

"अहो, केवढ्यांदा तुम्ही इथे आलात हो?"

"मी तिसऱ्यांदा आला आहे की."

"मला वाटतं तुम्ही देशाची खूप सहल केली असावी."

"अग, रात दिवस कामात गढून राहिणे आणि सहल करा‹ ग वेळ कुठं."

"तर काय लग्नानंतर घरातच कोंडून ठेवाल का?"

"कुणाला?"

"हे पण सांगायला हवं आता."

"हो समजलं, एकदा लग्न झालं की नेतो फट फटण्यावर चढवून."

"नको बाबा नको."

"आताच म्हणत होतीस ना."

"त्या खटाऱ्यावर चढीन तर समजा जीवाचा काळच आला."

"सगळी माणसं तुझ्यासारखी असली तर खरोखर घरातच बसून मरतील."

न जाणे का, ती एकैक उदास झाली. तिला त्या स्थितीत पाहून मी विचारलो. "अरे !

हे काय? हा गुलाबासारखा गाल असा कसा कोमजला अं."

"काही नाही."

"काही नाही...."

"जेव्हा पासून तुम्ही मला भेटलात ना तेव्हां पासून कुठल्याही कामात माझे अंग लागत नाही."

"तू समजतेस तुला एकटीला तसे घडतं. मी, काय बोलूं मला अस वाटतं रात्रंदिवस तुझ्या बरोबर बसून मोकळ्या मनाने चार गोष्टी सांगत बसूं, पण माझी आई आहे ना, जरा इकडं तिकडं झालं की, बस, झाला घोटाळा." प्रेमाच्या भरात तिला असे सांगितले.

"बरं चला आता, उशीर झाला आहे. आई तुमची वाट पाहत असेल."

"बरं चल." असे म्हणून आम्ही तेथून निघालो.

जाता जाता सगळी कडे सावलीच सावली पसरली होती. भानु आईच्या सोनेरी पदरा खाली झोपायला जात होता. पक्षी चरूनबिरून झाडावर आपल्या चिमण्या बाळांना गोड गोष्टी सांगत होत्या.

संध्याकाळ झाली होती तरी ती घरी पोहोचली होती. या वेळी गौरीला तिची मोठी काळजी वाटली होती. "बाबा कामावरून आलं अन् विचारलं तर त्याना काय सांगायचं." असा विचार करीत बसली होती. सहा वाजले होते. त्यांचे वडील कामावरून आले.

त्यानी आपली टोपली खांद्यावरून काढीत असता सरितेला हाक मारली. "सरिता बेटी."

तसे आतूनच गौरीने आवाज दिला. "जी, येते."

त्यानी ती टोपली व काठी मेजावर ठेवली आणि दीर्घ स्वास सोडीत एका जुन्या आराम खुर्चीवर बसले. ते बिचारे पार थकले होते म्हणून आरामखुर्चीवर अंग थोडे सैल सोडले होते. त्यांचे डोळे अर्धवट मिटले होते. गौरीने फुलपात्रात चहा आणला.

"बाबा हे घ्या चहा." वाटी पुढे देत म्हणाली.

तिच्या कडून वाटी घेऊन चहा पिऊं लागले. चहा गरम असल्यामुळे त्यांचे तोंड जळाले. "एवढा गरम." लगबगीने म्हणाले.

"फुकून प्यायचा होता." ती अशी म्हणाली. हसू आले म्हणून एकीकडे तोंड फिरवून तिने तोंडावर हात लावला.

"हां ! सरिता कुठं ग?"

"ती बाहेर गेलेय बाबा." घाबरत घाबरत म्हणाली.

"ते बघ, टोपलीत झिंगे आणलयं आणि थोडी माटेची भाजी ही आणलेय्. ती ठेव तिकडं. तरकारी काय बनवाल?"

"डाळ चढवलेय चुळीवर."

"बेस हाय्. त्यावर ही भाजी भुंजा आणि झिंग्याची चटणी वाटा."

"हां. बर." असे म्हणून टोपली घेऊन ती सैपाकघरात गेली.

मालती दाराजवळ येऊन उभी होती. गौरीच्या हातात टोपली पाहताच ती तर एकदम घाबरली होती. "काय, बाबानी विचारलं नाय का?" असे मालतीने विचारले.

"हां, विचारलं, का?"

"अग बाई माझी, काय होईल आता या पोरीला."

"जे होईल ते होईलच अन् काय."

"तुला तर कायच वाटत नाय्."

"हं, मार गोली ग. काय वाटतयं अन् काय वाटत नाय. हे सगळं मग पाहू. पण तू तर अशी घाबरलीसं जशी हे सारं तुझ्यावर घडतय अं."

शंकराची आंघोळबिंघोळ आटोपली. ते पौढ लोकांना भजने, पदे व अभंग आणि तरण्या मुलांना ही लिहणे शिकवण्यासाठी सभेत गेले होते. त्या विकटकाळी त्यांची शिक्षण पद्धति आजच्या पेक्षा निराळी असून त्या मुलांचा अभ्यास एका विशिष्ट प्रकाराने चालला होता. त्या वेळी ज्याला बाराखडी आली, की त्याला वाचता आले. पांडूप्रताप, हरिविजय, शनिमहात्म्य वाचता आले तर तो विद्वान समजला जात होता. त्याच शिक्षणाचे फळस्वरूप आज आमच्या देशात ही मराठी बोली जागली आहे. पण आधीचे हे सारे काम तोंडपाठ व्हायचे.

आम्ही दोघे येत होतो. थोड्या वेळाने पलिकडचा तो सोन्याचा गोळा जाऊन लपला. त्या शांत वातावरणात जगाने काळा बुरखा घेतला होता. ढगामागून चंद्र एकदम डोकावून हसला तसे मी हे पुढील गाणे आरंभिले:—

नभात चंद्र हा आला, तसा माझा चंद्र हसला।
या काळ्या केसात पाहा कसा माझा चंद्र भासला।।—
गडे आता चरणी त्याच्या सूर्य हा मावळला।
पाखरे सारी विसावली झाडाच्या फांदीला।
आपण मात्र भटकतो या बिकट वाटेला।।—
नवळ काय धरणीवर कमळ उगवले

जळाशयी काळा भुंगा फसला अंबूज मधे
पाहा ना तशी निशा माझी आली रिझावयाला॥–
एक भुंगा गुणगुणला रस भरी कहाणी
विसरले देहभान कानी पडताच गाणी
करूं काय, त्याने मोहिले माझ्या कोवळ्या मनाला॥–

गाणे संपले. तिला गावापर्यंत पोहचवले आणि मी परतलो.

बाईल माणसं व मुली घरच्या कामात रंगून गेल्या होत्या. घरात दिवे लागले होते तरी सरितेचा पत्ता नव्हता. ती कुठे गेली होती देव जाणे. या दोघींचे जेवण तया होत आले होते गौरी वादळीत माडपाणी घेऊन गाईना पाजायला जात होती. अखेरीस सरिता गोठ्याकडून येत असताना दिसली.

"गौरी बाबा कुठं आहेत ग?" सरितेने मंदस्वरात विचारले.

"ये ये, पाठ गरम करून ठेव आज. कुठं होतीस तूं या ओक्ता पावत?"

मान वर करून तिच्या कडे पाहत उत्तर न देता म्हणाली.

"हळूच बोल ग."

"हळू बोल, आज काल तुला काय झालयं. मला वाटतं तुझ्या कपाळात भूत चढलंय्."

"काय करूं ग मी...."

"तुझ्या कपाळात अक्कील ना हाय काय. जा जा." ह्या प्रकारी बोलून गौरी गोठ्यात शिरली.

सरिता भीत भीत चोरासारखी शिरली. मालती चुळीजवळ होती. पेटलेल्या चुळीवर कढई होती. दिवा टिमटिमत होता. बाटली वाकवून कढईत तेल घालत होती की, कोणी तरी आत शिरले आहे असा भास झाला म्हणून तिने दाराकडे मान वळवून पाहिले ;तर तिच्या समोर सरिता उभी होती. "सरिता, तू कुठं होतीस ग. अचानक कुठून उगवलीस ग आता." मालती कढईत तेल ओतत म्हणाली. पण सरिता दगडा प्रमाणे स्तब्ध राहिली.

"कुठं होतीस ग. बाबा गौरीला विचारत होतात. तू हायेस म्हणून." मालतीच हे डसणारे वचन ऐकताच तिच्या अंगाचे थरकांप सुरू झाले. ती तिथून मधल्या घरात गेली आणि पाट घेऊन एका काळ्या कोपऱ्यात बसली. 'खरोखर आज आपल्याला मार मिळेल बाबाना ही बातमी कळली की जीवाचा सुटकाच नाही बाई. आता काय करूं मी.' याचा विचार करीत असता तिचे हातपाय एकदम गळाले. तिचे मन याच विचार मग्नात एकसारखे घोटाळत होते. तिकडून मालती थाळी घेऊन घरात आली. ती मेजावर ओणवून एक नजर सभोवार फिरवली पण तिला ती दिसली नाही. मधल्या दाराच्या फळीवर टिनाच्या लहानसा टिमटिमणाऱ्या दिव्याच्या वरच्या एका टिनावर काजळी लोंबत

होती. मालतीने तिला हाक मारली. ती गप्पच बसली आणि ती काय तिथून ठसकली नाही. मालतीने पुढे येऊन पाहिले तर ती बिचारी कशी गरीब दिसत होती. ढोपऱ्यात मान खुपसून बसली होती. तिला काही न म्हणता ती तशीच सैपाकघरात परत गेली. याच क्षणात गौरी आली.

''कुठं हाय ग ती?'' हातातील बादली खाली ठेवीत तिने मालतीला विचारले.

''जा बघ ना तिकडे, कोणपाडीत कशी बसलेय.'' चटणीची कढई उतरून म्हणाली. मग दोघीजणी गुपचुप मधल्या खोलीत आल्या आणि तिच्यावर टोमणे मारू लागले.

''दिवस कसा मजेदार होता ग.'' गौरी म्हणाली.

''वा किती छान.'' मालती बोलली.

''काय हासत होता. काय गोष्टी करत होता आणि मी म्हणते, काय मोठी मच्छी मारल्यान त्याने.''

''आणिक तो काय डोळे मिचकावत होता.'' मालती म्हणाली.

त्यांच्या बोलण्याचा काही असर झाला नव्हता म्हणून गौरी हातानी फेरफटका करीत म्हणाली. ''काय ग आज वाटतं रूसलीस बया.''

''कशाला रूसेल ग.'' मालती म्हणाली. मग सरिते जवळ जाऊन तिचे डोके वर उचलून.

''खरच ग रूसलीस?'' ती वदली. तरी सरितेने एक शब्द म्हटला नाही.

''ती अशी तशी मानायची नाय बाई.''

दोघीजनी एकेक बाजूला बसून तिला गुदगुल्या करूं लागल्या की तिला तसे राहता आले नाही ती खदखदा हसू लागली. ''सोडा ग, सोडा-सोडा.'' असे म्हणून कशीबशी ती त्यांच्या तावडीतून निसटून त्या दुसऱ्या खोलीत गेली.

सुमारे आठ वाजली रात्र असावी त्या वेळी वडील बैठकीतून आले. ''जनावराना घास घातलाव की नाय ग पोरीनो?'' त्यानी विचारले. ''हां, घातलाव.'' असे म्हणून गौरीने सरितेला पाणी आणायला सांगितले. ''बाई, बाबाना पाणी आणून दे ग.'' मग वडिलाना जेवण काढायला गेली. सरितेने वडिलांना जेवण वाढले. नंतर तिघीनी देखील पंगत बसून आवडीने जेवल्या. शेवटी सगळी निजायला गेली सूख स्वप्नात रात्र निघाली.

दोन तीन दिवसानंतर रुक्मिणीबाई व मुलांची आजी शहराकडून परतून आली होती. संध्याकाळी सर्व कामे आटोपली होती. जेवण झाल्यावर शंकर हिशोब करीत होते. रुक्मिणीबाई फाटलेल्या कपड्याना खुंटी लावून दुरूस्त करीत होती. आजी दळणे दळत

होती. मुली झोपायला गेल्या होत्या. मकाई दळून विकणे हे आजीचे दुहेरी काम होते. तिच्या बरोबर विष्णू दळणे दळीत होता.

"अहो, त्या रोजी कमला मला बोलीत होती. तिनी एक पोरगा बघितलाय्." रुक्मिणीबाई बसल्या बसल्या शंकराकडे बघत म्हणाल्या. आणि सुई मधी धागा घालूं लागली.

"कमलानी पोरगा बघितलाय कुणाला?" त्यानी विचारले

"सरितेला."

"पोरगा कुणाचा?"

"रामाचा."

"राहतो कुठं?"

"तिथंच त्यांच्या घरा जवळ राहतो."

"तुला तर ठाऊक हाय् ना."

"काय?"

"आमच्या घरी मुलगी हाय आम्ही त्यांच्याकडे कशी जाऊं. आधी त्याना इयाला पाहिजे."

"मी काय त्यांच्या घरी जायला सांगतेय्. ती बोलत होती, जर कोणी बघायला आलं नसल तर ती जाऊन तिथं बात लावायला सकंल."

"जर तसं असंल तर तिच्याकड निरोप धाड. नाय तर पुढच्या आठवड्यात भेट दियाला जाशील ना. तंव्हा तिला सांग, त्याना घेऊन येईल."

असे बोलून आपली वही ठेवली. "हात्रून केलीस ना?" त्यानी बायकोला विचारले.

"हो, केलय, बघा लोई दोरीवर ठेवलेय ती, घ्या."

रात्र खूप चढली होती. दळणे दळत असताना सासूबाईचे डोळे मिटत आले. विष्णू चटईवर झोपला होता. तिकडे सूनबाईला जांभई आली. शंकर अगोदरच निजायला गेले. खाट्यावर बसून आपली तंबाखू काढली. चकमक पेटवून तंबाखू ओढली दोन दम मारून मारून कुठल्या तरी विचारमग्नात बुडाला होता. सासूबाई पोराबरोबर निजायला गेली. रुक्मिणीबाई सैपाकघरातून एका तांब्यात थोडे पाणी आणून मेजावर ठेवले. मग सगळी दारे बंद करून सारे दिवे विझवून खाट्यावर गेली.

बघता बघता पुढचा श्रवण महिना आला होता. थंडी वाजत होती. या महिन्यातील कृष्ण पक्षात इथल्या मराठ्यांना शनिमहात्म्य ऐकण्याचे श्राद्ध असते. दर वर्षाप्रमाणे यंदा शंकराच्या घरी एके शनिवारी शनि महात्म्याची पूजा होणार होती. त्या करिता शंकरानी आपल्या सर्व मराठी बांधवाना लहाना थोडाना, भजन मंडळी नाही बुक्का दिला होता. त्या वेळी आमच्या कुटुंबात अशी एक प्रथा होती की जिथे जिथे शनिमहात्म्य, भजन कथा आदि पूजेच्या कार्यास ज्या ज्या भक्त भाविकाना व भजन मंडळीना आवतणे मिळाल्यावर ते कधी ही चुकत नसे.

या निमिताने सर्व आमंत्रित भक्तंगण व भजन गाणारी मंडळी शंकराच्या घरी शनिवारच्या संध्याकाळी हजर झाली होती. मी मारवत या तरण्या मित्रा बरोबर जरा उशीराने गेलो होतो. आमच्या दोघांची ओळख दोन तीन वर्षाची होती. त्या अल्पवयात तो कशी सुंदर भजने म्हणत होता की मोठमोठ्या लोकांची डाळ गळत नव्हती. रातची वेळ होती. गावात सगळी कडे दिवे उजळत होते. आम्ही दोघे डोंगर ओळांडून आल्या मुळे थोडे बहुत थकलो होतो म्हणून आम्ही मंद गति ने गप्पा मारीत जात होतो. भजनात जाण्यासाठी गावातील लोकांची एकच गडबड चालली होती.

मी आपल्या सोबत बरोबर दारा जवळ प्रवेश झाला. गादी मधळ्या घराच्या दक्षिण कोण्यावर मांडलेली होती, जिथे पूजेचे सर्व साहित्य व्यवस्थित ठेवले होते. मेजाच्या पश्चिमेस पूजेसाठी घरधनी व त्याची बायको पोरे ध्यानस्थ बसली होती. माणसे येत होतीच. गोसाव्यानी नवग्रहाची पूजा आरंभली होती. मी पंचमंडळीना साष्टांग प्राणिपात केला. अचानक मी सरितेच्या दृष्टी समोर आला की तिचे मन आनंदाने रातराणी परी फुलून सुवास उधलूं लागला. तिच्या चेहऱ्याचा गुलाब उभरला. मी आपल्या भजन मंडळी बरोबर आसनावर मारवत जवळच बसला होता. पूजा संपली, गोपाळ गोसाव्यानी शनि–देवाची कथा वाचायला सुरवात केली. आलेले भाविकजण मोठ्या आदराने कथा श्रवण करीत होते. मग त्यानी उपासकरीना उपास सोडवायला लावले.

आमचा कारकून ही तेथेच होता. मला पाहून लक्ष्मण सुद्धा आनंदले. त्यानी तर माझी मोठी खातर केली. खान्नपानाने ही आमचा सत्कार झाला. भजन म्हणायला प्रथम पाळी मारवत वर आली. सर्व प्रथम त्याने एक गण म्हटले. आणि भजन पंचपदी असल्याने फार रोचक होते. भजन ताल सुरावर नेऊन तर कमाळच केली होती. मी त्याच्या बाजूला बसून त्याची साथ देत होता. मारूतीने त्या रात्री भजन म्हण्यात चारचांद दाखवला. सगळी माणसे त्याचीच बोलबाला करूं लागली. सकाळी भुपाळी, आरती व गाऱ्हाणे आदि त्यानेच घातले होते.

क्षितिंजावर भानू जागला. शंकरानी पंचामृत दिली, खिरापत वाटली सगळ्यांना चहा दिला. मी सगळ्यांना निरोप घेऊन जात होता की लक्ष्मण बुवानी मला थांबायला सांगितले कारण माझ्याशी काही विशेष विचारायचे होते. मी जरा थांबलो. बाहेर उभा होता म्हणून शंकरानी मला आत बोलावले. बसायला पाट दिली. याच वेळी आपल्या होणाऱ्या सासऱ्याची ही पहिली ओळख पटली. लक्ष्मण कोणी दुसऱ्या पाहुण्याशी बोलत होते.

सरितेने एका कागदात थोडा प्रसाद गुंडाळून आणला.

"हे सर्व आला द्या आणि हो, तुम्ही जात आहात?" ती पुडी देत म्हणाली.

"हो."

"असे लवकर."

"तुला तर लवकरच दिसत आहे."

"त्याना माझा नमस्कार सांगा."

"ओळख बिळख झालीच नाही आणि नमस्कार सांगायचा ; बरं."
मी जरा मिसकीळपणाने म्हटलो. मला काही उत्तर न देता जाता जाता तिने मागे वळून माझ्याकडे हास्य नजर टाकत गेली. माझ्या न कळत हा सगळा प्रकार लक्ष्मणानी थोड्या अंतरावरून पाहिले. ते माझ्या जवळ आले. "पोरगी कशी दिसते?" त्यानी मला विचारले.

"चांगलीच दिसते पण स्वभावाने माहीत नाही."

"भीमराव, लोणी सारखी मऊ आणि मेंढी जशी भोली आहे. बोला, कशी काय मुलगी आवडली का?"

"आवडली का? आवडायची व न आवडायची गोष्ट उरली कुठं? आपली परिस्थिती तुम्हाला तर माहीत आहेच."

"हो बरं, आईशी चर्चा करीन."

"जे मनात येईल ते करा. पण मला माहीत आहे. आईला ते आवडणार नाही."

"तुम्ही त्याची फिकीर करू नका."

"लक्ष्मण, पाहा इथली माणसं कशी सुखी दिसतात ना." त्यांच्या कडे लक्ष न देता मी त्यांच्या समोर भलतीच कल्पना मांडली.

"तुमची दया असली तर सारी सुखी होतील."

"माझी कशली दया. माणसं नीट वागतील तर सर्व होईल. पाहा, आता तुम्ही इथले मोठे माणूस, तुम्ही जे कराल, जे सांगाल, जो संस्कार घडवाल तोच या आजच्या नव्या

पिढीना मिळेल. खरं की नाही."

"हे तर खरं पण...."

"पण पण काय, प्रयत्न करा."

"करायला हवं."

"कशी, कालची ती गोष्ट संपली का?" मी त्याना विचारलो.

"कालची गोष्ट, ओ, हां कालची गोष्ट अपुरी पडलेय." थोडे विचार करून त्यानी माझे उत्तर दिले.

"तुमच्या बोलण्यावरून मला असं वाटते की, ती मलाच पुरी करावी लागेल."

"तुम्ही तरुण आणि मी पिकलेला पान. समुद्रात उडी मारणे हे तरण्यांचे काम. म्हणजे ती गोष्ट माझ्या सारख्याने होणार, हे शक्य नाही. ती तुम्हीच पुरी कराल." माझ्या तारूण्याकडे पाहत व स्वतःच्या डोक्यावर हात फिरवून म्हणाले.

"असं कसं होणार."

"अरे बाबा ! होणीला कोण अडवतोय."

"बरं लक्ष्मण, खूप वेळ झाला आहे बोलता बोलता. मला वाटतं आता जाण्याची वेळ आली आहे."

"अहो, एक दिवस तर आपल्या सगळ्यानाच जायला हवं. इथं कोण राहायला आलाय. आम्ही तर थोड्या घडी साठी इथले पाहुणे." ते म्हणाले.

"हे सारं तर समजतो पण...." उठत म्हणालो.

"पण इथं येऊन भरपूर आनंद लुटा. असा माझा विचार होय." माझा हात धरून पाटावर बसवीत लक्ष्मण म्हणाले.

"बघा, इथून मला तामारें पर्यंत चालत गेलं पाहिजे. आणि गाडी सुटली तर जायला किती घोटाळा होईल.

"गाडी सुटली तर, झालं काय? आम्ही काय परके. हे आपले घर नव्हे का?" मला असे म्हणून शंकराकडे बघितले. "का हो?" त्याना असे म्हणाले.

"ओ, भिमराव जाणार नाहीस का?" मारवतने बाहेरून विचारले.

"येतो की, जरा थांब ना." असे मारवतला सांगितलो.

"बरं, कृपा असावी. मी येतो." ह्या प्रकारी लक्ष्मणास म्हणून निघालो.

"बरं, या. हा आईला माझा नमस्कार सांगा." ते म्हणाले. जात असताना सगळ्याना नमस्कार करीत जात होतो. मारवत सुद्धा माझ्या बरोबर च निघाला. मला आपल्या घरी पाहून सरितेला व तिच्या आजी ला किती आनंद वाटला होता.

# ११

काहीं दिवसापूर्वी आईने लक्ष्मणाला जे काम सोपले होते ; त्याचा अंदाज कळला नव्हता म्हणून एके रविवारी लक्ष्मण आपल्याकडे आले. त्या दिवशी एकटीच होती. तोतेथे पोहोचला तर दार बंद होते म्हणून त्यांचे मन थोडे खचले पण एक बाजूची उघडी खिडकी पाहून त्याला थोडा धीर आला असावा म्हणून की काय त्यानी दार खटखटावले थोड्या वेळाने आई आतून पडवीत आली आणि लक्ष्मणाला पाहताच तिला प्रसन्नता वाटली. "लक्ष्मण दादा, या या."असे म्हणत तिने दार उघडले व त्याना आत घेतले. ते शिरले पण उभेच होते. "बसा ना, बसा." असे म्हणाली. "घरातून नुकतेच आलात का?" असे बोलून ती सुद्धा बसली. तिने मुलांचे निरोप घेतले व आणखी इतर गोष्टी ही विचारल्या. मग आईने त्याना थोडा चहा आणून दिला. "बाई, तुम्ही मला भिमरावासाठी मुलगी शोधायला सांगितलं होतं ना." चहा पीत असता म्हणाले.

"हो दिसली का?"

"मला वाटतं भिमरावाला शंकराची मुलगी......"

"कुणाची मुलगी?"

"आपल्या शंकराची."

"असं बरं ! उद्या माझ्या साठी एक काम करा. तुम्ही मला स्टेशनावर भेटायला या की." मग थोडे विचार करून ती म्हणाली. "हो पण ही बातमी भिमरावाला न कळावी तर बरं. समजलात ना."

"बरं, पहिल्या गाडीने येणार की दुसऱ्याने?" असे बोलून ते काळजीत पडले. त्याना कळेना, का म्हणून मुलाला या बद्दल कळावे नको. त्याना माहीत होते की मला तीं मुलगी आवडली होती. मी तिला बघितलं आहे. 'होऊं सकते गंमत म्हणून बाई त्याला कळवूंदेत नसेल." त्यानी असा विचार मनात आणले होते की.

"पहिली गाडीने, काय झालं?" आईने त्यास विचारले.

"काही नाही. बरं बाई येतो. उद्या तुमची वाट पाहीन." असे म्हणून ते बाहेर पडले.

हे सर्व माझ्या गैरहाजरात झाले. माया मावशीकडे गेली होती. दुर्दैवाने मी थोड्या उशिरानेच आलो. आई बसली होती तिला काही न म्हणता मी सहाजीकच मधल्या घरात शिरलो की. "भिमराव मामानी तुला तावडतोब बोलावले आहे." तिने हाक मारून सांगितले.

"का? काय झालं?"

"माहीत नाही. महादू आला होता. तोच सांगून गेला मला वाटतं त्याना काही जरूरी

कामं आहेत, म्हणून तुला दोन तीन दिवसा साठी बोलावले आहे."

"तसे तर मी तिकडेच जायला निघणार आहे."

"बरं, जा. पण जरा जपून जा." आई म्हणाली.

मी निघून मेलरोंजला गेलो. मला पाहून सगळ्याना आनंद झाला. विषेश म्हणजे मामी तर खूप खूष झाली होती. कारण तिने आपल्या मनात असे योजले होते की आपले लग्न होईल तर आपल्या पार्वतीशीच. तसे तर पार्वती सुंदर होती. घरचे काम ती मोठ्या हिकमतीने करीत होती. पण होती थोडी चपळ मनाची. अंगाने थोडी सरपातळ दिसायची तरी ती सशक्त होती.

मामा कडक स्वभावाचे होतेच पण भाच्याला पाहताच त्याच्या चेहऱ्यावरचे कडकपण पालटून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळची गाडी घेऊन ती तामारेंला पोहोचली होती. गाडी साढे नवाच्या सुमारास थांबली, माणसे उतरू लागली. शेफदेगार्द दाराजवळ उभा राहून उतारूंची तिकिटे जमवीत होता. पलिकडे दोन तीन हमाल हमाली करीत होते. एकाच्या हातात ठेला गाडी होती. लक्ष्मण एका कोपऱ्यावर उभे राहून आईची वाट पाहत होते. आई साहेबपुढे आल्या. आपल्या उजव्या हातातील टोपली डाव्या हातात घेऊन एका हाताने चाळीशी सावरीत पुढे बघत येत होत्या. त्यांना पाहून ते पुढे झाले.

"तुम्ही आलात." आई म्हणाली.

मग लक्ष्मणानी त्याना नमस्कार केला.

"नमस्कार. कसे पायीच जायचं ना?" आईने विचारले.

"गाडी आणलेय."

"कशाला ही हरकत केली बरं."

"कसली हरकत, बाप्या माणूस असता तर दुसरी गोष्ट, पण तुम्हाला पायी जाणे किती अवघड एकतर तुम्हाला म्हातारा पण आलंय आणि दुसरी गोष्ट म्हणजे दुथडी दाटलेय." असे म्हणत ते पुढे झाले. "म्हातारपण आले तर काय यात झालं तरी काय? मुंबादेवीचा आशिर्वाद घेऊन आले आहे. यात्रेला माणसे घोडागाडी घेऊन जातात का?"

"पण बाई तुम्ही यात्रेला थोडेच निघालात? तुम्ही . . . ."

"दादा. घरातून याच विचाराने मी बाहेर पडले आणि आजची सहल. ही आपली यात्राच आहे."

"गणपत. चलायचं ना?" गाडी जवळ येऊन गाडीवानाला म्हणाले. सगळी बसून गेली.

या पूर्वी मला कुठल्याहिकळपनेची माहिती नव्हती. मी तर मामाकडे मजेत दिवस चालले होते. खाणापाणाची काळजी पार्वती शिवाई इतर कोणी करीत नसे. दोन तीन दिवसा नंतर मी

घरी परत आलो. आम्हांला पाहून आईच्या मनातील आनंदाचा पाराच फुटला होता. तिच्या ममतेच्या ओटीत सर्व भुलून गेला होता.

शुक्रवारची पवित्र संध्या होती. पूजा संपल्यावर जेवण करून आई आमच्या बरोबर बसली होती. गप्पसप्प करताना तिने लग्नासंबंधी काही तरी सांगण्याची संधी साधली.

"मी अशी कधी कधी विचार करते. तू दिवसभर कामावर असतोस आणि मी एकटी असून या घरात भूता सारखी इकडं तिकडं रेगाळत बसते." आई म्हणाली.

"एकटी कशाला. माया घरी नसते का?"

"माया, माया केवढे दिवस इथं राहील. उद्या ती नवऱ्या बरोबर आपल्या घरी जाईल. तेव्हां एकटीच पडीन ना. म्हणून विचार करते.—शंकराची मुलगी पाहून आले आहे. आणि साक्षिड्याची तारीख पण लावून आली आहे."

"साक्षिड्याची तारीख लावून आलीस आणि माहित नाही. मी म्हणतो आखीर लग्नाची कसली घाई लागली आहे.कुठं पळून जात आहे मी जे लग्नाची इतकी घाई लागली आहे.—मला विचारायचं होतं अगोदर." माझे असे बोलणे ऐकून तिला चीढ आली. "मला वाटतं आता कुठल्याहि कामासाठी तुझीच परवाणगी घेतली पाहिजे. मी विसरले होते की तू आता झाला आहेस ते. बघ जे जसे वाटेल ते तसे कर, आता तर मी म्हातारी आहे ना मी तुझी कोण लागते आता?"

तुला झालंय तरी काय अं, मी तसं म्हणत नाही. पण मी एका मुलीला वचन दिले आहे."

"तूं वचन दिलेस आणि माझे वचन ते वचन नव्हे."

आमचे बोलणे ऐकून माया येरझारा घालत मला म्हणाली.

"दादा, आई ठीक म्हणते."

"ठीक म्हणते, काय ठीक म्हणते, तुला काय माहित." मी मायाशी म्हणालो.

"बघ. जर तुला ते आवडलं नाही तर मी तुझे मन दुःखवणार नाही बेटा. पण हे लक्षात ठेव मी उद्या पासून हे सगळं सोडून आपल्या भावाकडे जाईन. हे घर दार तूं आपलं सांभाळ. मी तुझ्या मनातला काटा काढून टाकते." आई खिन्नतेने म्हणाली.

"तू भावाकडे जाशील ,का? कोण म्हणतो तुला भावाकडे जायला?" मी तिला विचारलो.

"तू आहेस तरी कोण मला हे सगळं विचारायला.—हेच समजीन खाली एक नवरा होता.—आणि आता त्याची सावली उरली नाही तर जगात मला कोण आहे, कोणच नाही." असे म्हणून ती मधल्या घरात गेली. पुढे भिंतीवर बाबाचा एक मोठा फोटो टांगलेला होता. त्याच्या समोर उभी राहून ती गहिवरली होती. "बघता ना आता तुमच्या लाडका मोठा झाला

आहे. तो माझी बात ऐकणार नाही आता. आज जर तुम्ही असता तर त्याने तुम्हाला तसं कधी म्हटलं नसतं." दारा जवळून मी तिचे हे बोलणे ऐकून आपल्या हटीवरून सरकलो.

"आई, मी तुझ्या मनाला दुखवलं ना, मला क्षमा कर ग. बघ मी तुला तुझ्या कामात अडवणार नाही." मनावर दगड ठेऊन आईला म्हणालो.

"काय म्हणतोस, तूं अडवणार नाहीस मला."

"आई, जे तुझ्या मनात येईल ते कर, मला विसर पडली होती." मी पुढे होत म्हणाला.

"तुला पटलं ना. हे मला माहीत होते.?"

"काय?"

"आताच म्हटलास ना, मला अडवणार नाहीस म्हणून विचारते. पटलं ना तुला."

"पटण्याची किंवा ना पटण्याची वेळ राहिली कुठे."

"का? काय झालं.?"

"काहीं नाही."

"तर मग काय म्हणतेस?– गणपत बाबू कुठे गेले ग." मायाला असे विचारून आई सैपाकघरात गेली.

"माहित नाही." मायाने नकारार्थी उत्तर दिले.

मग मी पडवीच्या एका खुर्चीवर बसून विचार मग्नात बुडाला होता. मला काही सुचेना की या पुढे मी सरितेला काय जाब देणार ते. मग पिंजऱ्यातल्या कोंडलेल्या राघू सारखा येरझारा घालीत होता. मूठ आवळून मी पुनः बसलो. "भला आता मी काय करूं' तिला कसे समजाऊ की ही माझी चूक नाही.–हं ! पुढे पाहूया काय होणार ते." असे उदगार काढल्यावर आई तिकडून आली.

"भिमराव." आईने हाक मारली.

"हो."

"बघ बेटा, जर तुला ते मान्य नसेल तर सांग आपण काही दुसरी मुलगी जाऊन पाहूं."

"आई ! बघ मी तुला काही म्हणणार नाही, जे तुझ्या मनात आले ते तू खूशाल कर. मला वाटतं या संबंधी जे वडील माणसं म्हणतात ते जे निश्चय करतात ते ठीकच करतात."

"उद्या, जोश्याना बोलावून मुहूर्त ठरवूं." असे म्हणून ती झोपायला गेली. मी तर एका वेड्या सारखा झालो. हळूच दार उघडून बाहेर पडलो. कोणत्या मार्गाने कुठपर्यंत गेला असावा हे माझ्या लक्षात आले नव्हते. शेवटी एका पुरुषाने मला हाक मारली. त्याने किती हाका मारल्या ते ही मला कळले नव्हते. त्याची हाक मला जरा दुरून ऐकून आली तरी मी

त्याच्याकडे पाहिलो नाही. माझ्या वेडसर अवस्थेत त्याला तर आणखी काळजी वाटली होती. त्याने मला हालविले की मी जरा चाचपलो. भानावर आल्यास, तंबाखू जालायला त्याने माझ्याशी आग मागितली. रात्रीची ती चांदी सारखी लखलखीत चांदणी मला फिकी पडली. तो तर काळ्या भूता सारखा दिसत होता.

सकाळ होताच माझ्या डोळ्यांच्या पापण्या एकीकडे सरल्यावर मी स्वतःला स्वतःच्या बिछाण्यावर पाहिलो. मी थोडासा बुचकळ्यात पडला होता. मी कामाचे गेला गेला नव्हता. ती जोश्याकडे गेली. जोशी बोवांनी नवरदेवाचे व होणाऱ्या नवरीचं नाव नावराश जमवून लग्नाची मुहूर्त दाखवली. जेष्ट महिन्यात लग्नाची तारीख पक्की झाली.

# १२

असेच बुध्दवारच्या दुपारीला कडक ऊन पडले होते. मी सरितेला अंतिम भेट द्यायला गेलो. रस्त्यात जात असताना, त्या डोंगराळ भागात ती लावण्यवती आपल्या मैत्रिणी बरोबर जात असताना दिसली. आपोआप माझ्या मुग्ध कंठातून तिचे नाव बाहेर आले. हाक मारीत मी तिच्या मागे धावत सुटलो. तिला स्पष्ट ऐकूं आले नाही की काय म्हणून ती चालतीच राहिली होती.

"सरिता . . .ओ . . .सरिते थांब की." असे पुनः पुन्ह मोठ्याने हाका मारल्या. ते ऐकताच बिचारी थबकून मागे वळली. त्यांच्यापैकी दोघी तिघी देखील मागे वळल्या होत्या.

"चल ग ! काय बघतेस?" एकीने सांगितले.

"चल ना, चल मी येते." तिने तिला म्हटले.

मी थोडे बहूत घाईघाईने दौडत तिच्या जवळ गेलो. विषेश करून सरितेला माझी भेट काढायचीच होती म्हणून ती थांबली होती. तिने आपली मोळी खाली आपटली आणि माझ्या समोर उभी राहून ती मला खूप बिळगूं लागली अचानक तिचे ते विक्राळ रूप पाहून क्षणार्धासाठी मी तर मुर्तिमंत झालो.

"बाप रे बाप, खाशील वाटते माणसाला." मी म्हणालो.

"हो, तसंच समजा.'– असे म्हणून तिने मला एकदम कवटाळून धरले जणू त्या प्रेमाचे काय म्हणावे. माणसे म्हणतात ना प्रीत आंधळी असते पण मी म्हणतो नाही. ती तर बासरीचा सुर आहे. जो कोणी त्या मधूर सूराच्या मोहनीत पडतो. जणू तो स्वतःला विसरतो. साऱ्या जगाला विसरून जातो.

"सरिता, मला तुझ्याशी काही विचारायचे आहे." माझे हे बोलणे ऐकताच ती म्हणाली. "तुमच्या विचारण्या पूर्वी मी तुमचे उत्तर देईन तर बरं नाही का? बघा, आज पर्यंत आपण दोघे एक दुसऱ्याशी मिळत होतो. पण आज मला असं वाटतं की हे रान मला खायला बसलय."

सुरवातीला जेव्हां बोलू लागली तर मला आश्चर्य वाटले ;हेच की हिला कसे कळले की आईने माझे लग्न दुसऱ्या संगे लावणार ते पण नाही. माझी कल्पना पलिकडे गेली होती. वास्तविक तिला ते माहित नव्हते.

"मी विचारतो ते तरी ऐक?"

"मी काहीच ऐकणार नाही."

"का?"

"मला अगदी कांहींच वाटत नाही. काय करूं न काय नाही. हे रान मला गिळायला बसले आहे."

"असं !'

"बस करा आपली मस्करी. तुम्हाला तर घडोघडी गंमत वाटते. मी तुम्हाला अगोदरच सांगितले होते, वडिलांना भेटायला, पण तुम्ही . . ."

"तर काय झालं. उद्या जाऊन भेटतो." मी आपल्या मनातील बात लपवून म्हणालो.

"आता त्याची गरज वाटत नाही."

"काय म्हणतेस सरिता? हे सगळं काय होत आहे. गरज च नाही. हे केव्हां पासून सुरू झाले?"

"बघा, देवाची ही एक मरजी होती आपल्याला—आणि यात न माझा दोष आहे न तुमचा ही दोष आहे."

"पण सरिता विसरलीस कांय. मला वचन दिले होतेस ना. त्या रोजी तूंच म्हणत होतीस, अहो मला सोडून जाऊं नका. माझ्या जवळ राहा. आणि आज काय झालं तरी तुला."

"बाबानी माझे लग्न एका दुसऱ्याशी लावणार आहे."

"तूं काहीच म्हटली नाहीस का."

"आम्ही पोरींची जात—आणि मोठ्या माणसा पुढे आपले काय चालणार?" असे म्हणून दोन पावले मागे सरून ती जात होती. पण तिचा धरलेला हात सोडला नव्हता.

"सोडा हो, सोडा. माझा हात सोडा, माणस बघतील तर काय बोलतील."

"नाही सरिता, सोडणार नाही."

"मला जाऊन द्या. मी तुमच्या पाया पडते."

कांहीं न म्हणता मी तिचा हात सोडला. "मी बाबांची लाडकी मुलगी, मी जर त्याना इकडे तिकडे काहीं तरी सांगितले तर समजा ते मला काय म्हणार नाही. पण तुम्हाला माहीत आहे काय होणार? नाही, घरातील लोक मला कुलक्षणी म्हणतील आणि गावातील लोक हेच म्हणतील की सरिता कसबीण निघाली, या बारगळीने आपल्या बापाची मान खाली केली.

काय जेव्हां माणसे मला असे म्हणतील तर तुम्हाला बरं वाटणार का?''

''हो सरिता, आई बाप हेच आपले देव होत आणि त्यांना फसवून व त्यांची मने दुखवून आपल्याला काय मिळणार. आशिर्वाद देण्या ऐवजी शाप देतील. जगात दोन दिवसासाठी आला आहे. आणि मला कोणाचाहि शाप नको हवा. सरिता माझ्या साठी लोक तुला शिवी देतील. नको, सरिता नको.'' असे म्हणून, काही क्षणाचा विचार न करता मी माघारी वळून झपाट्याने वाहणाऱ्या वाऱ्या सारखा निघालो. तिने मला किती वेळा तरी हाक मारली पण आपल्या हट्टी स्वभावामुळे व आपल्या स्वतःच्या सोईसाठी हाच एक मार्ग सुचला होता म्हणून मी मागे मान मुरडली च नाही.

या गोष्टीने तिला जे दुःख सोशावे लागले असेल जणू तिला नरकाचा भयंकर ताप च लागला असावा. तिच्या प्रेमाच्या स्मृतीने तर माझा जीव चाटला होता. त्या वियोगाने तर आम्ही दोघे जण जीवीत असून मृत होतो.

घरी आल्यावर चिंतेने मी थोडा व्यस्त होता. अचानक माझ्या मागून कोणी येऊन माझे डोळे मिटले. रागाने ते हात काढीत म्हणालो. ''ही कुठली कुत्री मधीच आली आहे.''

''ऐकतेस ना आतो, भिमरावाने मला कुत्री म्हटले.'' पार्वती म्हणाली.

''मला काय माहित जे तू आहेस.''

''जा, मी तुझ्याशी बोलणार नाही. मला माहित असतं की मला कुत्री म्हणशील तर मी कधी आलेच नसते. उद्या घरी जाईन तर कधी येणार नाही तुमच्या कडे.''

''माफ कर बाई. आता तुला तसं कधी म्हणार नाही. एक तर मी काळजीत होता आणि त्यात तू आलीस. बरं राहून दे ते तिकडे. बोल घरात सगळी बेस हायेत ना?''

''हो.''

''तर तू केव्हां आलीस.''

''दुपारी आले.''

तिकडून आई आली. ती माझ्याशी बोलत होती की पार्वती तिथून आत गेली. आई माझ्याशी कामासंबंधी काहीं तरी विचारत होतीच की पार्वतीने तिकडून माझ्यासाठी थोडा चहा आणला. ''खरं म्हणजे तुला सून हवी तर पार्वती सारखी.'' माझे हे बोलणे ऐकून ती बिचारी थोडी लाजली.

''बघतेस ना आतो कशी म्हणतो.''

''मला काय म्हणायचं तुमचा खेळ तुम्हालाच शोभतो.'' असे म्हणून आई पाठ फिरवून गेली.

"आतो समोर अशी बोलायला तुला जरा पण लाज वाटली नाही."

"अग मी काय खोटं सांगितलं, खरं म्हणजे आईला एक सून हवी–तसे तर घरची सारी कामं करतेस–खरं की नाय." माझे हे मिसकील बोली ऐकून तिने तर खरंच समजले.

"हो तिकडे."

"काय हो तिकडे ! मी खरं सांगतो म्हणजे तुला खोटं वाटलं."

"नाही भिमा. तुला काय माहित माझ्या मनात काय आहे ते. आई म्हणत होती माझे लग्न होईल तर तुझ्याच संगे."

"माझ्या संगे–तर तू तशीच घरात कुजत राहशील."

"का?"

"बघ एक काम कर, जर मामीचा हाच विचार असेल तर बोल तिला लवकर आईशी येऊन बात करेल नाही तर . . ." माझे हे बोलणे ऐकून तिचे मन आनंदाने गिरक्या घेऊ लागले.

त्याच पासून पार्वती शिवाच्या प्राप्ती साठी तपाला लागली. पण भोळ्या पार्वतीला काय माहीत होते की शिवाच्या दर्शना साठी तिच्या जीवाचा तीन तेरा होईल. या पूर्वी मायेने आपले संवाद ऐकले होते की काय कोण जाणे. ती पडवीत आली.

"काय घडलंय असं, जे तू अशी खुषीत आहेस." माया म्हणाली.

"आज मी खरोखर मोठ्या आनंदात आहे माया. मी किती खूश आहे. कसे म्हणू मलाच वाटत नाय."

"ते तर दिसून च येत आहे. म्हणून मी म्हणत आहे. असे स्वप्न पाहत बसूं नकोस." मायेच्या या बोलण्यावर मी उठून आत गेलो.

"कसले स्वप्न?"

"तुला माहीत आहे का? आई म्हणत होती, पुढे दोन तीन महिन्याने दादाचे लगीन करून टाकेल."

"ते तर आणखी उत्तम, पण आतोने बाबाना सांगितले का."

"ते तर कधी सांगितले."

"मग मी कुठे होते?"

"हे सगळं मला ठाऊक नाही. पण गेल्याच आठवड्यात पोरीला बघून आली. – ती उद्या सगळी कडे साक्षिड्याचे आवतन द्यायला जाईल."

मायेचे हे शब्द ऐकताच तिच्या मनात काळजी पडली. ती विचार करूं लागली हे सगळे

झाले तरी कसे. जिथे चार पाच दिवस राहणार तिथं ती दोन दिवसाने परत गेली.

आईने मोठ्या भावनेने सर्व कुटुबाना व हित मित्रांना साक्षीड्याचे आमंत्रन दिले. साक्षीड्याची तयारी होऊं लागली. कपड्यांची लादी तिकडे दागिन्यांचे निवड केल्याची मोठी गडबड चालली होती. या सर्व खटखटीने मी तर कंटाळून गेला होता.

जोश्यानी ठरवलेल्या मुहूर्ताप्रमाणे काही दिवसानंतर साक्षीड्याचा दिवस आला. तिथे जाण्यासाठी आईने माझ्याशी विनवनी घातली पण मी तिला नकारले. "बघ आई तिकडे चलायला म्हणत आहे. पण तुम्हाला समाजाच्या रीति रिवाजा मुळे मी मी तिकडे जाऊं सकणार नाही. आईला कशी तरी समजुती घाला नाही तर तिला गैरसमज होईल." मी मेहुन्याना असे सांगितलो. "बरं, पण तिथं जायला काय झालं? आपण आपले काम करूं आणि तूं गावात हवा खात बस. साक्षीडा झाल्यावर आपण बरोबर येऊं." ते म्हणाले.

"छे ! हे माझ्याने होणार नाही. तुम्ही जा आणि घरात कोणी तरी राहिलं पाहिजे ना."

घरातील सर्व कुटुंब व इतर शेजारपाजारचे लोक ही गेले होते. मात्र मी एकटाच राहिला होता. आईला आपली होणारी सून फार आवडली होती, म्हणून तिने दागदागिने कपडे आदि देण्यात काही काटकसर केली नव्हती. स्वर्गात असणाऱ्याची मान नेहमी उंचबली असावी या हेतुने तिने त्याच्यात देखील कमीपणा दाखवले नाही.

साक्षीडा लावताना सरितेच्या इंदूकळेवर काळसर ढग ओढावले. माझ्या आठवणीने तिच्या डोळ्यात मोती बडबडले पण नजरे समोर वडिलांची पगडी दिसल्याने डोळ्यातील पाणी सुकले.

मी घरी आपल्या आराम खुर्चीवर बसून, सरितेशी माझा साक्षीडा होण्याच्या स्पनात रंगला होता. पंच मंडळीतील आलेल्या लोकापैकी होणाऱ्या नवरदेवाला शोधीत होते.

"होणारा नवरदेव कुठं लपलाय हो ! तो कुठं ही दिसत नाय." असे शब्द पुष्कळाच्या तोंडी आले होते. स्त्रियांत देखील तीच गडबड चालली होती. काय नाच गाणी चालली होती.

सरितेशी माझे लग्न झाले. आपले दिवस आनंदात रमूं लागले. चार पाच मुले ही झाली. ती मुले कोवळ्या नाजूक कळ्या प्रमाणे खेळू लागली. ती आकाशातील ताऱ्या सारखे हासत होती. ती मोठी झाली तर थोरलीला भारतात शिकायला पाठवूं. मुलाला इंग्लेंडला धारूं अशी आकांक्षा आपल्या मनात बालगत होतो. आणि आम्ही दोघे नवरा बायको तोंडाला तोंड लावून चंद्र लोकात गमन करीत होतो. आकाशरुपी बागेत एका मोठ्या महालात मी राज सिंहासनावर बसलो होतो. माझ्या दोन्ही बाजूला दोन बाया पंखा

चालवीत होते. तिकडून सरितेने चांदीच्या ताटीत चांदीची पणती घेऊन आली. आपल्या सोळा सृंगाराने आपल्या महाराज आधीराज श्री भिमरावाची आरती ओवाळण्यास उभी होती. तिने ओवाळणी केली मग तिने माझा हात धरला आणि गाणे म्हणत आम्ही दोघे महाला बाहेर पडलो. जाता जाता आम्ही एका नदी जवळ पोहोचलो. ज्यात चंद्रच्या कोरी सारख्या निर्मळ जळधारा वाहत होत्या. आम्ही त्याच्या काठावर क्रिडा करीत होतो. सरितेने त्या पाण्यात हात बुचकळून माझ्या तोंडावर फेकून दिले. इतक्यात सरासर माझा हात उठला आणि तिला एक उलटी चापट पोळी दिली.

काय झाले, दुरून काही वस्तु पडल्याचा आवाज ऐकूं आला. मी गडबडून उठलो. एवढ्यात काय म्हणजे अस्तिवात माझ्या हाताने मेजावरची फुलदाणी खाली पडली होती आणि त्यातील पाण्याचे शिंतोडे माझ्या तोंडावर पडले होते. हात दुखत होता म्हणून हात दाबत उठला. घड्यालाचे काटे वाजत होती. पाहिलो तर अर्धी रात पालटली होती. मग मी झोपी गेलो.

# १३

साक्षीडा मोठ्या आनंदाने झाला. माझ्या आयुष्यात बदल झाले. मी रोजच्या प्रमाणे कामाला जाऊं लागलो. पण ओफिसात असताना मी हेरावल्या सारखा दिसायचा की काय म्हणून आपल्या कारकुनाने एकदा विचारले. "काय हो भिमराव! आज काल तुम्ही मोठ्या विचारात पडलात वाटतं."

"नाही, नाही, तसं काही नाही." मी चकीत होऊन उत्तर दिले.

"गावात फिरायला जात नाही का आता."

"गावात आहे तरी काय, तुम्हाला तर माहीत आहेच या कामा मागे वेळ अगदी मिळत नाही. आणि....."

"पण आदि सारखं इकडं जा तिकडं जा; म्हणजे जीवाला शान्ति मिळण्या साठी आपल्याला निसर्गातील हवा खायला हरकत नाही."

"आपले वाढवडील कशाला आले होते? माहीत आहे का आपल्याला?"

"ती गोष्ट वायली आणि आपली गोष्ट वायली."

"तुम्हाला काय माहीत हो..." असे म्हणून मी पाठ फिरवून घरी गेलो. असे त्यानी किती वेळा सांगितले असेल पण माझ्या मना पासून ती पूर्वीची भावना कधीच निसाटली होती आपल्या कामा शिवाय दुसरी कुठलीच गोष्ट लक्षात घेत नसे. हळुहळु माझ्या मनात वडिला सारखे देखील शिष्टबद्ध आचार उत्पन्न झाले. थोड्या दिवसा साठी मी वडिला सारखे वागूं लागलो. माझ्या मनात कोणाही प्रति थोडीशी दया आली नव्हती.

आईने लग्नाची सर्व तयारी केली होती. एक आठवड्या पासून बाया येऊन गाणंबिणं करूं लागले. तीन चार दिवसानी माणसे मांडव बांधीत होते. मांडव तयार झाल्यावर माणसाना जेवणानी तृप्त केले. दुसऱ्या रोजी माखवाला किती माणसे आली होती. त्या वेळी आजच्या सारख्या मोटारी नव्हत्या. वऱ्हाड आगगाडीने निघाले. वऱ्हाड वाजत गाजत तामारें आली होती. धाकट्या राजूने व भिवाने सूर सनई घेतली होती. ढोलक्या सजनने तर खूप ताळ दिला होता. तामारेंला आल्यावर सहा वाजले होते. सगळी कडे अंधार पडला होता. वऱ्हाड बैलगाडीने निघाले. गाड्यांना उत्तम प्रकारानी सजविले होते. पुढच्या खुंटीला प्रत्येकाने एकैक लाटर्न लावला होता.

साऱ्या गाडिवानी बैलांना चाबकाचे आवाज दिले व ते बैलांना हाकूं लागले. घटरघट घटरघट करीत गाड्या लाकुपेच्या दिशेला चालल्या होत्या. या निर्जण बनातील वाट या सर्व नादानी बरी काय सुहावनी होती. सुरवातीला समोरच्या डोंगरावर जणू काय नजारा झळकत होता. पण कधी कधी वाट इतकी भयानक वाटत होती की अंगावर काटे उभे होत असे.

रात्री नवाच्या सुमारास तो सारा भाग ओलांडून स्वारी ओमोनला पोहोचली होती. अर्धा तासा साठी आपण येथेच मुक्का केला.

मग मला एका पांढऱ्या बैलावर बसवले. बाकीचे लोक पायीच चढले. शेजारच्या एका अंगणात माझ्या साठी जानवसा केला. माया माझ्या बरोबर बसली होती. तेथे खूप प्रकाश पडण्यासाठी चौफेरून पिठानी तयार केलेल्या मशाळी लावल्या होत्या. आणि तिथून मांडव दिसत नव्हता. फक्त वाजंत्र्या, सूर, सनई व ढोळकीचा मधूर आवाज ऐकूं येत होता. आमच्या बरोबर गौरी आजी गाणी म्हणत होती. थोड्या वेळासाठी मला तर झोप कडकडून आली. माणसे तर नाचत गात आनंद लुटत होती. खानपान अगोदर झाले होते.

मध्य रात्रीच्या पहिल्या प्रहरात एकाच्या सुमारास एसू जोश्यानी आम्हाला बोलावले. मेहुऱ्याने आपल्याला खांद्यावर उचलून पलिकडच्या वाटेने मांडवा समोर आणले. कानचिमनी झाली मी आत गेलो. सारी माणसे चटई वर बसली होती, गादी वर पांढरी चादर अंथरली होती. मी तेथे बसलो इतक्यात काही लोकांच्या ओळखीचा आवाज ऐकूं आला तशी माझी नजर तिकडे वळली. पुढे शंकर, कारकून व इतर लोकांना पाहून माझ्या मनाला फार आनंद झाला. जोश्याने मुलीला बोलावले. अंतरपाट झाल्यावर विधिवत पूजा झाली. लग्न झाले तरी माझ्या मनात थोडी शंका राहिली होती. मला हेच कळेना की माझे लग्न इथे कसे होत आहे आणि या घरा समोर मी कोणा बरोबर लगीन करीत आहे. असे

विचार करीत असता माला व गौरी माझ्या दृष्टि पुढे प्रकट झाल्या. प्रथम मी थोडे चकीत झालो मग माझ्या मनात एक प्रकारचा उल्हास उपजला.

बहीण लगीन करीत आहे म्हणून माला व गौरी खूष होत्या पण त्यांच्या चेहऱ्यावर अजून एक प्रकाराने निराशाची सावली पडली होती. अचानक माझे अंतकरण जागले व मला म्हणाले. 'अरे वेड्या !ही तुझी च सरिता आहे.' पण माझे मन मानेना. ते माझ्याशी अनेकदा रगडा करी. 'का भितोस ही च तुझी सरिता आहे. तुला कुठलीच संका बालगता कामा नये. देवाने तुम्हा दोघांची प्रार्थना ऐकली.' अशी माझी प्रतिभा पुनः बोलली, म्हणून एक प्रकाराने मला समाधान वाटला.

या घरान्यातील वडील माणसाना हे नक्की माहीत होते की त्यानी आपली मुलगी भिमरावालाच दिली आहे. परंतु हे मुलींना माहीत नव्हते. आणि विशेष करून माझ्या आईला ही गोष्ट माहीत नव्हते की मी ह्याच मुलीला आवडतो की काय. तिकडे काहीं लोक गळबळ करीत होते तर इकडे काही लोकांचे गप्पसप्प चालले होते. थोड्या वेळाने लग्नाची विधी संपली.

लग्न झाल्यावर इतर लोकाना भेटलो. या क्षणी मामानी आवाज दिला. ''मंडळी हो ! आता चला. चला. लवकर चला.'' मंडळी तयार झाली. आपण सारे नवरीला घेऊन तिथून रात्रीच निघालो. ओमोनला येऊन दुसऱ्या वाहनात बसलो. त्या काळोखात परतत असता ना ज्या मार्गाने येत होतो, त्याच्या कडेला ठिकठिकाणी माणसांची बसती होती. आपल्या बरोबर वाजंत्र्या सूर सनई गाजत होत्या. व त्या मधुर संगितामुळे सारे लोक आपल्या निद्रेपासून जागे झाले. मुलेबाळे धडपडत उठून रस्त्याच्या कडेला आली. मला तर हुडहुडी लागली होती. त्या बापड्या मुलांना देखील थंडी झोंबत होती. कोणी कंबळ ओढली होती तर कुणी चादर घेतली होती. रस्त्याच्या दुथडीला मुलांनी व थोर लोकांनी गर्दी लावली होती. असे थाटाचे वऱ्हाड रोज रोज पाहायला थोडेच मिळते का? नाही. म्हणून जो आला तो रमला आणि जो चुकला तो हरला. मोठ्या जोमाने नाचत, वाजत गाजत येत असता कृष्णा नदी ओलांडून आम्ही लाकुपेत डोकावलो की झुंजुमुंजु झाले होते. सकाळचा गारवा सुटला होता. त्या काळ्या वनात पाखरांचे मंजूळ कुंजन श्रवणासाठी किती गोड होते. आपल्याकडील माशालीचा प्रकाश पाहून, जसे रामाच्या स्वागतासाठी सुग्रीवाची सेना उफाळली होती, त्याच प्रमाणे येमेनच्या गर्द विपिनात माकडे काय क्रिडा करी, काय ओरडाबागड करी. त्याचे तर कौतुक करण्या सारखे आहे. आम्ही ते सर्व सुनीत संगीत ऐकत ऐकत लाकुपेची उतरणी उतरुन पाठीवर आलो. पुढे एके ठिकाणी किरवलांची बसती लागली.

इथपर्यंत आल्यावर कोंबडा कडकडून आरवला. कोंबड्या कटकट करूं लागल्या. ही सगळी सृष्टी अवलोकीत आम्ही तामारेंच्या शरहद्दीवर आलो होतो. पुनः कोंबड्याचे आरवणे ऐकूं आले. वाट वळणे घेत तामारेंच्या नदीवर आली होती. समोरून सूर्यनारायण पूर्वेहून रांपार व त्रोआ मामेल पर्वताच्या मागून डोकावला. त्याची कोवळी किरणे नदीच्या चांदी सारख्या पाण्यावर पसरत आली. त्या मुळे सरितेने सोडलेल्या अमृताच्या धारा केशरानी माखळ्या. जिकडे तिकडे पानोपानी सोन्याचे टपोरे टपटपत होते. निळ्या आभाळात तांबडे डाग उडाले होते आणि अधून मधून कापसा सारख्या चादरीला जिथे तिथे गुलाबी रंग चढला होता. लोकानी मुख मार्जन केले. त्यांच्या बरोबर गंगो आजीने आपले मुखमार्जन उरकून 'घनश्याम सुंदरा' ही भुपाळी भाकली. तिच्या या भुपाळीत किती गाढ अर्थ होते. तिच्या कंठात किती माधुर्य होते. आज देखील मी त्या भुपाळीत बुडून गेलो होतो.

त्या नंतर आम्ही सकाळची ती पहिली गाडी घेऊन घरी आलो. समाजाच्या रूढी प्रमाणे मायेने दार धरले होते. खिशातून एक सवाई काढून तिला दिली तरी ती आम्हाला आत जाऊं देई ना. ''पाच रूपये देशील तरच आत जाऊं देईन.'' ती म्हणाली. तिला आणखी काही द्यायला पडले तदनंतर आम्हा दोघाना एका खोलीत, जिथे देव पुजले होते तिथे च पाट दिले. मग घरभरणी झाली. तिचे नाव ठेवले गेले. लक्ष्मीला पाहायला कित्येकांचे येणे जाणे झाले.

आम्ही बसलो होतो की आईने काहीं कामाबद्दल मला बोलावले. मी दोघ्या करवळ्यांना लक्ष्मी बरोबर सोडून तिकडे गेला. तिकडून परत येत असता गंमत म्हणून मी दुसऱ्या खोलीतून दोनदा ''सरिता, सरिता'' हाक मारून तिच्या खोळीत हुळकून पाहिलो. ते ऐकताच तिने मान वळवून पाहिले तर तिला कोणीच दिसले नाही. मी मागे सरलो. आपली मुंडवळी एकीकडे सारून गरगर शोधूं लागली. मी स्वतःला सांभालून खऱ्या वेशात येऊन आत शिरलो. माझ्या तोंडावर मुंडवळी होती म्हणून तिने मला ओळखले नव्हते अजून. तिला काही तरी बोलायला माझे तोंड उघडले होते की पलिकडून तिची करवली आली. आणि माझे उघडे तोंड आपोआप बंद पडले.

तिने लक्ष्मीची मुंडवळी काढून जवळच्या एका खुर्चीवर ठेवून दोघीजणी परसात गेल्या. तो वर मी आपले वाशिंग काढून ठेवले व खिडकी जवळ जाऊन उभा राहिला. त्या खिडकीतून एक भव्य नजारा दिसल्या मी तो पाहत होता. म्हणजे काय एका आंब्याच्या फांदीवर एक चिमणा आपल्या चिमण्या राणीशी कशी प्रेमाचा वर्ताव करीत होता. कसा

गोड गोड बोलत होता. काय हासत होता. काय खेळत होता जणू त्याचे कोणत्या शब्दात वर्णन करावे ते मलाच माहीत नसावे.

थोड्या वेळाने त्या दोघीजणी आल्या. त्या आत शिरत होत्या ऐन वेळी मी फिरून त्यांच्याकडे पाहिले. मला पाहून लक्ष्मी चकीत झाली. तसे आपल्या करवलीच्या तोंडाकडे एक नजर बघून माझ्याकडे बघत धावत आली आणि माझ्या उराशी येऊन समेटली अन् चटचट माझ्या दोन्ही गालाचे चुंबन घेतले. आम्हाला बघून क्षणभर करवली बाईचे तोंड उघडे पडले. मग तिने मान एकीकडे मुरडून थोडी हसली. "छे ! छे ! शरम नाय याना" अशी म्हणत दुसऱ्या खोलीत गेली. इतक्यात सर्व बाया आपापले काम सोडून दारा जवळ पोहोचल्या. मग काय बोलावं त्या आम्हाला पाहून खदखदा हसूं लागल्या. त्या बद्दल मला तर लाजच वाटली.

त्या नंतर मामी ताटीत पान व धागा घेऊन आली. ते खाली ठेऊन तिने मला आपल्या मांडीवर बसवले आणि सखू मावशीने लक्ष्मीला आपल्या मांडीवर घेतले. मायाने धाग्याने बांधलेले पान मधोमध लोंबवले. आम्हा दोघांना सांगितले की आम्हाला हे लोंबते पान खाल्ले पाहिजे. पान तर इकडे तिकडे हालत होते. ते तोंडाने बरे धरायचे कसे. जेव्हां मी तोंड पुढे करायचे तर ते तिच्या कडे जाई आणि जेव्हा ती तोंड पुढे करायची तर ते माझ्याकडे यायचे अशी एक सारखी गडबड उडाली. शेवटी एक युक्ति सुचली. जशी तिने तोंड पुढे केले तसे मी ही तोंड पुढे करून अर्धेपान माझ्या तोंडात आले आणि अर्धे तिच्या तोंडात राहिले. मग मांडवात जाऊन पुनः आम्हाला दोन बाजूला एका अंतरावर उभे करून एकीने लक्ष्मीच्या हातात चेंडू दिला. ती मला चेंडू मला मारूं लागली. मी तिला मारूं लागला. कधी चेंडू एकीकडे जाई तर कधी लागे. असे खेळता खेळता दिवस खूप रंगला. लोकांना मजा वाटली.

दुसऱ्या दिवशी लवकरच सर्व तयारी करून पाचपरतावनासाठी गेलो. तिकडे गेल्यावर गौरी व मालती दिसल्या. सरितेला पाहून त्यांच्या मनात तर गुदगुल्या सुटल्या होत्या. मला पाहून क्वचित त्याना आश्चर्य वाटले. लक्ष्मीच्या कानात काही तरी कुजबुजत होत्या. इतरांच्या गप्पा गोष्टी चालू होत्या. अनेकांच्या घरी लग्न कार्य असल्यास जशी गडबड चालते या घरात देखील तशी चालली होती.

जेवणाची वेळ झाली होती. घरधान्यानी जेवण वाढण्यासाठी काही धारप्याना नेमले होते. आमच्या बरोबर आलेली माणसे एका बाजूने बसली होती. एक पुरूष आमच्याच कडे आला. तो तर तोंड बघून बघून माणसाना जेवायला उचलत होता. मग काही म्हातार

माणसांना उचलल्यावर मला सुद्धा आपल्या बरोबर नेले. आमचे जेवून झाले. मी इतरा बरोबर बसून गप्पा मारीत होता. पण आमच्या संगे आलेले काहीं मिराशी लोक अजून एका कोपऱ्यात बसले होते. शेवटी माझी नजर त्यांच्यावर गेली तर एका धारप्याने त्या बिचाऱ्या मिराशीना घराच्या ओशरीवर बसवले व एका पानावर जेवण वाढले. माझ्या पाया खालच्या राग डोक्यावर चढला. तिथे जाऊन मी एका धरप्याला विचारलो. "का रे बाबा याना घरात काना वाढलेस?"

"राहूं द्या भिमराव बाबू आम्ही मिराशी. आम्हाला...." त्याच्या पैकी एकाने म्हटले.

"अरे भले माणसा ! मिराशी असलास तर काय तूं माणूस नाहीस का? त्यांचा देव आणि तुमचा देव वेगळा आहे का?"

"तशी लोकांची समज आहे. आम्ही जिकडे जातो तिकडे हीच गत होते भिमराव बाबू."

त्यांच्या पैकी एका दुसऱ्याने बोलले.

"काय माझ्या घरी सुद्धा अशीच होते का?"

"काय तुमच्या सारखे लोक थोडेच आहे."

"थांबा खाऊं नका–लक्ष्मण मामा इकडे या तर" असे म्हणून लक्ष्मणाकडे वळलो.

"काय हो मामा !तुमच्या घरी आलेल्या पाहुण्याची सेवा सत्कार अशीच होते का?"

"पण हे मिराशी लोक हायेत आणि याना घरात कशी घेऊं, आमची जात मोठी हाय बाबू." लक्ष्मण म्हणाले.

"जशी मला घेतलात. आणि तुमची मोठी जात. मरो तुमची मोठी जात, असल्या जातिशी काय काम, ज्यात माणसा माणसाशी भेद भाव आहे. ती कुठली मोठी जात होय. नाव मोठं लक्ष्यान खोटं. ज्या जातीला चिनण्याच्या उसट्या दारूच्या पेल्याने चाटून ठेवलय." माझे हे बोलणे ऐकून आणखी चार पाच लोक आले.

"बघा ना आजचा प्यार आम्हाला येऊन शिकवतोय आता." एकाने असे म्हणाले.

"काय बोलूं दादा उलटी दुनियाची उलटी खुना." दुसऱ्याने असे बोलले.

"पोर असला तर काय, मला वाटतं तुमच्या म्हातारपणा बरोबर तुमची अक्कल जात आहे."

"पण यात आपलं काय दोष. दोषी तर आपला समाज." लक्ष्मण म्हणाले.

"दोषी आपला समाज नव्हे मामा. दोषी तर तुमच्या सारख्या अक्कल मारे आहेत. ज्यानी असला समाज बांधला आहे. बघा मामा याना घरात घेऊन चांगलंपण जेवण वाढलं

नाही तर मी आताच तुमच्या मुलीला जागच्या जागी सोडून जाईन.'' मी त्याना म्हणालो.

''हे काय आखरीत करतो पोरगा.'' तो तिकडे म्हणाला. ती तशी तिकडे म्हणाली. असे एक सारखे गोंधळ माजले.

''काय झाले? काय झालं ग?'' सरितेची आई तिकडून घाईघाईने विचारीत आली.

''काय झालं मुलीला सोडून जात आहे.'' एकीने सांगितले.

''मुलीला सोडून जात आहे. कोण ग?''

''तुमचाच जावई आणि कोण?'' दुसरी म्हणाली.

''कशाला?''

''त्या मिराशीना ओसरीवर जेवायला दिले म्हणून. आखरीत करतो बावा.'' तिसरी म्हणाली.

''तर घरात बसवून का नाय दिलंत? – लक्ष्मण दादा इकडे या.''

''येतो.'' जवळ येऊन. ''हा, काय बोलतेस.''

''त्याना आत घ्या ना बोलवून जेवण वाढा ना. आणि अशी काय हुजत करीत बसलाव हाय.''

''बरं तशीच करतो. – साम्या इकडं ये.''

''येतो.''

''बघ त्याना आत घे आणि काय असेल ते वाढ.'' असे म्हणून लक्ष्मण एकीकडे गेले.

''उठा, चला हो.'' साम्या म्हणाला.

ते बिचारे उठून एकमेका कडे बघून साम्याच्या मागोमाग गेले. पण छे !काय म्हणूं तिथल्या स्त्रियां व बाऱ्ये सर्व एका परीचे भूतच होते. मी म्हणतो ना तसल्या माणसाच्या पायाखाली कधी राहू नये. त्यानाच माहीत नाही की ते माणसंच आहेत की माणसांच्या रूपाने जनावरे आहेत. तो तसा म्हणे. ती तशी म्हणे म्हणजे काय गडबड चालली होती. खरं म्हणजे माणसा माणसात प्रेम नाही, आपुलकी नाही तर त्याचा अर्थ काय.

ते जेवायला बसले तर तिथे दुसरे हेलपाटे सुरू झाले. ती बाई तिकडे मोठ मोठे डोळे काढून बघी. ते बिचारे परक्या गावात आल्या मुळे मुके झाले होते. पाणी घ्यायला त्यानी आपल्या बरोबर स्वतःची भांडी आणली होती. त्यांच्या जेवणा नंतर सदोबानी ते घर एका बाई कडून सारवायला लावले. मी नेहमी देवाला विनवितो. हे देवा नारायणा इतराना असा दिवस दिसूं नये. त्या बिचाऱ्या बरोबर जे दुर्वर्ताव झाले. त्या बद्दल त्या लोका समोर माझी मान एकदा खालावली ते आज पर्यंत वर झाली नाही.

"ते तर एकदम फालतु होते मला वाटतं." मी त्या म्हाताऱ्याला बोललो.

"मला माहीत नाही ही जात कधी सुधरेल." भिमराव म्हणाला.

"सुधरेल, का ना सुधरेल. ही जात अवश्य सुधरेल."

"तुम्ही तसं म्हणता ठीक आहे. सुधरेल तर बरंच होय. पण मी विचारतो, तुम्हाला अजून काहीच माहीत नाही. तुम्ही आपल्या आयुष्यात काय पाहिलंत तरी? तुमच्या सारख्याने काय होणार?"

"काय म्हणता तुम्ही. आमच्या सारख्याने काय होणार."

"खरं म्हटल्यावर तुम्हाला राग आला ना."

"मला का राग येईल."

"पण मी खरं सांगतो. हे काम ऐखादे सत पुरूषच पार पाडूं सकेल दुसरा कोणी नाही."

"तो. वर वाट पाहतो."

ह्या प्रकारी आपले संवाद झाल्यावर पुनः त्यानी आपली कथा सुरू केली.

# १४

आमचे लग्न थाटाने झाले. सुखाचे दिवस आले. आईला आपल्या सुनाशी इतका लला लागला होता की तिने लक्ष्मीला आपल्या मुली सारखीच प्रेम दिले होते. कधी या नाते वाईका कडून बोलावणे येई तर कधी त्याच्या कडून असे नेहमी प्रवास करीत होतो. आज सुद्धा माझ्या कानात त्या आगगाड्यांची शीट ऐकूं येत आहे. ती माझ्या स्मरणात अजून नाचत आहे कशी हासत, गप्पागोष्टी मारीत चाललो होतो. आम्हाला बघून कित्येकांना चीड येत असे.

आपले संसार खूप मजेने जात होते. खाण्यापिण्यात कुठलेच ताळतंत्र नव्हते. भादवाचा चांद निघाला. गणपतीची पूजा करण्यास गावात कित्येक जणानी आपल्या घरी गणपती आणले होते. गावात आम्ही तीन चार जागी पूजा करायला गेलो होतो. पूर्वीची माणसे आठवड्याभर गौरीगणपतीला ठेवीत होते. या सणात लहान मुले किवा थोर जण आनंदाने भाग घेई. आई आपल्या सुनेला घेऊन कास्कावेलच्या देवळाला गेली होती. सुनेची ओटी भरत आली होती. म्हणून तिने देवाशी नवस केला होता. म्हणजे सुखा सणी आमचा गुजारा पार पडत होता.

बघता बघता आठ महिने निघाले. काही सामान विकत घेण्यास एकदा मी उपर गेला होता. संध्याकाळी जेव्हां मी घरी परत आलो. "सरिता.... सरिता...." न कळत मी तिला हाक मारली. पण ती गेली बेकार. आई तिकडून आली. "कुणाला हाक मारतोस?

लक्ष्मीला. ती माहेरी गेली."

"माहेरी गेली. कोण आलं होतं?"

"तुझी सासू आली होती."

असे विचार पूस केल्यावर पूरी गोष्ट कळली. त्या नंतर अधून मधून तिला जाऊन भेटून येत होता.

अचानक मी आजारी पडलो. सामान्य रोग समजून मी घरीच दवा पाणी घेत होता. नाइलाजाने आईने मला डॉक्टराकडे नेले. चिकित्सा करून आल्यावर औषध घेऊं लागले. तीन चार दिवस असे करता मला थोडी हुशारी आली. रात्री खराब खराब स्वप्न दिसू लागले. गुरूवारच्या पहिल्या प्रहरी चाराच्या सुमारास मला एक स्वप्न पडले. मी घरात बसला होता. कशास तरी विचार करीत होता. बाहेरून बासरीचा आवाज ऐकूं आला. तो ऐकताच मी अंगणात धावत गेला. पण कोणीच दिसले नाही. मी पुढे चाललो पण अवचित एका उंचीवरून एका खळग्यात पडलो. बचावासाठी ओरडत राहिलो पण कोणीच आले नाही. थोड्या घडीने कशी बशी तिथून वर आलो. वर पाहिला तर आकाशात एक पतंग उडत होता. अचानक त्याचा दोर तुटला. तो जाऊन सागरात पडला. मग मी घरात शिरला. मेजावर एक सफरचंद होते. ते घेउन खात होता. त्या वेळी कुणी तरी दार खडखडावले. मी पाहायला गेला तर दारा जवळ एक मोठा धिपाड धिळदार व कुरूप पुरूषाने आपल्या हातातील फासा माझ्या समोर लोंबविला. मी मागच्यामागे सरकत जात होता. एवढ्यात माझ्या मागून एक दुसरा तसाच पुरूष आला. आता तर मी त्याच्या तावडीत सापडलो. कुणी तरी येऊन माझा सुटका करावा या विचाराने असा जोराने किंकाळला की घरातील सारं लोक आपल्या झोपीतून जागे झाले. ते विचारूं लागले पण मला त्यांचे कुठले उत्तर देता आले. मी तर झोपला होता.

दिवस उजाडला पण त्याच्या तेजोमय किरणामागे किती उदासपण दिसत होता जशी दिव्याच्या ज्योतीत काजळी लपते आणि माणसांच्या मागे त्याची सावली असते. त्या दिवशी मला सर्व काही फिके वाटत होते. दुपारी मी परसात झाडाखाली बसला होता. पुढे सायकलीची घंटी वाजली. पाहिलो तर पोस्टमनाने तार आणली होती. त्याने माझे मन क्वचीत घाबरले. घाईघाईने मी पाकीट उघडून वाचूं लागला. पत्रातील मजकूर वाचता मी आनंदाने उडी मारूं लागलो. धावत आई बहिणीला चुंबून नाचूं लागला. दोघीना आश्चर्य वाटले.

"दादाना लोटरी लागली आहे वाटतं."

"हो तिकडं ग—बोल ना, काय झालं ते? असं काय नाचतोस रे." आईने विचारले.

"खरं म्हणजे लोटरीच मिळाली आहे पण दुसऱ्या नंबर चाली. आमच्या घरी एक नवी पाहुणी आली आहेग. नवी पाहुणी."

"नवी पाहुणी आणि आमच्या घरी."

"हो आई, नवी पाहुणी, तुझ्या सुनेला मुलगी झालेय."

"वहिनीला मुलगी झालेय." आनंदाने म्हणाली. "पण छे ! मुलगीने काय होणार ती तर परक्याची आहे. मुलगा झाला असता तर त्याने या घराण्याचे नाव ठेवले असते." मायेचे हे शब्द ऐकताच माझे कान भांबावले.

"हो ! तू ठीक म्हणतेस ग, पण तुला माहीत आहे का कोण आहे ती. या घराची लक्ष्मी आहे."

"हो लक्ष्मी आहे पण दुसऱ्याची."

"मी म्हणतो या घराची कुळस्वामीनी आहे." मी तिला असे सांगितले.

"बरं बरं बस करा आपले भांडण." आई मध्येच बोलली.

आम्ही सगळे जाणार होतो. पहिल्या पहिल्यासुनेला पोर झालं होतं ना त्या करिता मसाले घेणे, कपडे घेणे या सर्व गोष्टी धांदळ झाली होती. आणि आगगाडीने जाण्यास जरा उशीर होणार होता म्हणून आईने मला ताबडतोब पाठवले.

मी मोटारसायकल घेऊन गेला. नवजात मुलीला पाहण्यासाठी माझे मन एकदम आतुरले होते. संध्या दाटून आली होती. मोटारसायकल ओमोनला आपल्या चपराशीकडे सोडून चालत गेला. तरी अजून सहा वाजले नव्हते. गावात डोकावताच एखाद्याने माझ्या येण्याची खबर त्याना जाऊन सांगितली. धाकटा मेहुणा तिकडून धावत आला. म्हणजे आम्हा दोघांची भेट वाटेतच झाली होती. येतांनाच त्यांने मला ही खुष खबरी पुनः सांगितली. त्याच्या कडून तिथल्या लोकांचा निरोप घेतला. उंबरठ्यावर पाय ठेवताच गौरीने दिवा पेटवला. सगळ्यानी भेट दिली. सरिता दुसऱ्या खोलीत खाटावर पोराला घेऊन बसली होती. पोराला दूध पाजत होती. मला बघून तिने आपली मान हासऱ्या मुद्रेने मुलाकडे ओणवली. एकमेकाला पाहून माझ्या मनात एक विशेष प्रकारच्या प्रेमाची ज्योत जागली. म्हणजे पुष्कळ दिवसाची आमची लपलेली आशा आज मात्र साकारली.

तिने मुलाला माझ्या हातात दिलं. मी तिच्या जवळच टेकून बसलो. गौरी माझ्या समोर उभी होती.

"भावजी सारखी हाय ना." गौरी म्हणाली.

"नाय ग, आते सारखी हाय. दिसत नाय का तिचं नाक अन् हे तोंड सगळं, आजी च सारखी दिसते." तिकडून म्हणत जवळ आली.

"बरं, तुम्ही बोला. कशी दिसते ही?" सरितेने मला विचारलं.

"मी काय सांगू. ही तर माझ्या स्वप्नाची परी आहे." असे म्हणत हलकेपणाने हसलो.

"भावजी पाणी देस ग. जा जलदी वाढ ना." मामी गौरीकडे इशारा करीत म्हणाली. गौरी तिला काही न म्हणता गेली.

तिने मला तांब्यात पाणी आणून दिले. आम्ही जेवणाला बसलो. जेवण किती रूचकर होते. भाकरी, पिठले, बटाट्याची भाजी, टमाट्याची चटणी व माटेची भुंजलेली भाजी काय मस्त जेवण होते. मग काय गप्पागोष्टी चालल्या, ते तर विलक्षण च होते. मग सरितेने मला हाक मारली म्हणून मी तीच्या जवळ गेला. त्या क्षणा करिता मला तिच्या बरोबर राहणे इष्ट होते. मग काय आम्ही दोघे आनंदाच्या बोलत बसलो. माझ्या सवे ती जे काय बोलत होती ते सर्व एकदम निसर्गाचे बाहेर होते. मध्य रात केव्हां च पालटली होती. जस जसे माझ्या तोंडातून निज शब्द येत असे तसतसे ती माझा हात धरून अडवीत मला निजायला जाऊं देत नव्हती. शेवटी मला मामी ने बोलावून तिच्या अवीट संवादा पासून मुक्त केले.

सकाळी मी अन्य लोका बरोबर कामाला गेला. माणसाना आपापले काम बजाऊन सगळी कडे तपासणी गिपासणी आटोपून लवकरच परत तिला पहायला गेला. मी नुकताच येऊन बसला होता. विडी ओढत कुठला तरी विचार करीत होता. इतक्यात सरितेने गौरीला हाक मारून मला बोलवायला लावले. ती तिकडून येत होती पण मला मला बोलवायला तिला जास्त हरकत झाली नाही. मी धरपडत विडी विझवत तिच्या खोलीत गेला. तिने मला आपल्या नजीक बोलावले. तिने माझा हात धरला.

"बघा, आज पासून मी हिला तुमच्या हातात सोपून देते." मुलाला माझ्या हातात देत म्हणाली. "आणि हां, आ.... आ.... कधी दुःख देऊं नका." तळमळत होती.

"गौरी, लवकर ये. – अरे काय झाले?" मी तिला विचारले.

"माझा घसा सुकत आला." गळा धरीत म्हणाली.

"थोडं दूध पी." दूध ओतून देत होता.

"पोराला धर तं ग." गौरीशी बोलला.

"नाही, नाही दूध नको. तुम्हाला समजत नाही का. थोडं थंड पाणी आणा."

गौरीने धावत थोडे पाणी आणले.

"आपल्या हाताने थोडं पाणी पाजा." ती म्हणाली.

"बरं" असे म्हणून गौरीला पोर देऊन एका हाताने तिची मान उचलून उजव्या हातात ग्लास धरून पाणी पाजवीत होता. जास्त नाही एकच घोट पाणी पिऊन, "राम हरे राम" हे अंतिम शब्द म्हणून शेवटचा श्वास सोडला. तिचे अंग एकदम सैल झाले. मी तिला हाक मारली. पण ती आणखी बोलली नाही. मी मोठ्याने टाहो फोडला पण तिने मला ऐकले नाही. गौरीने त्या बद्दल विचारले परंतु मला तिचे उत्तर देता आले नाही. अचानक कोणी दार खटखटावले.

"लक्ष्मी.... कुठे आहेत हे." आईचा आवाज ओळखला. मान उचलून गौरीकडे बधितलो. पोराला येऊन डोळे पुसत पहायला गेली.

"कशी आहेत सगळी. लक्ष्मी कुठं आहे ग." 'आईने तिला विचारले.

"आतो, आका आम्हाला सोडून गेली ग, आतो." अन् मोठ्याने रडू लागली. आई घाबरली आणि घाई घाईने आमच्या खोलीत आली. आम्हाला पाहून ती एका क्षणासाठी अबोल झाली. हातातील टोपली आपोआप खाली गळली. स्वतःला संभालून डोळे पुसत तिच्या समोर आलो.

"आई, तुझी लक्ष्मी, माझी सरिता आम्हाला सोडून माहेरी गेली ग. बोलाव ग तिला. ती आता कधी येणार नाही ग." आईला मिठी मारत तो म्हणाला.

सरितेच्या देहावसानाची दुर्वार्ता सगळ्या गावात पसरली. हळुहळु सर्व स्त्रिया तिला पाहायला आल्या. आईबाप त्या औकताला घरी नव्हते. गावातील लोकांनी केव्हां त्यांना बोलवायला लावले. ही दुर्वार्ता ऐकून आईबापाच्या मनाला कसा मोठा धक्का बसला. त्यांचा जीव पाखरावाणी तळमळत होता. तदनंतर सगळी कडे निरोप पाठवले गेले. रात्र जागरण झाले. मामा, मामी व पार्वती यांच्या येता येता उशीर झाला आणि इकडे तिची अंत्येष्टि झाली होती. दुसऱ्या दिवशी मुलाला आपल्या बरोबर घेऊन घरी परत गेलो.

"आपली कहाणी सरली. मनाला चुंबण्या सारखी कहाणी दिसते. बरं, आता चला आपल्याबरोबर." म्हताऱ्याला आमच्या मंडळीत नेऊन त्याला खाणपाणाने तृप्त करून पाठवलो.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/237/2
मंत्रालय.